१८५७ चा स्वातंत्र्य-लढा



दा. न. शिखरे

१८५७ चा स्वातंत्र्य-लढा

[महाराष्ट्राच्या मर्दुमकीचें अभिनव दर्शन]

लेखक
दा. न. शिखरे
एम्. ए.

•

स्वातंत्र्य-समर-शताब्दि

•

किंमत दोन रुपये

अनुक्रम

★

◆◆◆

प्रथमावृत्ति १९५७

प्रकाशक
दे. श्री. जोशी
म. द. लोखंडे
मे. जोशी आणि लोखंडे तर्फे
सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें २.

मुद्रक
प्र. भा. काळे,
प्रतिभा मुद्रणालय,
सदाशिव पेठ, पुणें २.

माझा दृष्टि–कोन

आपल्या देशाला स्वातंत्र्य लाभलें, त्याचे जे अनेकानेक लाभ आहेत; त्यांतील एक हा कीं, शें-दीडशें वर्षें सरकारी कडींकुलुपांत अडकून पडलेले ऐतिहासिक महत्त्वाचे कागदपत्र उजेडांत आले. अशा खास सरकारी माहितीचें मंथन करून मुंबई, मध्यप्रदेश व हैद्राबाद या राज्य-सरकारांनीं आपापल्या विभागांतील स्वातंत्र्य-इतिहासाचे साधन-ग्रंथ प्रसिद्ध केले–आणि मध्यवर्ती सरकारानेंहि डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांचें '१८५७' हें पुस्तक प्रकाशित केलें. या चारहि पुस्तकांत, अद्यापपर्यंत अज्ञात असलेली अपूर्व, आश्चर्यकारक व साधार अशी किती तरी माहिती उपलब्ध झाली. तिचा शक्य तितका उपयोग मला माझ्या या पुस्तकांत करून घेतां आला, हें याचें एक वैशिष्टय.

दुसरें वैशिष्टय हें कीं, १८५७ च्या स्वातंत्र्य-यत्नांत महाराष्ट्राचा वांटा किती, हें या पुस्तकांत मीं विस्तारानें सांगितलें आहे. उत्तरे-प्रमाणें दक्षिण पेटली नाहीं हें खरें–तात्या टोपे इकडे येते, तर येथें 'दुसरें स्वातंत्र्ययुद्ध' भडकलें असतें–आणि तें दीर्घकाळ चाललें असतें–पारतंत्र्याची राखरांगोळी करण्यासहि कदाचित् समर्थ ठरलें असतें. पण तो वणवा वरच्यावरच विझला. तरी इकडे कांहीं ठिणग्या उडाल्याच. आणि उत्तरेकडील वणव्यांतील प्रमुख तीन ज्वाला महाराष्ट्रीयच होत्या ना ! नानासाहेब पेशवे, सेनापति तात्या टोपे व स्वातंत्र्य-सौदामिनी राणी लक्ष्मीबाई–यांनींच दिल्ली–मीरतच्या शिपाई-गर्दीला स्वातंत्र्य-समराचें राष्ट्रीय स्वरूप देण्याचा प्रयत्न केला कीं ! त्यांतहि लक्ष्मीबाईची हिंमत, चिकाटी, धडाडी व मर्दुमकी–सर्वच कांहीं सर्वांहून आगळें !–अलौकिक !

वरील महाराष्ट्रीय त्रि-मूर्ति काय किंवा इतर समर-धुरंधर काय, परक्या इंग्रजी सत्तेला या देशांतून पिटाळून लावावें या निर्धारानें लढत होते हें निःसंशय. आतां, ते या लढ्याला प्रवृत्त होण्यास त्यांची वैयक्तिक हानि कितपत कारण होती हा काथ्याकूट व्यर्थ होय. तुकारामादि संत, संसारतापानें स्वतः पोळल्यामुळेंच, परमार्थ-

मार्गाला लागले असले, तरी त्याचें फल स्वतःला मोक्ष मिळविण्यांत आणि इतरांनाहि मोक्षाचा मार्ग मोकळा करण्यांत दिसून आलें. त्यामुळें त्यांच्या मोक्ष-साधनाचें महत्त्व अणुमात्र कमी होत नाहीं. तोच न्याय राजकीय मोक्षाच्या बाबतींतहि. कोणाचा दत्तक नामंजूर झाला, कोणाचें पेन्शन बुडालें, हीं तात्कालिक, वैयक्तिक कारणें राष्ट्रीय उत्थान घडविण्यास समर्थ कशीं ठरतील ! पेन्शनदारांनीं कोठें बंडें केलीं आहेत कीं क्रांतीचीं होमकुंडें पेटविलीं आहेत ! त्यासाठीं राष्ट्रीय स्वातंत्र्याचा ध्येयवादच अंतःकरणांत, अंगाराप्रमाणें धगधगत, असावा लागतो.

अंतःकरणांत असा अंगार पेटलेला असतांना, नानासाहेबांनीं किंवा लक्ष्मीबाईनीं वरून इंग्रजांशीं मैत्रीचीं व समेटाचीं राजनैतिक बोलणीं चालू ठेवलीं, कीं त्यांच्या चित्तांतहि अखेरपर्यंत आशाळ-भूत लोचटपणा घोटाळत होता, हें सिद्ध करणारा पुरावा कोणाला, कसा सांपडेल ! त्यासाठीं, प्रत्येकानें आपल्या मनुष्य–स्वभावाच्या ज्ञानावरून अनुमानच काढलें पाहिजे. १८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धांत आमचें संख्या-बळ शत्रूपेक्षां जसें मोठें होतें, तसेंच आमचें शौर्य व बलिदानाचें सामर्थ्यहि भारी होतें. पण ज्ञान, इमान व देशाभिमान या गुणांत ते वरचढ होते आणि शिस्त व शस्त्रबळ यांत तर ते फारच पुढारलेले होते. आजहि आपल्या राष्ट्रांत इतरांच्या मानानें कोणते गुण कमी पडतात व ते कां, हें समजून घेण्यासाठीं १८५७ चा रोमांचकारक इतिहास वाचणें अवश्य आहे.

चार वर्षांपूर्वी मीं लिहिलेल्या ‘ आमचे स्वातंत्र्य–लढे ’ या पंच–खंड पुस्तकाची पूर्तता आज या पुस्तकानें होत आहे, याचा मला आनंद वाटतो. असा आनंद, इच्छा प्रगट करतांच, मला मनसोक्त देत आलेले प्रकाशक श्री. आण्णासाहेब लोखंडे व श्री. नानासाहेब जोशी यांचे आभार मी किती मानूं !

ता. १० मे १९५७
‘ महात्मा ’ कचेरी, पुणें

दामोदर नरहर शिखरे

१ स्वातंत्र्याची पहिली ज्वाला




पश्चिमेकडचा तो सोसाटयाचा वारा--
समुद्रावरून वेगानें दौडत येणारा तो खारा वारा—
झाडें मोडीत, घरें पाडीत, शेतें तुडवीत—
एकेका नगरींतील तेजस्वी दीप विझवूं लागला; त्यामुळें—
अन्धार, सर्वत्र घनदाट अन्धार पडला !

गिधाडासारखा स्वार्थ व लांडग्यासारखा क्रूरपणा—यांचीं काळीकुट्ट उदाहरणें इंग्रजांच्या या राजवटींत पदोपदीं सांपडतात.

भारतांतील ब्रिटिश रियासतीचें पाननूपान हिंदी रक्तानें रंगलेलें आहे, या रक्तपिपासु राजवटीची राखरांगोळी करण्यासाठीं असंख्य भारतीयांनीं आपल्या रक्तानें स्वातंत्र्याचीं सोनेरी पानें रंगविलीं आहेत.

त्यांतील प्रत्येक पान कोणीहि, केव्हांहि प्रेमानें हृदयाशीं धरावें व भक्तीनें मस्तकीं धारण करावें, अशाच अलौकिक मोलाचें आहे. इंग्रजांच्या कृष्णकुटिल पार्श्वभूमीवर, हिंदपुत्रांनीं रंगविलेली स्वातंत्र्याची तेजस्वी मूर्ति, सर्वांनीं सर्वदा पाहण्यासारखी आहे—पूजण्यासारखी आहे.



२ छत्रपतींचा वनवास



ही काय दसऱ्याची स्वारी ?

आघाडीला निशाणाचा शृंगारलेला हत्ती किती डालानें चालला आहे ! त्याच्यामागें उंटावर नौबती केवढ्यानें वाजत आहेत ! त्या घोषांत घोड्यावरच्या नौबती व बैलगाड्यावरील ढोल-चौघडे यांचे प्रचंड आवाज

मिसळत आहेत. शिंगें, कर्णे, सनया, तुताऱ्या अशा कैक वाद्यांचे निनाद दश-दिशा दुमदुमत आहेत. आणि त्यांत भरीला भर म्हणून इंग्रजी बँड आहेच कीं! उमद्या घोडयावरील ते मराठी स्वार! त्यांच्या हातांतील उंच उंच भाले सूर्यप्रकाशांत कसे चमकत आहेत! आणि या हत्तीवरील अंबारींतून कोण चाललें आहे ?

दुसरे कोण ? साताराचे छत्रपति! सर्व महाराष्ट्राला देवाप्रमाणें पूज्य वाटणारे, गोब्राह्मण–प्रतिपालक छत्रपति श्रीशिवाजीमहाराज यांच्या गादीवर बसलेले छत्रपति प्रतापसिंह! त्यांची स्वारी आपल्या परिवारासह मोठ्या डामडौलानें ता. २१ फेब्रुवारी १८१८ रोजीं साताऱ्याहून पुण्याकडे निघाली होती. गांवोगांवचे लोक छत्रपतींचें दर्शन भक्तिभावानें घेत होते, त्यांचा जयजयकार करीत होते, त्यांना पंचारतींनीं ओवाळीत होते. पण कशासाठीं चालले होते छत्रपति ? युद्ध करून नवें राज्य संपादनासाठीं ?

हाय! ही युद्धाची स्वारी नव्हती––आणि तशीच दसऱ्याची पण स्वारी नव्हती. इंग्रजांचा एक अधिकारी छत्रपतींना पुण्यास नेत होता, तो तेथील इंग्रज गव्हर्नर एल्फिन्स्टन यांच्या भेटीसाठीं!

आद्य छत्रपतींच्या दरबारांत ज्या इंग्रजांनीं व्यापारी म्हणून येऊन, हात बांधून, गुडघे टेकून, सवलतींची भीक मागितली; तेच इंग्रज आतां शिरजोर होऊन, त्या छत्रपतींना मांडलिक राजाप्रमाणें, नव्हे बंद्या गुलामाप्रमाणें, वागवूं पाहत होते. त्यांचें शस्त्रबळ तर मोठें होतेंच, पण त्याहिपेक्षां भेदनीतीचें त्यांचें शस्त्र अत्यंत तिखट व जालीम होतें. प्रथम पेशव्यांशीं मैत्री करून त्यांनीं शिंदे–होळकरादि त्यांच्या सरदारांना नामोहरम केलें, मग छत्रपतीशीं दोस्ती जोडून पेशव्यांना 'हरि हरि' करावयास लावलें, आणि अखेर छत्रपतींच्याहि टाळूवरून हात फिरविले!

पिंपळाच्या झाडाची बारीकशी मुळी एखाद्या प्रचंड वाडयाच्या फटींत एकदा शिरली कीं, ती हळूहळू वाढत जाते; इतकी कीं, अखेर तो वाडा जमीनदोस्त करून टाकते. तशीच इंग्रजी राजवट मराठेशाहीच्या जुन्या वाडयांत शिरली. त्याला निमित्त म्हणजे भाऊबंदकी! अटकेपर्यंत भरारी मारणारा एवढा पराक्रमी राघोबादादा, पण बुद्धीनें अगदीं बाईल-

वेडा ! महत्त्वाकांक्षी आनंदीबाईच्या आग्रहानें, राघोबानें पेशवाईचें पद स्वतःस मिळविण्यासाठीं, सुरतेस जाऊन, इंग्रजांच्या पायावर लोळण घेतली. त्याचा कैवार घेऊन इंग्रज पेशव्यांशीं लढूं लागले. त्यांत गायकवाड व भोसले हे इंग्रजांना फितूर झाले. इंग्रज-मराठ्यांचें हें पहिलें युद्ध सात वर्षें चाललें. या सप्तवार्षिक युद्धाची फलश्रुति काय ? तर इंग्रजांना साष्टी बेट मिळालें, राघोबाला तीन लाखांचें पेन्शन मिळालें आणि मराठी राज्याला दौर्बल्य आलें.

जसा बाप, तसा बेटा. राघोबाचा मुलगा दुसरा बाजीराव हा इंग्रजांना वसई येथें शरण गेला. ता. ३१ डिसेंबर १८०२ रोजीं त्या दोघांचा तह झाला. बाजीरावाच्या संरक्षणासाठीं इंग्रजांनीं आपली दहा हजार फौज पुणें दरबारीं कायमची ठेवली आणि तिच्या खर्चासाठीं, छत्तीस लाख रुपये उत्पन्नाचा मुलूख, कायमचा तोडून घेतला; एवढेंच नव्हे तर, हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांशीं तह किंवा युद्ध करण्याची बाजीरावास मनाई झाली. आतां इंग्रज पेशवाईवर स्वार झाले ! त्या घोड्याच्या तोंडांत त्यांनीं कांटेरी लगाम घातला. आपल्या तैनाती फौजेचा चाबूक उडविला कीं, हें घोडें आपल्या इच्छेप्रमाणें धांवत सुटेल अशी त्यांना खात्री वाटूं लागली. वसईचा तहनामा म्हणजे महाराष्ट्राच्या स्वराज्याचा मृत्युलेखच !

बाजीराव पेशवा झाला खरा; पण कसा ? मुसक्या बांधलेला ! इंग्रजांच्या कृपेनें, इंग्रजांचा दास बनून, हा दुसरा बाजीराव राज्य करूं लागला. इंग्रजांच्या परवानगीशिवाय आपल्या मराठे सरदारांशींहि पत्रव्यवहार करण्याची या पेशव्याला बंदी झाली. घरच्या लग्नामुंजीचीं निमंत्रणें पाठवावयाचीं, तर त्यालाहि इंग्रजाचा परवाना लागू लागला ! तेव्हां तो चिडला. त्यानें इंग्रजांशीं युद्ध केलें. पण चुटकीसरशीं इंग्रजांनीं त्याचा पराभव केला. त्याचें सर्व राज्य गिळंकृत केलें आणि बाजीरावाला पेन्शनर बनवून उत्तर हिंदुस्थानाकडे रवाना केलें.

" आमचें युद्ध फक्त बाजीरावाशीं, आम्हांला छत्रपतींचें राज्य कायम ठेवावयाचें आहे. " अशी फसवी घोषणा एल्फिन्स्टननें केली. तिचीच री ओढून छत्रपति प्रतापसिंहानें आपल्या जाहीरनाम्यांत म्हटलें, " बाजीराव बंडखोर आहे, सबब आम्हीं त्याला नोकरीवरून दूर

केलें आहे. " जुने पेशवे गेले आणि " राजे प्रतापसिंह छत्रपति व प्रधान पेशवे आलपिष्टनसाहेब बहादूर " असा नवा शिक्का चालू झाला !

आतां उपरे इंग्रज हे छत्रपतींचे पेशवे बनले आणि येथले पेशवे परागंदा झाले–वनवासी झाले ! ब्रह्मावर्त येथें सालीना आठ लाख रुपयांचें पेन्शन खात, हा शेवटचा पेशवा, आपल्या स्वराज्याचा शेवट करून, आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस मोजीत राहिला. योग असा कीं, ' एकेक कल्पवृक्ष ' तसे थोरथोर पेशवे अकालीं वारले; पण हा नतद्रष्ट पेशवा मात्र ३३ वर्षें, एखाद्या अजगरासारखा, पेन्शन खात बसला. नुसता बसला नव्हे, परक्या इंग्रजांना युद्धांत द्रव्याचें साहाय्य करूं लागला. त्यानें एकामागून एक तीन दत्तक घेतले. त्यांच्यासाठीं अठ्ठावीस लाख रुपयांची जिंदगी मागें ठेवून, ता. १८ जानेवारी १८५१ रोजीं, हें शेंडेनक्षत्र अस्तास गेलें !

पेशवाई बुडविली, तेव्हांच इंग्रजांनीं छत्रपतींचीहि गादी खलास कां केली नाहीं ? त्यांना काय छत्रपतींविषयीं प्रेम होतें ? कां नीतिनियमांचें पालन करावयाचें होतें ? याचें उत्तर इंग्रजांच्याच प्रमुख प्रतिनिधीनें पुढें स्पष्टपणें दिलें. गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यानें १८४८–मध्यें इंग्लंडला आपल्या वरिष्ठांकडे जो खलिता पाठविला, त्यांत आपला कुटिल हेतु स्वच्छ केला कीं, " १८१८ सालीं पेशवाईचा नुकताच लोप झाला होता. तेव्हां इंग्रजी सत्तेला महाराष्ट्राचा पाठिंबा मिळावा, म्हणून त्या वेळीं सातारचें राज्य अबाधित राखणें अत्यंत जरूर व शहाणपणाचें असेल, नव्हे होतेंहि, आणि त्याबद्दल त्या वेळचे अधिकारी प्रशंसेस पात्र आहेत; पण पेशवाई ताब्यांत घेऊन आतां तीस वर्षें लोटलीं आणि प्रजाहि दंगाधोपा न करतां शांतपणें नांदत आहे; यामुळें सातारचें राज्य हें आतां कायम ठेवण्याचें कोणतेंच कारण राहिलें नाहीं. इंग्रज-राज्य आतां मजबूत झालें असून शिंदे-होळकर हे निरुपद्रवी बनले आहेत. तेव्हां शिवाजीच्या वंशजाचें हें बुजगावणें यापुढें ठेवण्यांत कांहींच मतलब नाहीं. "

इंग्रजांचें राजकारण किती स्वार्थी, किती कपटी व किती दूरदर्शी असे, याचा याहून निराळा पुरावा कोणता पाहिजे ? 'शत्रूला कृपा दाखव, अश्रु ढाळ, डोक्यावर घे, पण प्रसंग येतांच डोक्यावरील मातीच्या घागरी-

प्रमाणें, त्या शत्रूला जमिनीवर आपट व त्याचे तुकडे तुकडे कर.'—हेंच इंग्रजांचें ' कुटिल ' धोरण ! कांहीं काळ त्यांनीं पेशव्यांना डोक्यावर घेतलें आणि योग्य वेळ येतांच जमिनीवर आदळलें. नंतर मस्तकीं धारण केलें छत्रपतींना. पण पुढें त्यांचाहि कपाळमोक्षच त्यांनीं केला. प्रारंभीं अमृतासारखी मधुर वाणी, पण शेवटीं हालाहलासारखी प्राणघातक करणी—हीच इंग्रजांची राजनीति !

सातारचे छत्रपति प्रतापसिंह म्हणजे एक अष्टपैलू हिरा ! त्याची बुद्धि स्वतंत्र, दृष्टि पुरोगामी आणि वर्तन टापटिपीचें व व्यवस्थित. इंग्रज अधिकाऱ्यांनींहि आपल्या खाजगी पत्रव्यवहारांत त्याचें गुणगान केलें आहे. " हा राजा अत्यंत सुसंस्कृत आहे. त्यानें आपला राज्यकारभार सुव्यवस्थित ठेवलेला आहे. युरोपांतील कोणत्याहि राजाला भूषण वाटावें, असें त्याचें राज्य-शासन उत्तम आहे. " असें वर्णन इंग्लंडमध्यें कळविण्यांत आलें. १८०८ सालीं प्रतापसिंहाला सातारा येथें राज्याभिषेक झाला.

काळाचीं नवीन पावलें ओळखून, बारा हजार रुपये खर्चून, त्यानें एक छापखाना सुरू केला. सभारंजनी, सभानीति, सेवकबोधिनी, छंदोमंजरी इत्यादि पुस्तकें त्यानें प्रसिद्ध करविलीं. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठीं शाळा काढली. तींत मराठ्यांच्या मुलींनाहि संस्कृत, इंग्रजी इत्यादि शिकविण्याची व्यवस्था केली. त्यांना शिकविण्यास रूढिग्रस्त ब्राह्मण तयार होईनात. कारण शूद्रांना विद्या देणें हा अधर्म ! तेव्हां मुंबईहून दोनतीन मिशनरी आणविले. त्या मुलींना लष्करी शिक्षण देण्यासाठीं एक गोरा अधिकारीहि नेमला. छत्रपतींची मुलगीहि ते शिक्षण घेऊं लागली. नवें ज्ञान, नव्या कला, नव्या विद्या यांचा लखलखाट आपल्या राज्यांत करण्याचा त्यानें आटोकाट प्रयत्न केला. त्या काळांतील ह्या सुधारणांची वार्ता लागतांच लंडनमधील " रॉयल एशियाटिक सोसायटी"नें छत्रपतींना आपलें 'सन्मान्य सभासद' करून घेतलें.

प्रतापसिंहानें आपल्या प्रजेच्या सुखसोयी वाढविल्या. जागोजाग पूल बांधले, दवाखाने उघडले, रस्ते तयार केले आणि न्यायाचा व शांततेचा कारभार सुरू केला. हें वृत्त इंग्लंडला पोंचल्याशिवाय कसें

राहील ? हिंदी मुंगीच्या पायांतील घुंगरूं वाजलें, तरी त्याचा नाद इंग्लंडला जाऊन पोहोचे. इतके दक्ष व चौकस इंग्रज होते. १८३५ सालीं ‘ईस्ट इंडिया कंपनी’च्या डायरेक्टर बोर्डानें छत्रपतींचें गुणवर्णन करणारें एक पत्र इंग्लंडहून पाठविलें आणि त्याबरोबरच, ३०००० रुपयांची एक रत्नजडित तलवारहि, गौरवाची खूण म्हणून, पाठविली. परंतु मुंबईच्या गव्हर्नरनें तें प्रशंसापत्र आणि ती तलवार—दोन्हीहि आपल्याजवळच दाबून ठेवली. कारण, आतां येथील इंग्रज अधिकाऱ्यांनीं प्रतापसिंहाचा कांटा काढण्याचें ठरविलें होतें.

प्रतापसिंहास इंग्रजांनीं १८२२ सालीं राज्याची मुखत्यारी दिली. आणि त्यानें स्वत:स वेदोक्त राज्याभिषेक १८३८ मध्यें करून घेतला. पूर्वीं १८०८ मध्यें पहिला राज्याभिषेक झालाच होता. अशा प्रकारें दोनदां राज्याभिषेक झालेला हा छत्रपति राज्यावर किती काळ टिकला ? १८३९ मध्येंच इंग्रजांनीं प्रतापसिंहास पदच्युत केलें.

दरम्यानच्या काळांत, इंग्रजांचें वाढतें आधिपत्य फेकून द्यावें म्हणून कांहीं कांहीं प्रयत्न झाले; पण ते सारे फितुरीमुळें धुळीस मिळाले. या फितुरांतील तक्षक म्हणजे बाळाजीपंत नातू ! पण आश्चर्य असें कीं, जेव्हां बाजीराव इंग्रजांशीं लढण्यासाठीं, अंगीं बळ आणून, रणांगणावर उभा ठाकला, तेव्हां प्रतापसिंह इंग्रजांना फितुर ! पेशवे लढत आहेत व छत्रपति परक्यांशीं साथ करीत आहेत—केवढें हें दु:खद दृश्य ! जिवावर उदार झालेल्या कांहीं शूरवीर व स्वामिनिष्ठ सरदारांनीं एकदां या छत्रपतींकडे धांव घेतली व विनवणी केली, “ महाराज, आपण आमचे पुढारी व्हा आणि इंग्रजांशीं मुकाबला द्या. आपल्या नेतृत्त्वाखालीं, आपल्या भगव्या झेंड्याखालीं, आम्हीं आपलें रक्त सांडण्यास तयार आहोंत ! ” काय परिणाम झाला या विनवणीचा ?—या स्वराज्यप्रेमाचा ?—या एकीचा ?—या निर्धाराचा ?

सरदाराची पाठ फिरली मात्र, प्रतापसिंहानें टांकोटांक त्यांची ही सारी मसलत इंग्रजांच्या कानीं घातली ! इंग्रजांचें बळ, इंग्रजांचें धोरण, इंग्रजांचे हेतु यांचें आकलनच येथील मुत्सद्यांना, सेनापतींना, राज्य-

कर्त्यांना कोणालाच झालें नाहीं. ज्ञानाची उणीव, शस्त्रांची उणीव, सहकार्याची उणीव ! याचें फळ सर्वनाशाशिवाय दुसरें काय मिळणार ?

याच्या उलट, इंग्रजांची नेकी कशी असे, याचें एक उदाहरण पाहा. बाजीरावाच्या सेनेचा कमांडर फोर्ड नांवाचा इंग्रज होता. जेव्हां बाजीरावाचें सैन्य इंग्रजांशीं लढाई करूं लागलें, तेव्हां या फोर्डनें बाजीरावला सांगितलें, " मी माझ्या देशबांधवांवर हत्यार उगारणार नाहीं. हा माझा राजीनामा ! "

छत्रपतींचे प्रधान म्हणून इंग्रज आरंभीं राज्य करीत; पण पुढें या प्रधानानेंच राजाला खाऊन टाकण्याचें ठरविलें. कारण काय ? तर म्हणे छत्रपति इंग्रजांच्या फौजेंत फंदफितुरी करतात, गोवा सरकारशीं संधान बांधून इंग्रजांना येथून हुसकूं पाहतात आणि नागपूरच्या भोसल्याशीं कट करतात. असे आरोप त्याच्यावर ठेवण्यांत आले.

जसे आरोप खोटे; तसेच पुरावेहि खोटे. प्रतापसिंहाला ते दाखविलेहि नाहींत; हें विशेष. फिर्यादी तोच न्यायाधीश, मग न्याय काय मिळणार ? ता. ४–९–१८३९ रोजीं इंग्रजांनीं प्रतापसिंहाला ऐन मध्यरात्रीं, फौजेच्या पहाऱ्यांत, दगलबाजीनें अटक केली. या दगलबाजींत प्रतापसिंहाचा भाऊ आप्पासाहेब सामील होता हें विशेष. सख्या भावाशीं द्रोह ! स्वराज्याशीं द्रोह !–अशीं पापें आप्पासाहेबांनीं कां केली ? केवळ स्वार्थासाठीं ! आपल्याला छत्रपतींची गादी मिळावी यासाठीं !

अटक झाल्यापासून प्रतापसिंहाचे इंग्रजांनीं जे हाल केले, त्यांचें वर्णन करणें कठिण ! त्यांची रवानगी काशीकडे करण्याचें ठरविलें. सातारा ते काशी ! सहा महिन्यांचा प्रवास ! त्या प्रवासांतील भूमीचा कणन्कण छत्रपतींच्या डोळ्यांतील अश्रूंनीं भिजला गेला. छत्रपतींच्या या वनवासास अटकेपासूनच प्रारंभ झाला. त्यांना पलंगावरून उघड्या अंगानिशीं ओढण्यांत आलें. फक्त मांडचोळणा–दुसरें वस्त्र अंगावर नाहीं; अशा अवस्थेंत छत्रपतींना राजवाड्यांतून बाहेर काढलें आणि रस्त्यावरील पालखींत बसविलें. कौरवांच्या दरबारांत खेचून नेलेल्या एकवस्त्रा द्रौपदीची दुर्दशा महाराष्ट्राच्या राज्य-लक्ष्मीच्या कपाळीं आली. सर्व शहरांत एकच आकांत झाला ! मध्यरात्रींहि लोकसमुदाय लोटला ! एका नागरिकानें

आपल्या घरांतील एक शाल आणून छत्रपतींच्या उघड्या अंगावर घातली· एका लष्करी अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं, छत्रपतींची पालखी, साताऱ्याच्या हद्दपार झाली !

पालखीला हात लावून सेनापति बाळासाहेब भोसले चालले होते. शेकडों नागरिकहि मागें मागें येत होते, पण लष्करी अधिकाऱ्यानें त्यांच्यावर सोल्जर सोडण्याचा धाक घातला. छत्रपतींनींहि नागरिकांना परत जाण्यास सांगितलें, तेव्हां लोक परतले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं लिंब गांवांत छत्रपतींना ठेवण्यांत आलें. कोठें ? एका गाई-म्हशींच्या गोठ्यांत ! एका खांबाला टेकून छत्रपति घोंगड्यावर बसले. चोवीस तास सोल्जरांचा पहारा ! दुपारीं साताऱ्याहून महाराणी व राजकन्या दासदासींसमवेत छत्रपतींच्या दर्शनास आल्या. राजकन्या गोजराबाई आठ महिन्यांची गरोदर होती. आपल्या पित्याची ती भयंकर अवस्था पाहून ती किंचाळली—बेशुद्ध पडली व तिचा गर्भपात झाला. त्या गोठ्यांत ९३ दिवस छत्रपतींना काढावे लागले. नंतर काशी-यात्रा सुरू झाली. वाटेंत सेनापतींच्या गरोदर पत्नीच्या पोटांत दुखूं लागलें, तरी अधिकारी थांबेनात. अखेर ती थोर बाई अनाथाप्रमाणें रानांतच बाळंत झाली.

पुढें खुद्द सेनापतींना वाटेंतच मृत्यु आला. प्रवासांत कोणी आजारी पडले, तरी इंग्रज अधिकारी विश्रांति घेऊं देईनात. हाल हाल करीत, मराठ्यांच्या या राजाला, इंग्रजांनीं ता. २५ मार्च १८४० रोजीं काशीकडे ओढीत नेलें —रस्त्यावर मेलेल्या बेवारशी कुत्र्या-मांजराप्रमाणें ! काशी येथें प्रतापसिंहाला गोऱ्या सेनाधिकाऱ्यांच्या नजर—कैदेंत ठेवण्यांत आलें. जवळच ब्रह्मावर्त येथें त्यांचा प्रधान बाजीराव होताच. प्रधान गेला ! राजाहि गेला !

या अनर्थाला कारण आमची फितुरी. फितुर आप्पासाहेब साताराचा छत्रपति झाला व फितुर बाळाजीपंत त्याचा दिवाण बनला ! दुष्टांना व दुर्जनांना उच्चीचे ग्रह आले आणि बुद्धिमान् व कर्तृत्ववान् पुरुषांच्या कपाळीं दैन्य व दास्य आलें.

काशी येथील नजरकैदेंत उणीपुरी आठ वर्षें प्रतापसिंहाला काढावीं लागलीं. तीं त्यानें कशीं काढलीं असतील ? सर्व जगाला गदगदा हलविणाऱ्या नेपोलियननें सेंट हेलिना बेटांत काढलीं तशीं ! या अवधींत त्यानें आपल्यावरील अन्याय दूर व्हावा म्हणून, इंग्लंडपर्यंत शिकस्तीचे प्रयत्न केले. या प्रयत्नांत मुख्य वांटा रंगो बापूजी गुप्ते याचा ! छत्रपतींचा वकील म्हणून त्यानें इंग्लंडमध्यें सतत चौदा वर्षें भगीरथ प्रयत्न केले. कोणालाहि थक्क करून सोडतील, असे ते प्रयत्न आहेत. त्याच्या चिकाटीची व चातुर्याची कल्पनाच करवत नाहीं. प्रवासाला निघण्या-पासून त्याच्या वाटेंत इंग्रजांनीं किती संकटें पेरलीं ! पण तीं सर्व नष्ट करून, मोठ्या हिंमतीनें व हिकमतीनें त्यानें इंग्लंडांत प्रवेश केला, कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाला जागें केलें व अखेर पार्लमेंटचेंहि दार ठोठावलें.

छळ, निराशा, अपमान, हालअपेष्टा यांची तमा न धरतां, रंगो बापूजीनें, इंग्रजी अन्यायाचा पहाड फोडण्यासाठीं, आपल्या प्रयत्नांची छिनी अहोरात्र चालविली. कंपनीच्या डायरेक्टरांनीं त्याची भेट न घेतां, आपल्या दरबारचा दरवाजा लावून घेतला आणि एखाद्या खरखरमुंड्या भिकाऱ्याप्रमाणें, त्याला अपमानानें घालवून लावलें. त्याचेपूर्वीं तेथें, दिल्लीच्या बादशहाची दाद मागण्यासाठीं, राजा राममोहन रॉय येऊन गेले होते. त्यांच्या प्रयत्नानें ' ब्रिटिश इंडियन सोसायटी ' तेथें स्थापन झाली होती. तिचें साहाय्य रंगो बापूजीनें घेतलें. त्या संस्थेमार्फत निघणाऱ्या मासिकांतून, त्यानें ' सातारा प्रकरण ' इंग्रजी जनतेपुढें धैर्यानें मांडलें.

रंगो बापूजींची शहामत अशी कीं, त्यानें ता. ८-२-१८४३ रोजीं ' ईस्ट इंडिया कंपनी 'च्या कोर्टाच्या सभेंत एक तास भाषण ठोकून दिलें. तो बोलला मराठींत, पण मराठी जाणणाऱ्या एका साहेबानें त्याचा अनुवाद इंग्रजींत केला. हें परावलंबन त्या बाणेदार वकिलास रुचलें नाहीं. त्यानें स्वतः इंग्रजी शिकावयास सुरुवात केली. त्यांत त्यानें इतकें यश कमाविलें कीं, ता. २–१२–१८४६ रोजीं त्यानें इंग्रज श्रोत्यांपुढें इंग्रजी भाषेंतून तब्बल तीन तास भाषण केलें व इंग्रजांनीं छत्रपतींवर केलेल्या घोर अन्यायाला वाचा फोडली. या व्याख्यानाचा परिणाम

इतका विलक्षण झाला कीं, हें प्रकरण तडीस लावण्यासाठीं ४४ ब्रिटिश स्त्री-पुरुषांची एक समिति स्थापन करण्यांत आली.

त्यानें खुद्द इंग्लंडच्या पार्लमेंटांतहि इंग्रजी भाषण केलें. या भाषणांत त्यानें 'ईस्ट इंडिया कंपनीचे' वाभाडे काढले आणि छत्रपतींची बाजू कौशल्यानें मांडली. लोकशाहीचा प्रत्येक उपाय त्यानें करून पाहिला. ७०००० सह्यांचे अर्ज पार्लमेंटांत सातारा–प्रकरणीं सादर केले. "या प्रकरणाकडे लक्ष न द्याल, तर इंग्लंडचें अंदाजपत्रक आम्ही नामंजूर करूं." अशी निर्वाणीची भाषा पार्लमेंटांत इंग्रज लोक काढूं लागले. आणि खुद्द रंगो बापूजीनें तर अशी गगनचुंबी घोषणा केली कीं, "ही माझी शेवटची प्रार्थना जर धुडकावली गेली, तर तुमच्या जबरदस्त पंजाखालीं सांपडलेल्या सगळ्या **आशियांतल्या** राष्ट्रांना जागृत करण्यासाठीं मी माझ्या कोट्यवधि हिंदी बांधवांच्या नांवानें टाहो फोडून ओरडून सांगेन कीं, 'बापहो, जागे व्हा आणि या आंग्रेजांना नीट ओळखून सावध राहा."

१८३९ सालीं इंग्लंडला गेलेला हा छत्रपतींचा वकील १८५४ सालीं हिंदुस्थानला परत आला. त्यानें प्रयत्नांचा पाऊस पाडला, पण तो ब्रिटिश समुद्रांत जिरून गेला. इंग्रज हा हाडाचा बनिया. त्याचें हृदय म्हणजे त्याचें साम्राज्य! त्या हृदयाला द्रव्याच्या रक्ताचा सतत पुरवठा व्हावयास हवा. त्यासाठीं इंग्रजी व्यापाराच्या रक्तवाहिन्या सर्व जगभर पसरलेल्या. त्यांतील एकहि रक्तवाहिनी तुटूं नये व रक्ताचा एकहि बिंदु आटूं नये, ही काळजी, सारें ब्रिटिश राष्ट्र, डोळ्यांत तेल घालून घेत असतें. या एका स्वार्थी विचारापुढें, ब्रिटिशांना न्यायनीति नाहीं, सत्यासत्य नाहीं, देवाची भीति नाहीं, माणुसकीची कदर नाहीं—–कांहीं नाहीं!

अशा या फत्तरावर रंगो बापूजीनें आपल्या प्रयत्नांची कितीहि संततधार धरली तरी काय उपयोग? बिचारा निष्फळ हातांनीं व निराश मनानें मायभूमीस परत आला. पण त्याचें कौतुक करणारा छत्रपति कोठें होता? प्रतापसिंह ता. १९–१०–१८४७ रोजींच मृत्यु पावला. त्यानें स्वतः इंग्लंडमधील कंपनीकडे आपली एक सविस्तर कैफियत पाठविली होती. पण ती हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकाऱ्यांनीं तीन वर्षें दाबून ठेवली, आणि त्याच्या मृत्युनंतर दोन महिन्यांनीं इंग्लंडकडे रवाना केली!


प्रतापसिंहाच्या जीवनाच्या अशा चिंधड्या उडविण्यास निमित्त झालेला आप्पासाहेब, इंग्रजांचें बाहुलें म्हणून, छत्रपति-पदावर नऊ वर्षें राहिला; आणि प्रतापसिंहानंतर सहाच महिन्यांनीं, १८४८ च्या एप्रिलांत, मृत्यु पावला. मृत्युपूर्वी त्यानें दत्तक घेतला होता.

प्रतापसिंहानेंहि एक दत्तक घेतलेला होताच. साताऱ्याच्या गादीला असे दोन वारस होते. पण " आलें इंग्रजाच्या मना । तेथें कोणाचें चालेना । " अशी असहाय्य अवस्था देशांत निर्माण झाली होती. उपऱ्या इंग्रजांनीं दंडुकेशाहीनें व दगलबाजीनें, सातारा संस्थान, अगदीं अकारण खालसा केलें !–सर्व महाराष्ट्राचें आराध्यदैवत असलेल्या छत्रपतींचें राज्य देखतां डोळां बुडालें !

या सातारा–प्रकरणांतील, इंग्रजांचा कमालीचा अन्याय व दुष्टावा पाहून, सारा महाराष्ट्र संतप्त होऊन गेला. छत्रपति व पेशवे या दोघांनाहि कपटानें व कुटिलतेनें धुळीस मिळवून इंग्रज स्वतः राज्यकर्ते बनले. अशा इंग्रजांना महाराष्ट्रीय लोक उपटसुंभ व आप्पलपोटे मानूं लागले.

घराघरांतून इंग्रजाविषयींच्या असंतोषाच्या ज्वाला पेटल्या होत्या. इंग्रजांच्या नाशाची संधि येते केव्हां आणि आपण इंग्रजी राजसत्तेची राखरांगोळी करतों केव्हां, असें जाणत्या महाराष्ट्रीयास मनोमन वाटत होतें. ज्या लळघोट्या फितुरांना सरकारी चंदी लाभली होती, त्यांच्या-शिवाय बाकीचा सारा महाराष्ट्र इंग्रजाविरुद्ध क्रोधानें कढत होता. महाराष्ट्र हा हाडाचा कणखर–थेट सह्याद्रीसारखा ! सारा भरतखंड ज्या मोंगली सत्तेनें ग्रासून टाकला होता, तिला प्रतिकाराचा पहिला तडाखा दिला टणक महाराष्ट्रानेंच–त्यांतील श्रीशिवछत्रपतीनें ! त्या छत्रपतींच्या शूर-चतुर वंशजाचा, अकारण अपमान व अघोर अन्याय, जिवंत महाराष्ट्र, उघड्या डोळ्यांनीं, सुखासुखीं सहन करील काय ?

३ मराठेशाही रपवळली



" माझं राज्य मीं इंग्रजांना देऊन टाकलं, त्यांत प्रजेचं काय गेलं ?" अशी ऐट मिरवीत, दुसरा बाजीराव ब्रह्मावर्त येथें, ब्राह्मण-भोजनें घालीत व रात्ररात्र विष्णुसहस्रनामाचीं पारायणें करीत, मजेंत काळ घालवीत होता. त्याचा दत्तक पुत्र नानासाहेब सुमारें अठरा वर्षांचा होता. बाजीरावाचा नातू

रावसाहेब हाहि तेथेंच होता. त्या दोघांचे नानातऱ्हेचे खेळ चालत. घोड्यावर बसण्यांत दोघे पटाईत, तसेंच दांडपट्टा चलिवण्यांतहि.

महाराष्ट्राचे भाले उत्तर हिंदुस्थानांत चमकले.

महाराष्ट्राचे खेळ गंगानदीच्या कांठावर खेळले गेले.

महाराष्ट्राचे घोडे उत्तरेकडे नाचूं लागले.

पण ही मुलगी कोण ?

वयानें दिसते सात-आठ वर्षांची, पण किती सुंदर ! किती चपळ ! किती चतुर ! तिचे डोळे पाणीदार, तिचें मुख तजेलदार आणि तिचा बांधा डौलदार. तिच्या अंगची चमक पाहून प्रत्येकजण चकित होई. ती धावे–पळे; हसे–नाचे, जशी कांहीं गगनींची वीजच ! खेळांत ती नानासाहेब–रावसाहेबांच्या पुढें ! घोड्यावर बसून कधीं ती त्यांच्याबरोबर दौड ठोकी, तर कधीं ती शस्त्रांच्या सामन्यांत भाग घेई. हार तिला माहीत नव्हती, भीति तिला ठाऊक नव्हती. अशी ही सुरूप व सुलक्षणी, चपळ व चतुर, शूर व शहाणी मुलगी कोण ?

ही मुलगी म्हणजे मनु —

मोरोपंत तांबे यांची कन्या.

तांबे मूळचे वाईचे. ते पेशव्याबरोबर काशीस गेले. तेथें ता. १९ नोव्हेंबर १८३५ रोजीं मनूचा जन्म झाला. गंगामातेनें मोरोपंतांना दिलेला हा प्रसादच ! काशी-विश्वेश्वराच्या शिरावरील जणुं गंगाच ! अशी ती गुणसंपन्न व लावण्य–संपन्न मनु चार वर्षें काशीच्या पवित्र परिसरांत वाढली.

नंतर मोरोपंत ब्रह्मावर्तीस गेले–तेथें बाजीरावाचे आश्रित म्हणून राहिले. असे शेंकडो आश्रित त्या वठलेल्या वृक्षावर राहिलेले होते. त्यांत मोरोपंतांच्या मनूनें सर्वांचें मनहरण केलें. " कोणा तरी राजाची ही राणी होणार !" असें भविष्य कोणीकोणी वर्तविलें. " हत्तीवरून आपण तिची वरात काढूं. " बाजीरावानें कौतुक केलें–आणि घडलें खरें तसेंच !

आतां मनु आठ वर्षांची झाली. आतां ती लग्नास आली, असें मोरोपंतांना वाटलें. तो काळच तसा होता. " अष्टवर्षा भवेत् कन्या " हीच तेव्हांची विवाहाची मर्यादा. आपल्या उपवर मनुसाठीं मोरोपंत वर शोधूं लागले. पण त्यांना वर–संशोधनाची यातायात पडली नाहीं. मनुसारखें रत्न धुंडाळीतच लोक येत; रत्नानें कोंदण धुंडाळण्याची काय गरज ? १८४२ सालीं मनूचा विवाह झाला—– आणि ती एका संस्थानची राणी झाली. तें संस्थान म्हणजे झांशी !

झांशी संस्थान पांच हजार चौरस मैलांचें होतें. त्याची वस्ती दहा लाख. तेथील लोक सुखी व संपन्न. तेथील सुभेदार रामचंद्रराव नेवाळकर यांच्याशीं, इंग्रजांनीं १८१७ सालीं, एक तह केला, आणि त्यांत झांशीचें संस्थान रामचंद्ररावाकडे वंशपरंपरा चालविण्याचें कबूल केलें. पुढें रामचंद्ररावांनीं पेंढारी लोकांचा बंदोबस्त मोठ्या शौर्यानें केला. त्यांचें सैन्य शिस्तशील व पराक्रमी होतें. गव्हर्नर जनरलनें १८३२ सालीं, झांशी येथें दरबार भरवून, रामचंद्ररावास ' महाराजाधिराज ' ही पदवी, राजचिन्हांसह अर्पण केली. त्यांच्या मृत्युनंतर चुलते रघुनाथराव झांशीच्या गादीवर आले. ते नादान होते. त्यांच्या कारकीर्दीत संस्थानचें कर्ज एकसारखें वाढत चाललें. ते १८३८ सालीं वारले. त्यांचे धाकटे बंधु गंगाधरराव यांना गादीवर बसविण्यांत आलें. पण संस्थानचें कर्ज फिटेपर्यंत, त्याचा कारभार इंग्रजांनीं आपल्याकडे घेतला. तो १८३८ ते १८४२ पर्यंत त्यांनीं चालविला. या कामगिरीचें इनाम म्हणून इंग्रजांनीं, सव्वा दोन लाख रुपये वार्षिक वसूल असलेला मुलूख बळकाविला.

गंगाधररावांचा पहिला विवाह बालपणींच झाला होता, पण त्यांची पत्नी मरण पावली. म्हणून त्यांनीं १८४२ मध्यें दुसरा विवाह केला. दुसरी पत्नी त्यांना दैवयोगानें अशी लाभली कीं, जिचें नांव साऱ्या इतिहासांत अजरामर झालें. तिचें नांव गाजलें – आणि त्याबरोबर झांशीचेंहि नांव जगभर झालें. तिचें नांव– लक्ष्मी ! ही लक्ष्मी म्हणजेच मोरोपंताची मनु !

मनु झांशीची राणी झाली. त्याबरोबर मोरोपंतांनाहि तेथील सरदारकी लाभली. दरमहा तीनशें रुपयांची नेमणूक त्यांना झाली. मनूची

आई लहानपणींच वारली होती. मोरोपंतांनीं दुसरें लग्न केलें व झांशी येथेंच ते राहूं लागले. लक्ष्मीचें सासर-माहेर म्हणजे अंगण-परसाइतकें जवळ आलें. ती सौख्याच्या, वैभवाच्या, आनंदाच्या लाटांवर स्वच्छंदानें पोहत होती. ती नशीबानेंहि मोठी भाग्यवान् ठरली.

" नव्या राणीसाहेब मोठ्या पायगुणाच्या आहेत हो. " असे गौरवाचे उद्गार भोळ्या-भाबड्या लोकांच्या तोंडून निघूं लागले. कारण लक्ष्मीच्या लग्नानंतर लवकरच गंगाधररावांना इंग्रज कंपनीकडून राज्याधिकार मिळाला.

झांशीच्या डोक्यावर फिरणारी ' फिरंगी छडी ' बाजूस सरली. झांशीचीं राज्यसूत्रें गंगाधररावांच्या हातीं आलीं. पारतंत्र्याची अमावस्या लुप्त झाली आणि स्वराज्याचा चंद्र कलेकलेनें वाढूं लागला. झांशी संस्थानांत लक्ष्मीबरोबर राज्यलक्ष्मीनेंहि प्रवेश केला. संस्थानचा खजिना भरून ओसंडूं लागला. तेजस्वी व पराक्रमी अशा त्या राणी लक्ष्मीच्याच पायगुणानें आपल्या संस्थानाला सोन्याचे दिवस लाभले, अशी श्रद्धा प्रजाजनांमध्यें निर्माण झाली. ते तिला देवतेप्रमाणें मान देऊं लागले.

गंगाधररावांना हत्ती–घोडयांचा मोठा शौक. त्यांनीं बावीस हत्ती बाळगले होते. त्यांचे अलंकार, अंबाऱ्या, मेणे–सारें कांहीं सोन्याचे. महाचा खास गज–राज तर रत्नांनीं मढविलेला ! पांच हजार फौज शिस्तींत राखलेली. पांचशें घोडयांचा रिसाला जय्यत तय्यार ! शिवाय तोफा किती तरी ! गंगाधररावांचा कारभार अत्यंत वक्तशीर व करडा. इंग्रजाशीं तें बाणेदारपणानें वागत. बुंदेलखंडांतील संस्थानिकांवर त्यांचें मोठें वजन ! ' काका ' या सन्मानाच्या पदवीनेंच बुंदेले राजे त्यांना संबोधित.

विवाहाला आठ वर्षे झालीं – लक्ष्मी षोडशवर्षा झाली—मातृपदास चढली. १८५१ सालीं तिला पुत्ररत्न झालें. राजवाडा आनंदानें नाचूं लागला. सारें संस्थान हर्षानें वेडें झालें. हत्तीवरून सर्व शहरभर साखर वांटण्यांत आली. वाद्यांचे मंजुळ निनाद दश-दिशा भरून गेले. प्रजाजनांनीं स्वयंस्फूर्तीनें आनंदाचे समारंभ केलें. नजराणे दिले गेले. पण—

तीन महिन्यांतच हें पुत्र-रत्न यमानें हरण केलें ! महाराणीसाहेबांना मनस्वी दुःख झालें. महाराजांच्या अंतःकरणाला तर असह्य

धक्का बसला. म्हातारपणीं झालेला मुलगा — आणि तो दिसतो न दिसतो तोंच दिसेनासा होतो, यामुळें त्यांना अपार शोक वाटूं लागला. त्यामुळें त्यांची प्रकृति खंगली. १८५३ सालीं दसऱ्याचा दरबार नेहमींच्या थाटामाटानें झाला. पण महाराजांची प्रकृति खालावतच गेली. मृत्यूची चाहूल त्यांना ऐकूं येऊं लागली. तेव्हां, पुढें आपल्या संस्थानाचा कारभार बिनखटका चालावा, म्हणून त्यांनीं दत्तक घेण्याचें ठरविलें.

नेवाळकरांच्या घराण्यांत पांच वर्षांचा एक मुलगा होता. त्याचें नांव आनंद. त्याला गंगाधररावांनीं यथाशास्त्र दत्तक घेतलें व त्याचें नांव ' दामोदर ' ठेवलें. या दत्तक-समारंभास संस्थानांतील प्रमुख प्रजाजन उपस्थित होतेच; पण शिवाय कांहीं इंग्रज अधिकारीहि हजर होते. त्या सर्वांच्या साक्षीनें, हिंदुधर्माच्या आदेशानुसार, हें दत्तकविधान यथाविधि झालें. सर्वांना पानसुपारी व शेले-पागोटीं वांटण्यांत आलीं.

दत्तक-विधानाचा हा सारा वृत्तान्त गंगाधररावांनीं इंग्रज अधिकाऱ्याकडे स्वहस्तें लिहून कळविला—आणि आपल्या पत्रांत अखेरची, विनवणी केली कीं, " या आजारांत माझें देहावसान झालें, तर आजपर्यंत मी सरकारशीं प्रामाणिकपणानें वागत आलों या गोष्टीचा विचार करून, या मुलावर सरकारनें मेहेरनजर ठेवावी. माझ्या पत्नीस, ती हयात आहे तोंपर्यंत, संस्थानची मालकीण व या दत्तक मुलाची मातोश्री समजून, संस्थानची व्यवस्था तिच्याकडे सोंपवावी. तिला कोणत्याहि रीतीनें त्रास पोहोंचूं देऊं नये. "

गंगाधररावांनीं घेतलेली ही सारी खबरदारी फुकट गेली. त्यांचें दूरदर्शी धोरण मातींत मिसळण्यासाठीं, इंग्रजांचा अघोर स्वार्थ उभाच होता. लक्ष्मीबाईस सर्व बाजूंनीं त्रास पोहोंचविण्याचा त्यांनीं जणु विडाच उचलला.

दत्तक-विधानाच्या दुसऱ्याच दिवशीं, ता. २१ नोव्हेंबर १८५३ रोजीं, गंगाधरराव निधन पावले. सारें संस्थान दुःखसागरांत बुडालें! लक्ष्मीबाईंच्या शोकास तर पारावारच नव्हता. ऐन तारुण्यांत वैधव्याची कुऱ्हाड त्यांच्या मस्तकावर पडली! संसाराची कळी अजून उमलते न उमलते तोंच ती कृतान्तानें खुडून नेली! इंग्रज पोलिटिकल एजंट त्यांच्या सांत्व-

नार्थ आला. किल्ल्यांत जाऊन त्यानें खजिन्यास मोहोरबंद कुलुपें घातलीं. आणि थोड्याच दिवसांनीं—

आपला दत्तक पुत्र दामोदरराव हा गादीवर बसेल, अशा आशेंत लक्ष्मीबाई होत्या. कारण दत्तक-विधान सशास्त्र झालेलें होतें. पण सशास्त्र काय अन् अशास्त्र काय ?—इंग्रजांच्या अधाशी स्वार्थापुढें सारें एकच ! कांहींहि कारण नसतां, कोणताहि नियम नसतां, गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यानें, केवळ नागड्या स्वार्थ-बुद्धीनें, झांशी संस्थान खालसा करण्याचें ठरविलें. वास्तविक, झांशीच्या संस्थानिकांचे इंग्रजांशीं पन्नास वर्षें संबंध मैत्रीचे ! संस्थानिकांचे हक्क वंशपरंपरा राखूं, असे तहनामे इंग्रजांनीं केलेले ! पण आप्पलपोट्या इंग्रजांना सत्यासत्याची चाड होती कोठें ? वचन-भंग त्यांच्या पांचवीस पूजलेला. तहनामे म्हणजे त्यांच्या हिशेबी केवळ कागदाचे कपटे !

रानावनांतून सैरावैरा धांवणाऱ्या माजलेल्या हत्तीनें क्षणांत एक झाड पाडावें तर क्षणांत दुसरें—तसा मोकाट कारभार डलहौसीचा चाललेला होता. या मस्त हत्तीनें मराठ्यांच्या राज्याची पेशवाईची फांदी आधीं आपल्या सोंडेनें मोडली व दूर ब्रह्मावर्तास भिरकावून दिली. आणि त्यानंतर सारें छत्रपतींचें राज्यच आपल्या पायाखालीं तुडविलें, व वर काशीस फेकून दिलें ! तो हा माजलेला हत्ती चिमुकल्या झांशी संस्थानची पर्वा काय करणार ? आणि त्या संस्थानच्या पोरसवदा राणीची भीति काय बाळगणार ? मदांध झालेल्या डलहौसीनें ता. १३ मार्च १८५४ रोजीं एक जाहीरनामा काढून असें प्रसिद्ध केलें कीं, "दामोदररावांचें दत्तक-विधान आम्हांस नामंजूर आहे; म्हणून झांशी संस्थान ब्रिटिश राज्यांत सामील करून घेण्यांत येत आहे. यापुढें झांशी प्रांतांतील प्रजेनें ब्रिटिश सरकारांस वसूल द्यावा आणि सुखी व संतुष्ट असावें."

'सुखी व संतुष्ट'! पारतंत्र्यांत सुख पावावें व संतोष मानावा ही इंग्रजांची अपेक्षा किती कनवाळूपणाची ! एखाद्या दरोडेखोरानें घर-मालकाला बेदम बडवून, त्याची चीजवस्त लुटावी व घरांतील माणसांना जखमी करावें आणि वर जातां जातां थंड वेदान्त सांगावा, "तुम्ही सुखी असा ! तुम्ही संतुष्ट असा !" तसाच निर्लज्ज प्रकार इंग्रजांनीं

चालविला होता. त्यांची भाषा साधूची होती; पण करणी कसाबाची होती. " हिंदी लोकांना शांततेचा व सौख्याचा लाभ करून देण्यासाठीं आम्हांला परमेश्वरानें येथें पाठविलें आहे." असे मायावी बोल इंग्रज मुत्सद्दी बोलत; पण त्यांचीं कृत्यें मात्र सैतानी होतीं--हिंदुस्थानला स्वराज्यहीन, शौर्यहीन, द्रव्यहीन करणारींच होतीं.

पूर्वी मोंगलांचा जुलूम हिंदुस्थानावर झाला, तो रानडुकरासारखा—उघडा व सरळ; पण इंग्रज सुधारलेले, त्यांच्या राज्ययंत्राचीं चक्रें अशा खुबीनें व सफाईनें फिरत कीं, नकळत त्यांचें दडपण हळूहळू वाढत जाई; तें इतकें कीं, अखेर त्या यंत्राखालीं सांपडलेल्या माणसाचे प्राणच जावे ! इंग्रजांच्या तोंडांत भाषा साखरी, पण हातांत मान कापणारी सुरी ! इंग्रज सरकारनें झांशी संस्थान आपल्या ताब्यांत घेतलें, संस्थानचें जडजवाहीरहि बळकावलें, फार काय, गंगाधररावांची खाजगी दौलतहि आपल्या ताब्यांत घेतली. कारण काय ? तर दत्तक पुत्र दामोदरराव अज्ञान आहे. खासगी मिळकत राणीसाहेबांना न देण्यापुरता इंग्रजांना दत्तक मंजूर ! पण संस्थान खालसा करण्याच्या वेळीं मात्र दत्तक नामंजूर ! पुढें हा दत्तक अज्ञानाचा सज्ञान झाला, तरी इंग्रजांनीं त्याला त्याच्या खासगी दौलतींतलि तनसडीहि दिली नाहीं. आणि राणीसाहेबांची व्यवस्था काय ?

राणीसाहेब राजवाड्यांत दुःख करीत बसल्या होत्या. त्यांच्या कानीं संस्थान खालसा केल्याचा हुकूम घालण्यासाठीं पोलिटिकल एजंट आला. राणीसाहेब दरबार-महालांत चिकाच्या पडद्यांत बसल्या होत्या. संस्थान विलीन केल्याचा ठराव साहेबानें वाचून दाखविला. तो ऐकतांना लक्ष्मीबाईंच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. पण क्षणांत त्यांच्या अंतःकरणांत निर्धाराचें तेज चमकलें, क्रोधानें त्यांचें शरीर थरथरां कांपूं लागलें आणि त्यासरशीं त्यांच्या तोंडून, निश्चयी स्वरांत, अशी करारी वाणी प्रगट झाली --

" मेरी झांशी नहीं दूंगी ! "

पण इंग्रज सरकार न्यायाला पारखें व दयेला पाठमोरें होतें. त्यांनीं राणीसाहेबांना झांशीच्या किल्ल्यांतून काढून शहरांतील राजवाड्यांत पाठविलें.

दरमहा फक्त पांच हजार रुपयांचा तनखा त्यांना देण्याचें डलहौसीनें ठरविलें. जी राणी व्हावयाची, तिला पेन्शनर ठरविण्यांत आलें ! केवढा अन्याय व केवढा अपमान ! तरुण व तेजस्वी राणीला तो कसा सहन होणार ? तिनें पेन्शन घेण्याचेंच नाकारलें.

हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकारी कितीहि जुलुमी व अन्यायी असले, तरी इंग्लंडांतील वरिष्ठ अधिकारी न्यायानें व सचोटीनें चालतील, अशी भाबडी आशा येथील मोठमोठ्या लोकांना परवां-परवांपर्यंत असे. पण सारे इंग्रज म्हणजे एका माळेचे मणी ! स्वार्थाच्या एकाच सुवर्ण–सूत्रांत ओवलेले ! डलहौसी म्हणजे पडद्याबाहेर दिसणारें केवळ एक कळसूत्री बाहुलें ! त्याच्या दोऱ्या ओढणारे होते इंग्लंडांतील डायरेक्टर. १८४८ सालीं डलहौसी हिंदुस्थानांत गव्हर्नर जनरल म्हणून आला; त्याच वेळीं त्याला इंग्लंडांतील डायरेक्टरांनीं कानमंत्र दिलेला होता, " दत्तक नाकारा, संस्थानें खालसा करा आणि सारा हिंदुस्थान आपल्या अंमलाखालीं आणा." याच धोरणानें पुढील आठ वर्षें डलहौसीनें आपला अधाशी कारभार केला. पण ही ' अंदरकी बात ' माहीत कोणास ? सर्वांना वाटे, इंग्रज हे जसे शरिरानें गोरे, तसेच हृदयानेंहि गोरे असतील.

या अज्ञानामुळेंच, दिल्लीच्या बादशहानें, इंग्लंडांत आपली वकीली करण्याचें काम, राजा राममोहन रॉयकडे सोपविलें, छत्रपति प्रतापसिंहानें रंगो बापूजीवर तीच कामगिरी सोपविली आणि राणी लक्ष्मीबाईनें उमेशचंद्र बानर्जी यास साठ हजार रुपये फी देऊन, आपला वकील म्हणून, इंग्लंडास रवाना केलें. त्यानें डायरेक्टर बोर्डापुढें राणीची बाजू जोरदारपणें मांडली. पण उपयोग काय ? झोपेचें सोंग घेतलेल्याला जागे कोण करील ? तेथील बोर्डानें झांशी संस्थान खालसा केल्याबद्दल डलहौसीची पाठच थोपटली !

न्याय खुंटला ! उपाय सरला ! पुढें काय ?

जप-जाप्य, पूजा-अर्चा, पुराण-श्रवण, रामनाम-लेखन आणि महालक्ष्मीचें पूजन—या पारमार्थिक कृत्यांतच राणीसाहेबांची सारी शक्ति खर्च होऊं लागली. दर शुक्रवारीं त्या उपोषण करीत व महालक्ष्मीची

प्रार्थना करीत. कोणती प्रार्थना त्या करीत असतील ? त्या प्रार्थनेनें त्या परमेश्वरापाशीं काय मागत असतील ? ती प्रार्थना त्यांच्या चित्तास कितपत शांति देऊं शकली असेल ?

★

जसें सातारा, तसें नागपूरहि भोसल्यांचेंच ! नागपूरकर भोसल्यांनीं १८०३ सालीं इंग्रजांशीं तह केला. त्या तहामुळें इंग्रजांची तैनाती फौज भोसल्यांच्या बोकांडीं बसली. तिच्या मोबदल्यांत इंग्रजांनीं कटक प्रान्त बळकावला. नागपूरच्या गादीवर १८१७ सालीं आप्पासाहेब भोसले आले. त्यांचा स्वभाव तेजस्वी व स्वातंत्र्यप्रिय होता. त्यांचें वय अवघें २१ वर्षांचें ! तरी त्यांनीं जें शौर्य व चातुर्य दाखविलें, तें केवळ विस्मयकारक !

ता. २५ नोव्हेंबर १८१७ चा दिवस. नागपूर येथें एक थाटाचा दरबार भरला. त्या वर्षीच्या फेब्रुवारींत नागपूरच्या गादीवर बसलेले आप्पासाहेब दरबारी रुबाबानें आपल्या लष्करी तळाकडे निघाले. तेथें मंत्री, सरदार, दरकदार वगैरे राज्याचे आधारस्तंभ जमले होते. त्यांच्या साक्षीनें अप्पासाहेबांना ' सेनापति ' हें पद पुण्याच्या पेशव्यांकडून अर्पण करण्याचा समारंभ झाला. जरीपटका व मानाचीं वस्त्रें पुण्याहून आलीं होतीं, तीं बहाल करण्यांत आलीं. मराठ्यांच्या संघराज्याचे आपण एक घटक आहों, असेंच या समारंभानें जाहीर केलें. या समारंभापूर्वी वीसच दिवस, ता. ५ नोव्हेंबर रोजीं, पुणें येथें दुसऱ्या बाजीरावानें ब्रिटिश रेसिडेन्सीवर अचानक हल्ला करून जय मिळविला होता. त्या पेशव्यांच्या आधिपत्याखालीं, सर्व मराठे सरदार एक होऊन, स्वातंत्र्याचा जरीपटका पुन: फडकवतील, अशा आशेनें थरारणारा तो काळ होता.

या सेनापति-पद-ग्रहणाच्या समारंभाचें मर्म व महत्त्व ब्रिटिश मुत्सद्यांनीं बरोबर ओळखलें. आप्पासाहेबांचे मंत्री रामचंद्रपंत वाघ हे नागपूरचे रेसिडेंट जेंकिन्स यांना समारंभाचें निमंत्रण द्यावयास गेले, तेव्हां साहेबबहादुरानें खडखडीत नकार दिला व त्याचें कारण स्पष्टपणें असें सांगितलें कीं, " ब्रिटिशांशीं उघड युद्ध करणाऱ्या पेशव्यांकडून सेनापतिपद स्वीकारणें म्हणजे आम्हांला युद्धाचें आव्हान देणेंच होय. "

होय, तें आव्हानच होतें—ब्रिटिश सत्तेला दिलेली ती संग्रामाची सूचनाच होती–स्वातंत्र्य परत मिळविण्याची ती ललकारीच होती. आप्पासाहेबांनीं नागपूरच्या रेसिडेन्सीवर हल्ला चढविण्याच्या उद्देशानें आपलें लष्कर सज्ज ठेवलें. पुणें व नागपूर या मराठ्यांच्या दोन्ही राजधान्यांनीं परसत्तेवर एकदमच उठाव करावा असा व्यूह रचण्यांत आला.

आणि ता. २६ नोव्हेंबर रोजीं संध्याकाळीं आप्पासाहेबांच्या अरब सैनिकांनीं ब्रिटिश रेसिडेन्सीवर हल्ला चढविला. २४ तास घनघोर युद्ध झालें. सीताबर्डीच्या एका टेकडीवरून ब्रिटिश सैन्य पिटाळून लावण्यांत आलें आणि दुसऱ्या टेकडीवरहि त्याच यशाचा ध्वज फडकला असता; पण—

ब्रिटिशांना कुमक आली आणि सीताबर्डीच्या लढाईंत भोसले हरले. तिकडे खडकीच्या संग्रामांत बाजीरावाची जी दशा झाली, तीच इकडे भोसल्यांची सीताबर्डीच्या संगरांत झाली ! ब्रिटिशांचीं नवीन पल्लेदार हत्यारें प्रभावी ठरलीं. " आमच्या शस्त्राच्या बळावर मी सारा हिंदुस्थान प्लासीच्या लढाईपासूनच आपल्या ताब्यांत ठेवला असता ! " अशी शेखी क्लाइव्हनें मिरविली होती, ती उगीच नव्हे. लांब पल्ल्याच्या बंदुका–तोफांपुढें तलवारी-भाले किती टिकाव धरणार ?

आपलें शौर्य पांगळें ठरलें, हें पाहिल्यावर आप्पासाहेबांनीं आपली ' मनसुबीची तलवार ' बाहेर काढली. मुत्सद्दीपणानें आपला पराभव गिळून ते घोड्यावर स्वार झाले आणि रामचंद्रपंत वाघ व नागोपंत या मंत्र्यांसमवेत रेसिडेंट जेंकिन्स यांच्या थेट बंगल्यावर गेले. तेथें दोघांचा समेट झाला. आप्पासाहेबांनीं रेसिडेन्सींतच राहावें व आपलें लष्कर मोडून टाकावें, असें त्या समेटांत ठरलें. जयसिंगाशीं तह करणाऱ्या छत्रपति शिवाजीमहाराजांचें स्मरण करीत आप्पासाहेबांनीं ही अपमानाची गोळी गिळली. भोसल्यांच्या नागपुरांतील राजवाड्यावर ब्रिटिशांचें निशाण फडकूं लागलें.

कोरेगांव-अष्टी-शिवनी या तीनहि रणक्षेत्रांवर, पराभवामागून पराभव खाऊन, बाजीराव ब्रिटिशांना ता. १८ जून १८१८ रोजीं शरण गेला. आप्पासाहेबांचा आधार तुटला. तरी पुनः उठाव करण्याचा व्यूह ते

रचीत राहिले. त्याची कुणकुण लागतांच, नागपूरच्या रेसिडेंटानें, अकल्पितपणें आप्पासाहेबांना व त्यांच्या दोन मंत्र्यांना पकडलें व अटकेंत ठेवलें. त्या सर्वांना ता. ३ मे १८१८ रोजीं अलाहाबादेकडे नेण्यांत आलें. तेथील मोंगलांच्या जुन्यापुराण्या राजवाडयांत त्यांना बंदोबस्तांत ठेवण्याचा हुकूम गव्हर्नर जनरलनें सोडला होता. पुनः नागपूरनें डोकें वर काढूं नये म्हणून ही योजना. कडेकोट बंदोबस्तानें आप्पासाहेबांना मंत्रिद्वयासह अलाहाबादेकडे ब्रिटिशांनीं चालविलें. पुढें घोडेस्वारांचें पथक व मागें सैनिकांच्या चार तुकडया–अशा सक्त पहाऱ्यामध्यें ब्रिटिशांनीं नागपूरच्या राजाला जन्माच्या बंदिवासासाठीं चालविलें.

तो प्रदेश डोंगराळ आहे. जंगल तर खूपच आहे. त्यांत गोंड लोक राहतात. मध्यें रामटेक आहे. तेथें एक दिवस राहण्याची इच्छा आप्पासाहेबांनीं व्यक्त केली. ' माझ्या पूर्वजांनीं बांधलेलें हें देऊळ ! तेथें एक दिवस देवाची पूजा-अर्चा मला करूं द्या; नंतर आहेच तुमच्या ताब्यांत ! ' अशी विनवणी आप्पासाहेबांनीं केली, पण छेः ! कॅप्टन ब्राऊन या ब्रिटिश अधिकाऱ्यानें साफ नकार दिला. न जाणों, राजा पळून गेला तर ?

या प्रयाग–यात्रेचा तिसरा दिवस. १६ हिंदी सैनिक कॅप्टन ब्राऊनकडे नोकरीसाठीं म्हणून आले. त्यांच्याविषयीं ब्राऊनला संशय वाटला. त्यानें प्रथम त्यांचीं शस्त्रें काढून घेतलीं; पण त्यांचा म्होरक्या गंगासिंग यानें त्याचाच जातभाई कॅप्टन डन्समूर याचें शिफारसपत्र दाखल केलें. तेव्हां कॅ. ब्राऊननें या सोळा बारगिरांना आपल्या नोकरीवर ठेवलें आणि काम सांगितलें, आप्पासाहेबांच्या तंबूवर आळीपाळीनें पहारा करण्याचें.

ता. १२ मेची रात्र. पहांटेचे दोन वाजले. सहा सैनिक आप्पासाहेबांच्या तंबूवर पहारा करीत होते. त्यांतील एकजण त्या तंबूत गेला. त्यानें आप्पासाहेबांच्या अंगावर सैनिकाचा वेष चढविला व त्यांच्या बिछान्याची गुंडाळी अशी करून ठेवली कीं, दारांतून कोणी नजर टाकली तर त्याला वाटावें, कोणी निजलेंच आहे. छत्रपति शिवाजी-महाराजांनीं आग्रा येथें राजनीतीचा जो कित्ता घालून दिला, तो राचूर

येथें त्या सैनिकांनीं सहीसही गिरविला. अंधारांत व जंगलांत ते सैनिक व आप्पासाहेब जे गडप झाले ते झालेच !

पहांटे तीन वाजतां दुसरे पहारेकरी आले. त्यांना या पलायनाचा पत्ता लागला सकाळीं. मग धांवाधांव व शोधाशोध खूप झाली सुदैव असें कीं, भारतीयांच्या पांचवीस पुजलेली फितुरी या वेळीं उमटली नाहीं. सर्वांनीं आप्पासाहेबांना साहाय्यच केलें. त्यांची राणी उमाबाई हिनेंच, पाण्यासारखा पैसा खर्च करून, सोळा सैनिक पाठवून, आपल्या पतीची सुटका घडवून आणली होती. जागोजागच्या स्वामिनिष्ठ व स्वातंत्र्यप्रेमी लोकांनीं व राजांनीं आप्पासाहेबांचें स्वागतच केलें. ब्रिटिशांनीं २ लाख रुपयांची रक्कम व १००० रुपये वार्षिक उत्पन्नाची जहागीर बक्षीस देण्याची लालूच दाखविली, तरीहि कोणी फितूर झालें नाहीं— कोणी राजाचा सुगावा लागू दिला नाहीं. धन्य—धन्य !


आप्पासाहेबांनीं पुन: ब्रिटिशांवर चढाई करण्याची खटपट खूप केली. सुमारें २० हजार सैनिक त्यांनीं जमविले. पंचमढीच्या गोंडापासून लाहोरच्या रणजितसिंगापर्यंत सर्वांचें सहकार्य त्यांनीं मिळविलें. पण ब्रिटिशांचें लष्करी बळ भारी ठरलें. इंग्रजांनीं अशीरगडचा किल्ला सुमारें दोन महिने वेढा देऊन, आपल्या ताब्यांत घेतला. हेतु हा कीं, त्यांत आश्रयार्थ राहिलेल्या आप्पासाहेबांना पकडावें. पण त्यांनीं त्यांच्या हातावर केव्हांच तुरी दिल्या होत्या. एका गोसाव्याच्या रूपानें ते गांवोगांव हिंडूं लागले. फिरतां फिरतां ते जोधपूरला जाऊन पोंचले. तेथील महाराजांनीं या ‘ नागपूरनाथा’चें आदरानें स्वागत केलें.

“ आये हो शरण जान मानकमधेशमोको ।
मानत हुं धन्यधन्य ऐसो अवसर में ॥ ”

असें म्हणून महाराजांनीं आप्पासाहेबांना आमरण आश्रय दिला. ता. १५ जुलै १८४० रोजीं, वयाच्या ४४ व्या वर्षी, हा शूर—चतुर स्वातंत्र्य-भक्त राजा मरण पावला.

★

४ सिंहासनें वितळलीं



जें महाराष्ट्रांत; तेंच पंजाबांत !

'पंजाबचा सिंह' म्हणजे रणजितसिंह ! तो जितका पराक्रमी तितकाच मुत्सद्दी ! शिखांचे शत्रु मुसलमान ! त्यांना नामोहरम करण्या-

साठीं रणजितसिंहानें इंग्रजांशीं स्नेहसंबंध जोडला. दोघे दोस्त बनले. पण या दोस्तीचें बीज इंग्रजांनीं कसें केलें ?

रणजितसिंह मरण पावला. त्याच्या गादीवर कोणी बसावें, याविषयीं शीख सरदारांत तंटे पेटले. लगेच इंग्रज पुढें सरसावले. त्यांना कोणी ते तंटे तोडण्याचा मक्ता दिलेला नव्हता. पण स्वार्थ ! इंग्रजांना वाटे, आपला जन्म हिंदुस्थानांतील तंटे तोडण्यासाठींच आहे. त्यांच्यायु रोपांत, खुद्द इंग्लंडांत, काय तंटेबखेडे थोडे होते ? अगदीं राजाचें मुंडकें छाटण्यापर्यंत होते. परंतु त्याकडे पाठ फिरवून, इंग्रज लोक, येथें व्यापारी म्हणून आले, पण सशस्त्र ! त्या शस्त्रांच्या जोरावर त्यांनीं भांडखोर शिखांना पाणी पाजलें, आणि रणजितसिंहाचा मुलगा दिलीपसिंह याला गादीवर बसविलें.

दिलीपसिंह अज्ञान !—अवघा चौदा वर्षांचा ! त्याचा राज्यकारभार कोण पाहणार ? त्याची आई, राणी जिंदा जिवंत होती. पण आईपेक्षां इंग्रजांचें प्रेम अधिक ! इंग्रज अधिकारी हाच दिलीपसिंहाचा पालक झाला—पंजाबचा मालक बनला ! राजमाता जिंदा बंदिवान झाली. आपल्या मुलाविरुद्ध बंड केल्याचा आरोप तिच्यावर ठेवला—परक्या, उपऱ्या, आप्पलपोट्या इंग्रजांनीं. तिचें जडजवाहीर, दागदागिने जप्त करण्यांत आलें. तिला काशी येथें, इंग्रज अधिकाऱ्यांच्या पहाऱ्यांत, १८४८ मध्यें हरि हरि म्हणत बसावयास लावलें. तिच्या खर्चाकरितां वर्षाला दीड लाख रुपये देतों असें कबूल केलें; पण बारा हजार रुपयेच इंग्रज देऊं लागले.

सिंहासारखे शूर असे ते शीख ! आपल्या पूज्य महाराणीची दुर्दशा पाहून ते खवळले. त्यांच्या क्रोधाग्नींत तेल ओतणारें कृत्य इंग्रजांनीं लवकरच केलें. तें म्हणजे दिलीपसिंहाच्या विवाहास विघ्न ! सरदार छत्रसिंह यांच्या नातीशीं दिलीपसिंहाचें लग्न ठरलें. पण त्यामुळें शीख समाजाचें ऐक्य झालें असतें; तें इंग्रजांना नको होतें. त्यांनीं छत्रसिंहाचा अपमान केला.

एकदां छत्रसिंहाचें सैन्य मुलतानकडे जात होतें. त्या सैन्याचा मुख्य अधिकारी इंग्रजांनीं एक अमेरिकन नेमलेला होता. त्याचें नांव

कानोरा. छत्रसिंहाचें शीख सैन्य चाललें असतांना कांहीं मुसलमानांनीं त्याचा रस्ता अडविला. तेव्हां छत्रसिंहानें कानोरला हुकूम दिला, " या आक्रमक मुसलमानांवर हल्ला करा. " पण कानोरा हा गोरा! तो काळ्या शिखांची आज्ञा कसली मानतो? तो स्वस्थ राहिला. पण शीख सैनिकांनीं छत्रसिंहाची आज्ञा मानली व आड येणाऱ्या मुसलमानांवर चढाई केली.

" तोफेच्या तोंडी द्या यांना! " कानोरानें हुकूम सोडला. कारण आपल्या मर्जीविरुद्ध शीख सैन्यानें चढाई केली, हें त्याला खपलें नाहीं. गोरा रागानें लाल झाला. पण उपयोग काय?

एकाहि शीख सैनिकाला तोफेच्या तोंडीं देण्यांत आलें नाहीं. देणार कोण! सारे शीखच. बेगुन्हा शीखांना ठार करण्याचें अधम कृत्य कोणता शीख करील?

नागाच्या शेपटीवर पाय पडल्यावर काय होतें? तसे फूत्कार कानोरा सोडूं लागला. त्यानें स्वत: आपल्या हातांतील समशेरीनें एका शीख सैनिकाला कंठस्नान घातलें; आणि—

" खट्! खट्! " कानोराच्या पिस्तुलांतून गोळ्या सुटल्या. आणखी दोन शीख सैनिक धाडकन् जमिनीवर कोसळले! मग मात्र सारें शीख सैन्य बेभान झालें. त्यांनीं त्या अमेरिकन अधिकाऱ्याला, त्या उन्मत्त कानोऱ्याला, तात्काळ तेथल्या तेथें ठार केलें! त्याचे तुकडे तुकडे केले!

इंग्रजांचें राज्य साखळबंद होतें. त्या साखळींतील एक दुवा तुटला, तरी त्यामागें छप्पन्न दुवे एका सूत्रांत बांधलेले होते. एक कानोरा मेला, तर त्याची जागा घेण्यास अनेक कानोरे तयार होते. वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्यांनीं कानोराच्या कत्तलीबद्दल, छत्रसिंहाला गुन्हेगार ठरविलें व त्याला खरपूस प्रायश्चित्त दिलें. त्यांनीं त्याची सुभेदारी रद्द केली व जहागीर जप्त केली.

राजमाता जिंदा व सरदार छत्रसिंह—या दोघांवरील इंग्रजांचा हा घोर अन्याय पाहून शीख लोकांचें पित्त खवळलें. त्यांनीं इंग्रजांशीं युद्ध केलें. पण इंग्रजाजवळ तोफा-पिस्तुलें इत्यादि नवीं नवीं भारीं हत्यारें होतीं. त्यामुळें शिखांचा पराजय झाला आणि छत्रसिंह आपल्या मुलांसह इंग्रजांच्या हातीं लागला.

ता. २९ मार्च १८४९ ! शीख सत्तेचा मृत्युदिन ! लाहोर येथें दरबार भरला. त्यांत इंग्रजांनीं जाहीर केलें, " यापुढें दिलीपसिंह पंजाबचा राजा राहणार नाहीं. कारण पंजाब प्रांत कलहानें पोखरलेला आहे. त्यांत ' शांतता व सुव्यवस्था ' राखण्यासाठीं, इंग्रजांचें राज्य चालू होणें अवश्य आहे. म्हणून पंजाब प्रांत ब्रिटिश राज्यांत सामील करून घेण्यांत येत आहे. "

झालें ! शिखांचें सामर्थ्य पंगु ठरलें ! त्यांचें निशाण लाहोरच्या किल्ल्यावरून खालीं उतरविण्यांत आलें ! ब्रिटिशांचें निशाण, संगिनींच्या व तोफांच्या पहाऱ्यांत, त्या किल्ल्यावर चढलें. रणजितसिंहाच्या मुगुटांतील कोहिनूर हिरा साऱ्या जगांत अप्रतिम ! तो इंग्रजांनीं बळकावला ! दिलीपसिंहाची खासगी संपत्तीदेखील जप्त करण्यांत आली. एवढेंच नव्हे, तर त्याच्या डागदागिन्यांचा व कपड्यालत्त्यांचा लिलांव करण्यांत आला. या सर्वांची नुकसानभरपाई म्हणून दिलीपसिंहाला काय देण्यांत आलें ? तर वर्षाकाठीं फक्त चार लाख रुपये ! पण तेंहि केवळ आश्वासनच ! प्रत्यक्ष त्याच्या हातांत ऐंशी हजार रुपयेच पडत !

ही राज्य-हानि व द्रव्य-हानि किती भयंकर — किती तापदायक ! पण त्याहिपेक्षां दुष्ट व दुःखद जुलूम म्हणजे १८५३ सालीं अज्ञान असतांनाच, दिलीपसिंहाला ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्यांत आली आणि परधर्मापाठोपाठ परदेशहि त्याच्या कपाळीं आला ! १८५४ सालीं, त्याला आपल्या इच्छेविरुद्ध इंग्लंडांत नेण्यांत आलें ! तेथें एका गोऱ्या मुलीशीं त्याचें लग्न लावण्यांत आलें.

द्रव्य गेलें ! राज्य गेलें ! धर्म गेला ! देश गेला !— असा दुर्दैवी वनवास दिलीपसिंहाला जन्मभर भोगावा लागला. " जननी व जन्मभूमि-- दोन्ही स्वर्गापेक्षांहि श्रेष्ठ ! " असे उद्गार प्रभु रामचंद्रांनीं लंकेंत असतांना काढले आणि अयोध्येंत असलेल्या आपल्या आईच्या भेटीसाठीं पुष्पक विमानांतून धांव घेतली. पण बिचारा दिलीप ! त्याला आपल्या मातेला व मातृभूमीला भेटण्यासाठीं हिंदुस्थानांत येण्यास बंदी !

बिचारी महाराणी जिंदा. आपल्या वनवासी पुत्राला भेटण्यासाठीं आपल्या म्हातारपणीं इंग्लंडला गेली — आणि तेथेंच मृत्यु पावली !

मृत्युपूर्वी मायभूमीचें दर्शन घ्यावें अशी दिलीपसिंहाला अनिवार इच्छा झाली. तो इंग्लंडहून निघाला. पण–पण एडनहूनच त्याला इंग्रजांनीं सक्तीनें परत नेलें आणि अखेर तोहि त्या परदेशांतच मृत्यु पावला. मृत्युपूर्वी त्यानें पश्चात्ताप पावून शीख धर्म स्वीकारला होता. "मी इंग्रजांच्या राज्यनीतीवर विश्वास ठेवला, त्याचें मला पुरें फळ मिळालें." असे उद्वेगाचे उद्गार काढून त्यानें प्राण सोडला !

महाराज दिलीपसिंह व राजमाता जिंदा या दोघांचें तें जीवन व तो मृत्यु, कानीं येतांच सारा शीख समाज संतापानें वेडा झाला. आपल्याला पूज्य असणाऱ्या राजाला व त्याच्या मातेला, अशी विटंबना करून, इंग्रजांनीं नाहींसें केलें आणि आपला पन्नास हजार चौरस मलांचा व चाळीस लाख लोकांचा धनसंपन्न व पुराण-पवित्र प्रांत आपल्या वशाखालीं घातला, यामुळें ते शूर शीख असंतोषानें धुमसूं लागले, क्रोधानें जळूं लागले व सूडाच्या भावनेनें पेटूं लागले. इंग्रजा-विषयींच्या असंतोषाचें हें चौथें कोठार !

जी महाराष्ट्राची, जी नागपूरची, व जी पंजाबची, तीच अयोध्या प्रांताची कहाणी ! अयोध्या म्हणजे औंध ! तेथील नबाबांना व बेगमांना छळण्याचा व लुटण्याचा उपक्रम हेस्टिंग्जपासून चालत आलेला होता, तो डलहौसीनें कळसास पोहोचविला.

अयोध्येचें राज्य अत्यंत संपन्न. गंगा-यमुनांच्या पाण्यावर पोसलेलें ! त्या नद्यांप्रमाणेंच द्रव्याची तिसरी नदीहि या राज्यांत सतत वहात असे ! राजे मुसलमान असले, तरी ते राज्यकारभारांत हिंदु-मुसलमान हा भेदभाव करीत नसत. पण पानिपतच्या युद्धापासून अयोध्येच्या नबाबाचें मराठ्यांशीं वांकडें आलें. थोरल्या माधवरावांनीं नबाबाचें पारिपत्य करण्याचें योजलें. मग नबाब धांव कोणाकडे घेणार ? समस्त त्रस्त जीवांना अभय-दान देण्यासाठीं गोरे देवदूत एका पायावर उभेच होते ! नबाबाला इंग्रजांनीं पाठीशीं घातला, आपला वकील लखनौ येथें ठेवला आणि आपली तैनाती फौज अयोध्या प्रांतावर लादली. या उपकाराची फेड म्हणून नबाबाला इंग्रजांना दरमहा २ लक्ष १० हजार रुपये द्यावे लागले.

गोऱ्या उंटाचें हें पिलूं एकदां त्या प्रांतांत शिरलें, तें तेथील घरदार भराभर पाडूं लागलें. युरोपियन अधिकारी तेथें नेमले गेले, त्यांचें काम केवळ पैसे खाण्याचें ! एका गोऱ्या अधिकाऱ्यानें अवघ्या तीन वर्षांत आपल्या स्वतःच्या खिशांत तीस लाख रुपये घातले. पुढें हेस्टिंग्जनें अयोध्येच्या पडदानशीन बेगमावर बेहद्द जुलूम केला व ७६ लक्ष रुपये पिळून काढले. यामुळें हेस्टिंग्जला पुढें इंग्रजांतील बर्क व शेरिडन या वक्त्यांनीं 'राक्षस' ही पदवी दिली. नंतर फारच गवगवा झाला, तेव्हां अयोध्या प्रांताला लागलेल्या या गोऱ्या जळवा निघाल्या. संस्थानच्या अंतर्गत कारभारांत युरोपियनांनीं हात घालूं नये, असें ठरल्यानंतर तेथें पुनः समृद्धि हसूं-नाचूं लागली. दिवाण हिंदु, कोशाध्यक्ष हिंदु, नेमले गेले. सुंदर सुंदर राजवाडे व उद्यानें उभविलीं गेलीं. वजीरअल्लीच्या लग्नांत १२०० शृंगारलेले हत्ती वरातीपुढें झुलत होते. या लग्नाला २९ लाख रुपये खर्च आला. पण काय दुर्दैव ! याच वजीरअल्लीला मृत्युनंतर दफन-विधीसाठीं ७० रुपयेसुद्धां मिळले नाहींत ! याला कारण इंग्रजांची द्रव्य-तृष्णा !

इंग्रजांचा नेहमींचा डाव असा कीं, जो लायक, अधिकारी व बाणेदार असा वारस असेल, त्याच्याविरुद्ध आपल्या बगलेंतील बाहुलें उभें करावयाचें आणि कांहींहि कारण नसतां, पूर्वींचे तह मोडून व परंपरा खंडून, आपल्या केवळ सैन्याच्या पाशवी बळावर, तें बाहुलें गादीवर बसवावयाचें आणि त्याच्याकडून मनमानेल तसें द्रव्य उकळावयाचें. धडधडीत अन्याय करून, या चोंबड्या इंग्रजांनीं, वजीरअल्लीला गादीवरून काढलें आणि काशी येथें स्थानबद्ध केलें. तेथें त्यानें बंड केलें. तेव्हां त्याचा पराभव करून, इंग्रजांनीं त्याला कलकत्त्याच्या किल्ल्यामध्यें कैदेंत ठेवलें. १८१७ मध्यें तो मरण पावला, तेव्हां अनाथ कैद्याप्रमाणें त्याची वासलात लावण्यांत आली. त्याचें जागीं जें बाहुलें इंग्रजांनीं बसविलें, त्याचेकडून लाखो रुपये त्यांनीं पिळून काढले.

पण आतां इंग्रजांना पैसे उकळण्याचा कंटाळा आला होता. याचा अर्थ त्यांची द्रव्य-तृष्णा शमली होती, असा मात्र नव्हे. अग्नीला लाकडा-

चा व समुद्राला पाण्याचा कंटाळा एकवेळ येईल, पण इंग्रजांना पैशाचा वीट कधींच येणार नाहीं. पैशाचीं फुलें गोळा करण्याचे श्रम कशाला ? पैशाचें झाडच आपल्या अंगणांत लावावें, असा अधाशी मनसुबा त्यांनीं रचला. १८०१ सालीं त्यांनीं अयोध्येच्या नवाबाकडून दरसाल दीड कोट रुपये वसूल देणारा प्रांत कायमचा बळकावला ! अयोध्येचें अर्धें राज्य ईस्ट इंडिया कंपनीच्या पदरांत आपोआप पडलें ! ! उरलेला अर्धा भाग नवाबाच्या पूर्ण अधिकारांत राहिला. त्यामुळें त्यानें आपल्या राज्याची सर्वांगांनीं सत्वर सुधारणा केली.

एका नवाबानें पडीत जमिनी लागवडीस आणल्या, जमीन-महसुलाची पद्धत सुधारली, न्यायदानहि चोख ठेवलें आणि इतकें करून १८१४ सालीं, सरकारी खजिन्यांत १४ कोट रुपये शिल्लक टाकले. दुसऱ्या नवाबानें दवाखाने व अन्नछत्रें उघडलीं. पण त्यानें एक चूक केली, ती म्हणजे युरोपियन स्त्रीशीं शादी ! त्यामुळें गोऱ्या लोकांना तेथें चांगलचें फावलें. एका युरोपियन न्हाव्याला नवाबानें आपले मंत्री नेमलें ! हा नवाब विषप्रयोग होऊन मरण पावला. तेव्हां इंग्रजांना पुनः हात शिरकवण्यास संधी मिळाली. हक्कदार वारसाला बाजूस सारून त्यांनीं, आपल्या कृपेंतील भलत्या माणसाला, नवाबाच्या गादीवर बसविलें. या लबाड लुडबुडीविरुद्ध बेगमेनें बंड पुकारलें. तेव्हां इंग्रजांनीं तिच्यावर सैन्य पाठविलें आणि तिला कैद करून तुरुंगांत पाठविलें. या साऱ्या धामधुमींत इंग्रजांची उचलेगिरी एकसारखी वाढत होती, हें सांगावयास नको.

पण या संस्थानी हंसीकडून सोन्याचें एकेक अंडें घेण्याचा इंग्रजांना कंटाळा आला—त्यांनीं त्या हंसीचीच हिंसा करण्याचें ठरविलें. लॉर्ड डलहौसीनें ता. ४ फेब्रुवारी १८५६ रोजीं अयोध्येचें राज्य खाड्दिशीं खालसा केलें ! त्यामुळें कंपनीला ३०००० चौरस मैलांचा प्रदेश मिळाला, त्यांतील अर्धा कोटी लोकांवरील प्रभुत्व प्राप्त झालें व दरसाल दीड कोटी रुपये उत्पन्नाचा झरा वाहूं लागला ! पण तेवढ्यानेंहि या बकासुराची भूक भागली नाहीं. नवाबाची खासगी संपत्ति, जडजवाहीर,

कपडेलत्तें, गाड्या-घोडे, ग्रंथालयांतील मौल्यवान ग्रंथ, फार काय, बेगमांचें स्त्रीधनदेखील जप्त करण्यांत आलें.

इंग्रजांच्या या अमानुष व अन्याय्य वर्तनामुळें अयोध्या राज्यांतील सारे प्रजाजन प्रक्षुब्ध झाले. या प्रक्षोभाचें एक प्रत्यंतर म्हणजे, स्वराज्य-हानीची आगाऊ वार्ता कानीं येतांच, ता. १८ ऑगस्ट १८५५ रोजीं, प्रमुख नागरिकांची सभा भरली आणि आपलें राज्य वांचविण्यासाठीं चळवळ करण्याचें तींत ठरलें. सभेंत कासीम नांवाचा पुढारी म्हणाला, "इंग्रजांना सोन्याची व आम्हांला स्वातंत्र्याची चटक आहे. तेव्हां सरकारी खजिन्यांत आपण आपल्या खाजगीची भर घालून इंग्रजांना सोनें देऊं व आपलें स्वातंत्र्य रक्षण करूं."

एखाद्या विशाल वट-वृक्षाच्या फांद्या व पारंब्या कुऱ्हाडीनें तोडतां तोडतां अखेरीस त्याच्या बुंध्यावरच घाव घालून तें सर्व झाडच जमीनदोस्त करावें, तसें धोरण इंग्रजांनीं ठेवलें. त्यांनीं महाराष्ट्र खाल्ला, पंजाब गिळला, झांशी पायाखालीं तुडविली व अयोध्येची गादी नेस्तनाबूत केली—आणि शेवटीं हात टाकला दिल्ली नगरीवर !

दिल्ली म्हणजे अखिल हिंदुस्थानची राजधानी ! दिल्लीचा दरारा साऱ्या देशावर मोठा ! "दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा" अशी भावना सर्व लोकांची ! 'दिल्ली' या नांवांतच कांहीं जादू भरलेली आहे. पांडवांच्या काळापासून त्या नांवामध्यें पावित्र्य व आदर सांठत आलेला आहे. दिल्लीच्या तख्तावर मोंगल बादशहा बसले, तरी सर्व हिंदवासियांची मान दिल्लीपुढें लवे. पुण्याच्या पेशव्यांचा शनिवारवाडा असला, तरी त्याच्या मुख्य दरवाज्याचें नांव दिल्ली—दरवाजा ! सर्व सूर्यकमळांचीं मुखें जशीं एका सूर्याकडे वळलेलीं असतात, तशा या देशांतील साऱ्या राज्यांच्या नजरा दिल्लीकडे खिळलेल्या असत.

पेशवे एवढे पराक्रमी ! सदाशिवराव भाऊंनीं तर कांहीं दिवस आपल्या सैन्यासह दिल्लींत तळ ठोकला व तेथील रुपेरी छतावर घणाचा घाव घातला. पुनः थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दींत १७७० मध्यें मराठ्यांचा भाला दिल्लीमध्यें चमकूं लागला. दिल्लीचें बादशाहीपद पेशव्यांना सहज घेतां आलें असतें. पण तसें न करतां त्यांनीं आपल्या पसंतीचा बादशहा

सिंहासनावर बसविला. पण दिल्लीची किल्ली मराठ्यांच्या हातीं राहिली. पुढें महादजी शिंद्यांनीं दिल्लीच्या वजीराचीं वस्त्रें बादशहाकडून पेशव्यांना आणून दिलीं. पेशवे दिल्लीचे 'कर्तुमकर्तुं' धनी झाले, पण अखेर बादशहाचे वजीरच! त्याच्या तख्ताला त्यांनीं पाय लावला नाहीं. पण इंग्रजांनीं तें तख्तच पायानें ठोकरण्याचें ठरविलें.

इंग्रजांनीं १८०३ सालीं शिंद्यांशीं तह केला. त्यामुळें शिंदे गाय बनले आणि त्यांच्या मुठींतील दिल्लीचा बादशहा तर गोगलगाय झाला. इंग्रजांनीं त्याला दरसाल बारा लाख रुपयांचें पेन्शन देऊन बाजूला सारलें, आणि राज्यकारभाराचीं सारीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. १८३५ सालीं तर, त्यांनीं बादशाही शिक्क्याचें नाणें बंद केलें आणि कंपनीच्या नाण्याचा रुपया जारी केला. गव्हर्नर जनरलच्या शिक्का-मोर्तबांतील 'बादशहाचे बंदे' हे शब्द न कळत काढून टाकले. बादशहाला इतरांनीं नजराणे देण्याची चाल होती, ती बंद पाडली. अशा तऱ्हेनें बादशाहीचें एक एक पीस उपटून अखेर 'बादशहा' ही पदवीच नष्ट करून टाकली.

१८३७ सालीं बहादुरशहा हा बादशहा झाला होता. त्याची बेगम झिन्नतमहाल तरुण, सुंदर व चतुर होती. तिनें इंग्रजांचें आक्रमण थोपविण्याचा प्रयत्न केला. इराणच्या शहाला सैन्य घेऊन हिंदुस्थानांत येण्यास व इंग्रजांचा पाडाव करण्यास तिनें पाचारण केलें. इराणच्या शहाप्रमाणेंच रशियाचा झार व अफगाणिस्थानचा अमीर यांनींहि साह्यास यावें असा कट तिनें रचला. सारी दिल्ली या कटाची कुजबूज करूं लागली. राजधानीचें मुख आशेनें उजळलें गेलें. मशिदी-मशिदींतून इंग्रजा-विरुद्ध प्रार्थना होऊं लागल्या. सारा मुसलमान समाज इंग्रजांविरुद्ध चडफडूं लागला. १८५७ सालीं दिल्लीच्या गादीवर असलेला बादशहा बहादुरशहा हा वयानें ८० वर्षांवर होता. पण तोहि हिंमत धरून होता. इंग्रजांविरुद्ध उठावणी करण्यांत मुसलमान समाज हिंदूंच्या पुढें होता.

कलकत्ता येथें बसून, एखाद्या नरमांस-भक्षकाप्रमाणें, डलहौसी हा आपल्या राजकारणाच्या तप्त काहिलींत, हिंदुस्थानांतील एकेका संस्थानिकाचें सिंहासन, तुकडे करून टाकीत होता; आणि वचनभंगाचीं व भेदभावाचीं ओलीं-वाळकीं लांकडें धडाडून पेटवून, तीं वितळवून

टाकीत होता. त्यानें १८५५ मध्यें दक्षिणेंतील अर्काट हें मुसलमानी संस्थान खालसा केलें आणि त्याच वर्षी तंजावरची गादीहि जप्त केली.

तंजावरचें राज्य म्हणजे शहाजी राजांनीं स्थापन केलेलें !—महाराष्ट्रीयांच्या श्रद्धेचें स्थान ! पण राजा निपुत्रिक वारला, म्हणून संस्थान खालसा ! मृत राजाला मुलगी होती. पण मुलीला राज्यावर बसविण्याची तयारी इंग्रज सरकारची नव्हती. मात्र त्या वेळीं खुद्द इंग्लंडांत राज्य चालू होतें एका मुलीचें—राणी व्हिक्टोरियाचें. भारतीय पद्धतीप्रमाणें तंजावरची विधवा राणी दत्तक घ्यावयास सिद्ध होती, पण डलहौसी दत्तक मंजूर कोठला करायला ?


अशाच थातुरमातुरानें इंग्रजांनीं संबलपूर गिळलें, जैतपूर पचविलें, खैरपूर खाऊन टाकलें आणि ‘ पांढऱ्या सोन्याची ’ खाण असलेला—कापसानें संपन्न बनलेला वऱ्हाड प्रांत हां हां म्हणतां, आपल्या मांडीखालीं घातला. अवघ्या ४५ लाख रुपयांच्या कर्जाच्या पोटीं, निजामाला वऱ्हाड इंग्रजांना द्यावा लागला. एखाद्या खादाड माणसानें आपल्या हातांतील अडकित्त्यानें सुपारीचीं खांडें करून तीं तोंडांत टाकण्याचा सपाटा लावावा, तसा हा डलहौसीचा हिंदुस्थान लाटण्याचा अत्याचार चालू होता.

असे लहान-मोठे कैक प्रांत डलहौसीनें आपल्या आठ वर्षांच्या कारकीर्दींत खालसा केले. हिंदुस्थानच्या नकाशावर ब्रिटिशांचा लाल रंग फासणारा ‘ झटपट रंगारी ’ म्हणजे लॉर्ड डलहौसी ! कोट्यवधि लोकांच्या भावनांची पायमल्ली त्यानें बेदरकारपणें केली. त्यामुळें ते सारे लोक इंग्रजी राज्यावर दांतओठ खाऊं लागले—मुठी वळूं लागले !

इंग्रजांच्या दृष्टीनें सारा भारत देश हा संतापानें रटरटा शिजणारा एक ज्वालामुखीच बनला. तो जागृत केव्हां होणार ? त्याचा स्फोट केव्हां होणार ? त्यांतून आगीसारखा जळणारा लाव्हा रस केव्हां वाहूं लागणार ?

★

७ चिरा न् चिरा निखळला



" तारवाला जसे खिळे, तसे राज्याला किल्ले ! " असें शिवाजी राजे बोलले. खिळे निघाले कीं जहाज बुडालें; तसें किल्ले गेले कीं राज्य संपलें, हा त्यांचा भावार्थ ! किल्ले मजबूत, तर राज्य मजबूत !

त्याहिपेक्षां सैनिक हे कोणत्याहि राज्याचे मुख्य आधार–खरे रक्षणकर्ते ! जहाजाला जसे असंख्य खिळे, तसे राजाला अगणित सैनिक ! खिळे निघालेल्या तारुंमध्यें समुद्राचें पाणी भराभर आंत शिरतें, तसे सैनिक बंड करून उठले म्हणजे सर्व राज्यामध्यें राजद्रोह पसरतो व अराजक माजतें. कोणत्याहि दौलतीचे खांब म्हणजे सैनिक !

त्यांतहि परक्या राज्याचे तर सैनिक म्हणजे प्राण ! परक्या राजाविषयीं आस्था, आदर व आपलेपणा कोणास वाटेल ? परका म्हणजे नकोसा, हा जात्याच स्वभाव-धर्म ! म्हणून परके राजे आपली सत्ता सैनिकांच्या बळावर, बंदुकांच्या जोरावर, स्थापन करतात व टिकवून धरतात.

इंग्रजांनींहि हिंदुस्थानांत हेंच केलें. व्यापारी म्हणून आले आणि ते राजे झाले. पण त्या जिंकलेल्या राज्याच्या रक्षणासाठीं लागणारें सारें गोरें सैन्य इंग्लंडहून येथें आणणें शक्य होतें काय ? गोरे थोडे पण येथलेच काळे शिपाई पुष्कळ. त्यांच्याच साहाय्यानें इंग्रजांनीं हिंदुस्थान जिंकला. किंवा त्यांनीं कसला जिंकला ? हिंदी शिपायांनींच, हिंदी शिपायांशीं लढून, हिंदुस्थान इंग्रजांना जिंकून दिला. कशासाठीं ? केवळ पोटासाठीं !

आपल्या पोटाला जो भाकरी देईल, त्याची चाकरी करावयाची, एवढेंच हिंदी शिपायाला माहीत. "ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी" हेंच एक त्याच्या जीवनाचें सूत्र ! त्यापुढें राष्ट्राचा अभिमान नाहीं, धर्माचें बंधन नाहीं कीं नात्याचा जिव्हाळा नाहीं. आपल्या धन्यासाठीं इमानें-इतबारें लढावयाचें व त्यासाठीं प्राणहि द्यावयाचे हा त्याचा सद्गुण; पण तसें करतांना आपण स्वदेशावर किंवा स्वधर्मावर निखारा ठेवीत आहों कीं काय, याचा विचार त्याला नसे. मोठमोठे ज्ञानवंत व धनवंत सरदार व संस्थानिक जेथें स्वदेशाचा व स्वधर्माचा विचार करीत नव्हते, तेथें अडाणी व अकिंचन शिपायीगड्याचा पाड काय ? आमचेकडे होती फक्त स्वामिनिष्ठा–राष्ट्रनिष्ठा मुळींच नव्हती-–कोणांतच नव्हती.

अशा पोटार्थी शिपायांना इंग्रजांनीं हाताशीं धरलें, आपली शिस्त व कवायत शिकवून तयार केलें आणि मुख्य म्हणजे आपल्या नव्या-

नव्या शस्त्रांनीं सज्ज केलें शिपायांना संतुष्ट करण्याचा एक मोठा गुण इंग्रजांपाशीं होता. आणि तो म्हणजे पगार वक्तशीर देणें. त्या वेळीं शिपायांचा पगार तो कितीसा असणार? फक्त पांच रुपये! पण तोहि पेशव्यांना कधीं वेळेवर देतां आला नाहीं आणि त्यामुळें सारें गाडें उलटलें. पण इंग्रजांनीं या भाडोत्री हिंदी सैनिकांना वक्तशीर पगार देऊन खूष राखलें. एवढेंच नव्हे, तर पलटणींतील गोरे अधिकारी सुट्टीच्या वेळीं हिंदी शिपायांबरोबर गप्पा मारीत, खेळ खेळत, आणि म्हाताऱ्या हिंदी सैनिकांना मानहि देत. त्यामुळें इंग्रजांच्या पलटणींत मद्रासी, मुसलमान व पुरभय्ये यांची भरती आरंभीं खूपच झाली.

हिंदी सैनिक इंग्रजांशीं किती संतुष्ट व स्वामिनिष्ठ होते, आणि त्यामुळें देशाभिमानाला किती पाठमोरे बनले होते, याचें प्रत्यंतर अर्काटच्या वेढ्यापासून आलेलें आहे. त्या वेढ्यांत १७५१ सालीं इंग्रजी फौज सांपडली असतांना तिच्यावर उपासमारीचा प्रसंग ओढवला, तेव्हां हिंदी सैनिकांनीं आपला शिजविलेला भात इंग्रजांना दिला व त्यावरील नुसती पेज स्वतः पिऊन दिवस काढले. पुढें १७५७ सालीं प्लासी येथें क्लाईव्हची बंगालच्या नबाबाशीं मोठी लढाई झाली. तेव्हां क्लाईव्हजवळ फक्त ९०० इंग्रज सैनिक होते आणि इंग्रजी कवायत शिकलेले १२०० मद्रासी शिपायी होते. त्याच्याच बळावर क्लाईव्ह यशस्वी झाला. पुढें १७६६ सालीं येथील कांहीं इंग्रज सैनिकांनीं व अधिकाऱ्यांनीं ईस्ट इंडिया कंपनी-विरुद्ध बंड पुकारलें. गोरे उलटले, परंतु हिंदी सैनिक मात्र स्वामिनिष्ठच राहिले. मान कापली तरी इमान चळणार नाहीं, इतके ते विश्वासाचे होते.

पण अशा इमानी हिंदी सैनिकांचाहि विश्वास पायापासून गदगदा हलावा, असें धोरण इंग्रज अधिकारी आखूं लागले. एक एक संस्थानिक व एक एक जमीनदार घशांत घातल्यामुळें त्यांचें पोट तट्ट फुगलें. आपलें आसन पक्कें झाल्याची त्यांना खात्री वाटली. म्हणून त्यांनीं आपली गोड भाषा व नम्र वर्तणूक यांचें सोंग मागें घेतलें आणि आपलीं लपविलेलीं नखें बाहेर काढलीं. "आपण मोठे शूर-चतुर-सुसंस्कृत-प्रत्यक्ष देवदूतच!" अशा भावनेचा कैफ त्यांच्या डोक्यांत चढूं लागला. "हम करेसो कायदा" हा जेत्याचा दर्प त्यांच्या चित्तांत भरूं लागला. ते हिंदी

राजांना कस्पटासमान मानूं लागले आणि हिंदी सैनिकांनाहि कःपदार्थ लेखूं लागले. त्यांच्या भावनांची व आकांक्षांची पायमल्ली ते करूं लागले, फार काय, त्यांचा पाणउताराहि करूं लागले.

या बदललेल्या बेमुर्वतखोर धोरणाचें वर्णन सर थॉमस मन्रो यानें गव्हर्नर जनरलला १८१८ सालीं लिहिलेल्या पत्रांत प्रांजलपणें केलें आहे. तो म्हणतो, " परक्या जेत्यांनीं जित लोकांना नेहमीं अत्याचारानें व क्रौर्यानेंच वागविलें आहे हें खरें, पण आम्ही ज्या तुच्छतेनें हिंदी लोकांना वागवितों, तसें कोणीच वागविलें नसेल. सर्व राष्ट्रच्या राष्ट्र अविश्वासू आहे, अप्रामाणिक आहे आणि कुचकामाचें आहे, असें डांबर आमच्याप्रमाणें कोणीच फासलें नसेल. ब्रिटिशांच्या अधिराज्याचा हिंदुस्थानावर परिणाम काय होणार ? त्यांतील सर्व जनतेचा अधःपात हाच—त्या जनतेचा उद्धार नव्हे. राज्य-कारभारापासून जनतेला आम्ही जितके वंचित केलें, तितकें दुसऱ्या कोणत्याहि विजेत्यानें ठेवलें नसेल. राष्ट्रीय स्वातंत्र्य व राष्ट्रीय दानत यांचा आम्ही चक्काचूर केला !"

साध्या साध्या गोष्टी दिसतात, पण त्या जीवनांत रुतून बसलेल्या असतात. म्हणून त्यांना धक्का लागला कीं, अनर्थ ओढवतो. डोक्यावरील पगडी काय, कपाळावरील गंध काय, किंवा कानांतील बाळ्या काय ? किती क्षुद्र गोष्टी ! पण त्यांच्यामागें प्राचीन परंपरा होती, धार्मिक भावना होती, सामाजिक प्रतिष्ठा होती. म्हणून इंग्रजांनीं हिंदी शिपायांच्या डोक्यावर टोपी बसविली, कपाळावरील गंध लावण्यास मनाई केली आणि कानांत बाळ्या घालण्यास बंदी घातली, तेव्हां हिंदी शिपायांमध्यें मोठी चलबिचल झाली.

त्याचप्रमाणें सैन्यांतील कर्नल, कॅप्टन, लेफ्टनंट वगैरे अधिकाराच्या जागा खास युरोपियनांकरितां राखून ठेवलेल्या असत. हिंदी सैनिकांनीं कितीहि मर्दुमकी दाखविली, तरी त्या जागेवर त्यांना नेमत नसत. ही विषमताहि विषासारखी हिंदी सैनिकांच्या अन्तःकरणाला जाळत असे. त्यांच्या रहाण्याच्या बराकीहि पशूंच्या गोठ्यासारख्या असत. साऱ्या सुखसोयी गोऱ्या सोजिरांना !

इंग्रजांच्या दृष्टीनें सारा हिंदुस्थान एकच! तो जिंकण्यासाठीं ते कोणत्याहि प्रांतांतील सैनिक कोठेंहि पाठवीत. मद्रासची फौज ते बंगालमध्यें जरूर तेव्हां नेत व बंगालची फौज पंजाबमध्यें नेत. फार काय, त्या वेळीं परदेश असलेल्या ब्रह्मदेशांत व अफगाणिस्तानांतहि ते त्यांना पाठवीत. हिंदी शिपायी इंग्रजांसाठीं काबूलवर चालून गेले. तो डोंगराळ प्रदेश, ती कडक थंडी आणि त्यांत अफगाणांनीं केलेली ती ससेहोलपट! एकूण इंग्रजांचे १७००० सैनिक काबुलाहून पराभूत होऊन निघाले. पण हिंदुस्थानांत येऊन जलालाबादेस पोचला फक्त एकच सैनिक– आणि तोहि लंगडा होऊन! असें प्राणसंकट डोळ्यांसमोर असतांनाहि हिंदी फौजा १८४२ सालीं पुनः अफगाणिस्थानावर चालून गेल्या व त्यांनीं काबूल काबीज केलें. तसेंच १८४३ सालीं त्यांनीं सिंध प्रांतहि इंग्रजांना जिंकून दिला.

अशा दूरदूरच्या लढाया मारतांना हिंदी शिपायांना जादा भत्ता मिळत असे. पण सुस्थिर झालेल्या इंग्रज सरकारनें तो भत्ता एकदम बंद केला, त्यामुळें शिपायांचा असंतोष भडकला. हा जादा भत्ता बंद करूं नये असा आग्रह इंग्रज सेनापतीनें धरला, आणि त्यासाठीं आपल्या नोकरीचा राजीनामाहि दिला. पण ग. ज. डलहौसीनें आपला हट्ट तडीस नेला! एवढेंच नव्हे, तर जादा भत्त्यासाठीं चळवळ करणाऱ्या सैनिकांच्या पुढाऱ्यांना १०।१० वर्षांच्या सक्त मजुरीच्या शिक्षा ठोठावल्या! — कांहीं जणांना तर काळ्या पाण्याच्याहि! यामुळें हिंदी सैनिक फारच नाराज झाले.

हिंदी लोकांचें एक मर्म-स्थान आहे. तें इतकें नाजूक आहे कीं, त्याला थोडासा जरी धक्का लागला, तरी त्यांचें सारें जीवन खवळून उठतें. असा धक्का लावण्याची चूकहि याच सुमारास इंग्रजांनीं केली. ती चूक म्हणजे धर्म-भावनेवर आघात! ती धर्म-भावना योग्य असो वा नसो, पण तिच्यावरील घाव म्हणजे आपल्या प्राणावरीलच घाव, असें हिंदी सैनिकांनीं मानलें.

तो काळच तसा होता. केवळ हिंदुस्थानांतच नव्हे, तर जगांतील सर्व देशांत धर्म-भावनेचें प्राबल्य असे. धार्मिक रूढि, समजुती, चालीरीती या सर्वांचा विलक्षण प्रभाव त्या काळीं सर्वत्र पडलेला होता.

धर्म-सत्ता हीच सार्वभौम सत्ता होती. सर्व मानव-जातीवर एकच साम्राज्य जर कोणाचें तेव्हां चालत असेल, तर धर्म-भावनेचें ! आणि या धर्माच्या पोटांत काय येत नव्हतें ? खावें काय—प्यावें काय; कोठें जावें,—कोठें बसावें; कोणाशीं बोलावें,—कोणाला शिवावें; कोणाशीं सोयरिक जोडावी,—कोणाशीं मैत्री राखावी—इत्यादि व्यवहारांतील साध्या साध्या गोष्टींपासून जन्म-लग्न-मृत्यूसारखे संस्कार, देव-देवतांच्या जत्रा-यात्रा, पूजा-अर्चा, उ सत्र-समारंभ हें सारें कांहीं धर्माच्या पोटांत सामावलेलें असे. जीव, जग व जगन्नाथ यांचा संबंध जोडणारें तत्त्वज्ञान हा खरा धर्माचा गाभा ! पण त्याचा विचार सर्वसामान्य लोक करतात कशाला ? त्यांची सारी भक्ति धर्माच्या बाह्यांगावरच ! त्यांत जरा इकडचें तिकडे झालें कीं, आकाश कोसळलेंच !

सिंह एवढा शूर—बलाढ्य हत्तीचें गंडस्थळ फोडणारा ! पण त्याच्या छातीची जागा किती नाजूक ! तेथें सौम्यसा प्रहारहि केलेला त्याला सोसत नाहीं. तसें हिंदी शिपायांचें हळवें स्थान म्हणजे त्यांचा धर्माभिमान ! ते स्वतःचा अपमान गिळीत, पण ज्याला ते धर्म मानीत होते, त्याचा अवमान अणुमात्रहि त्यांना सहन होत नसे. समुद्र-गमन निषिद्ध आहे, अशी एक धर्म-भावना ! ती कां, केव्हां आली कोण जाणे. आर्यांनीं पूर्वीं थोडें का समुद्र-पर्यटन केलें ? जावा-सुमात्रांतील देवांच्या मूर्ति व मंदिरें आजहि त्याची साक्ष देत आहेत. पण केव्हां तरी, कोणी तरी, कशामुळें तरी, बंदी घातली कीं, हिंदी माणसानें समुद्र ओलांडून जाऊं नये —गेल्यास पाप लागेल.

झालें ! तोच धर्म नियम बनला अगदीं अचल ! अढळ ! अभंग ! धर्माची आज्ञा म्हणजे वज्रलेप ! प्राण गेला, तरी ती मोडायची नाहीं, असा धर्म-भोळ्यांचा कर्मठ निग्रह ! त्या धर्माज्ञेची शहानिशा आपल्या बुद्धीनें करणें व तिची युक्तायुक्तता ठरविणें म्हणजे अब्रह्मण्यच ! डोळे मिटून, बुद्धि बांधून, मन मारून ती धर्माज्ञा पाळणें हा त्यांचा जणुं स्वभाव-धर्म बनला होता. त्याला डिवचणारा हुकूम इंग्रजांनीं काढतांच, हिंदी शिपायांनीं स्वामिनिष्ठेची सीमा ओलांडून, बंडाची फणा उभारली !

१८२४ सालीं, इंग्रज सरकारनें ब्रह्मदेशाशीं युद्ध पुकारलें. त्यासाठीं हिंदी सैनिकांना तिकडे जाण्याचा हुकूम सुटला. हे सैनिक जेव्हां सैन्यांत नोकरीस लागले तेव्हां नोकरीच्या करारनाम्यांत असें कलम स्पष्ट होतें कीं, हिंदुस्थानाबाहेर तुम्हांला लढण्यासाठीं पाठविण्यांत येणार नाहीं. तें कलम इंग्रजांनीं मोडलें. त्यामुळें हिंदी लोकांच्या धर्माज्ञेचाहि भंग झाला. समुद्र-प्रवास घडल्यास आपण धर्म-भ्रष्ट होऊं, अशी भीति हिंदी सैनिकांना वाटूं लागली.

तें परलोकचें भय ! — अदृश्य, म्हणूनच अघोर ! ! इहलोकच्या मूर्त भयापेक्षां अधिक भयंकर ! " येथें काय त्रास व्हावयाचा असेल तो होवो, पण परलोकांतील त्या यमाच्या यातना नकोत. " अशी भावना बळावली. त्यामुळें बराकपूर येथील हिंदी शिपायांनीं ब्रह्मदेशाला जाण्याचा हुकूम मोडला व बंडाचा बावटा उभारला. लष्करी शिस्त मोठी कडक ! आज्ञा-भंग म्हणजे प्राण-भंगच ! तत्काळ इंग्रजांनीं तोफा डागल्या व शिपायांचें हें पहिलें चिमुकलें बंड धुळीस मिळविलें.

चुकून, सद्हेतूनें इंग्रजांनीं एखादी धार्मिक सुधारणा केली, तरी हिंदी लोकांना संताप येई. विधवा स्त्रियांना विवाहाची मोकळीक देणारा कायदा १८५६ सालीं इंग्रज सरकारनें केला. त्याबरोबर, " आमच्या धर्मांत हात घालणारे तुम्ही कोण ?" असा प्रश्न हिंदु-समाज विचारूं लागला. आमच्या धर्मशास्त्रामध्यें व धर्माचारामध्यें लुडबुड करण्याचा म्लेंच्छ इंग्रजांना काडीमात्र हक्क नाहीं, असें हिंदु पंडित बोलूं लागले.

त्याचप्रमाणें, त्याच वर्षीं इंग्रजांनीं दुसरा एक कायदा केला, तो तर हिंदु लोकांना आपल्या धर्मावर पडलेली कुऱ्हाडच वाटला. हिंदुस्थानांतील कोणत्याहि धर्माचा माणूस बाटून ख्रिस्ती झाला, तरी त्याचा आपल्या वाडवडिलांच्या जिंदगीवरील वारसा हक्क कायम ठेवणारा हा कायदा होता. त्यामुळें धर्मांतराला मोकळी वाट करून देण्यांत आली. याची चीड हिंदु-मुसलमान वगैरे सर्व धर्मांच्या लोकांना आली.

आणखी एक क्षुल्लक घटना. तुरुंगांतील कैद्यांना पूर्वीं आपल्या घरचे खासगी लोटे वापरण्यास मुभा असे. ती बंद करून सरकारनें पत्र्याचीं टिनपाटें ठेवलीं. त्यामुळें कैद्यांचा धर्म बाटतो, अशी समजूत

ज्या सरकारी भांड्यांतून महार कैदी पाणी प्याला असेल, त्यांतूनच पुढें ब्राह्मण कैद्याला पाणी प्यावें लागणार. हा केवढा भ्रष्टाकार ! असें तेव्हां वाटे. आमच्या सनातन धर्माला हे इंग्रज लोक एकेक सुरुंग लावीत चालले आहेत, असा बळकट संशय हिंदी जनतेला येऊं लागला. हिंदी लोकांच्या या जिव्हाळ्याच्या जागेवर प्रखर प्रहार करणारें कृत्य याच वेळीं इंग्रज सरकारच्या हातून घडलें. त्याचा परिणाम हिंदी सैनिकावर विलक्षण झाला. १८५७ च्या जानेवारींत एके दिवशीं दुपारीं---

' महाराज, मला फार तहान लागली आहे. पाणी पिण्यास आपला लोटा देतां का ? " एक चांभार कळवळून म्हणाला.

" माझा लोटा अन् तुला ? मी ब्राह्मण, अन् तूं शूद्र ! तुला लोटा देऊन मी तो बाटवूं होय ? " ब्राह्मण शिपायानें उत्तर दिलें. तो स्नानासाठीं विहिरीवर आला होता.

" नका ! नका ! लोटा बाटवूं नका आणि तुम्हीं पण बाटूं नका. मला पाणी देऊं नका. पण भटजीबुवा, आतां जपून असा. यापुढें आपलें सोवळें टिकवून धरा. इंग्रजांच्या जात्यांत तुमचा तो धर्म नि तुमचं तें सोवळें भरडून देऊं नका म्हणजे झालें "

" अरे, म्हणतोस तरी काय ? "

" मी काय म्हणणार महाराज ? हे साता समुद्रापलीकडून आलेले फिरंगी आपणा सर्वांना एकजात खिस्ती करून टाकीत आहेत. "

" कशावरून, तूं हें कशावरून म्हणतोस ? "

" मी खरं तेंच म्हणतों आहें. अहो बामणदादा, हा डमडम इथं काडतुसं करण्याचा नवा कारखाना निघाला आहे ना ? त्यांतील काडतुसांना चरबी चोपडलेली असते. "

" चरबी ? अन् ती कोणाची ? "

" अहो गाईची– "

" काय ? आमच्या परमपूज्य गोमातेची ? "

" अन् त्याबरोबरच डुकराचीदेखील. "

" मुसलमानांचीहि धर्मभावना मेलीच कीं ! "

" यांत काय संशय ? हीं नवीं काडतुसें शिपायांना दातानें तोडून बंदुकींत भरावीं लागतील. "

" याचा अर्थ हिंदु सैनिकांच्या जिभेला गो-मांसाचा विटाळ होईल अन् मुसलमान सैनिकांच्या ओठांना डुकरांचें मांस लागेल. दोघांचे दोन्ही धर्म बुडाले. हर हर ! मग जगून काय करायचं ? "

अशी जाज्वल्य धर्मभावना त्या वेळीं सर्वांची होती. विजेच्या तारेला हात लावला कीं धक्का बसावा, त्याप्रमाणें जनतेच्या धर्म-भावनेला स्पर्श केला कीं, राज्यालाच हादरा बसावा, असा तो काळ होता. त्यांतहि इंग्रज पडले परके !—तशांत जेते ! म्हणून बेगुमानपणें ते हिंदी जनतेच्या धर्म-भावनेचे नाजुक तंतु तोडूं लागले. त्यामुळें हिंदी-सैनिकांना आपल्या हृदयाचेच तंतु कठोरपणें तोडले गेल्याइतकें दुःख झालें. तीव्र संतापाची जळती लाट साऱ्या सैन्यांत पसरली. प्रत्येकाच्या अंतःकरणांत चिडीची भावना धगधगून पेटली. आणि—

ता. २९ मार्च १८५७ रविवारचा दिवस ! दुपारची वेळ. इंग्रज अधिकारी आपापल्या बंगल्यांत विश्रांति घेत होते. परंतु संतप्त सैनिकांना विसावा कोठला ? शांतपणा कोठला ? बऱ्हामपूर येथील एका पलटणीनें हीं धर्म-भ्रष्ट करणारीं नवीं काडतुसें वापरण्याचें नाकारलें. त्यांनीं कवायतच केली नाहीं. तेव्हां त्यांच्या अधिकाऱ्यानें ती पलटण बराकपूरला नेली. तेथील सैनिकहि चरबीच्या काडतुसांमुळें खवळलेले होतेच. पण त्या सर्वांनीं आपला संताप आवरला होता. असा संयम सर्वांनाच कसा साधणार ? ते सैनिक तरुण होते, शूर होते व धर्मनिष्ठ होते. त्यामुळें संतापाचा संयम करणें त्यांना कठीण वाटत होतें. त्यांतहि एका तरुण सैनिकाच्या भावना अगदीं अनावर झाल्या. एका हातांत तलवार व एका हातांत पिस्तूल घेऊन तो आपल्या बराकीच्या बाहेर पडला. त्या वेळीं त्याचे डोळे क्रोधानें लाल झाले होते. त्याची मुद्रा मृत्यूला आव्हान देणारी होती. एखाद्या सावजावर झडप घालणाऱ्या वाघाप्रमाणें त्याचे डोळे चंचल झाले होते.

तो आपल्या सैनिक बांधवांना ओरडून सांगत होता, " अरे, स्वस्थ कां बसलां आहांत ? हे फिरंगी तुमचा धर्म मातीस मिळवीत

आहेत. गायीची चरबी लावलेलीं हीं काडतुसें तुम्ही आपल्या हातांत धरणार काय ? दांतांनीं तोडणार काय ? मग आपण हिंदु कसे ? गो-मातेच्या मांसाचा स्पर्श आपल्या जिभेला कोणता हिंदु घडवील ? तसें करणें म्हणजे आपल्या धर्माच्या मानेवर सुरी फिरविणें होय–रौरव नरकांत पडणें होय. " धर्मप्रेमानें बेहोष झालेल्याचा या तरुणाचें नांव मंगल पांडे !

त्याला वाटेंत एक बिगुलवाला भेटला. त्याला पांडेनें सांगितलें, " अरे, फुंक. बिगुल जोरानें फुंक ! जमव, सारे सैनिक येथें जमव. धर्मासाठीं मारूं किंवा मरूं, असा संदेश मी त्यांना देणार आहें. " बिगुलवाला स्तब्ध उभा राहिला. पण त्याची त्या संतप्त तरुणाला काय पर्वा ? आगीच्या वावटळीप्रमाणें वेगानें तो पुढें चालला.

पुढें त्याला वाटेंत एक इंग्रज अधिकारी दिसला. लगेच त्यानें त्याच्यावर गोळी झाडली. ती त्या अधिकाऱ्याला लागली नाहीं, पण ही बातमी लेफ्टनंटला कळली. ती बातमी बंदुकीच्या गोळीपेक्षांहि त्याला घातक वाटली. तो घोड्यावरून दौडत तेथें आला. त्याच्यावरहि पांडे यानें गोळी झाडली. पण ती त्याच्या घोड्याला लागली. घोडा पडला व त्याबरोबर लेफ्टनंटहि जमिनीवर कोसळला ! पण तो तत्काळ उठून उभा राहिला. त्यानें पांड्यावर गोळी झाडली तिचा नेम चुकला,असें दिसतांच, तलवार उगारून तो लेफ्टनंट पांड्यावर धांवला. त्याच्या मदतीला एक इंग्रज अधिकारी होता. त्या दोघांशींहि एकटा मंगल आपल्या तलवारीनें सामना देत होता––त्यांना रक्त-बंबाळ करीत होता.

हें खड्ग-युद्ध अपूर्व होतें. ४०० शिपाई विस्फारित नेत्रांनीं तें पाहात होते—पण नुसतें पाहात होते. त्या दोघां युरोपियनांना वांचवि-ण्यास ते पुढें आले नाहींत. कारण ते स्वत: इंग्रजावर नाराज होते. पण त्याबरोबरच, दोघा इंग्रजांशीं एकाकी सामना देणाऱ्या मंगलच्या मदतीसहि ते धावले नाहींत. कारण त्यांनीं अजून उठावणीचा निश्चय केलेला नव्हता. मनांतून मात्र ते त्याला " भले भले " म्हणत होते. एक भारतीय दोघा युरोपियनांना भारी होता !

आतां ते दोघे युरोपीय अधिकारी जमिनीवर कोसळणार —प्राण सोडणार; इतक्यांत, एका मुसलमान सैनिकाच्या पोटांत राजनिष्ठेला भरती आली. त्यानें मंगलचा हात मागच्या मागें गच्च धरून ठेवला. मंगलच्या तलवारीनें त्याच्या हाताला जखम झाली, तरी त्यानें मंगलचा हात सोडला नाहीं. मंगल अडकला! रक्तबंबाळ झालेले ते गोरे अधिकारी आपला जीव मुठींत घेऊन बंगल्याकडे पळत सुटले. मगच मंगलला त्या मुसलमान सैनिकानें सोडलें.

साऱ्या लष्करांत हलकल्लोळ माजला. इंग्रज अधिकाऱ्यावर हिंदी सैनिक हत्यार उगारतो याचा अर्थ काय? सेनापतीला आपलें नाकच कापल्यासारखें वाटलें. तो आपल्या दोन मुलांना बरोबर घेऊन त्वेषानें व वेगानें तेथें घोड्यावरून धांवत आला. त्यानें आपला घोडाच मंगलच्या अंगावर घातला. आपलें मरण ओढवलें हें मंगलनें ओळखलें. पण त्याला मरणाचें भय काय? प्राण ओंजळींत घेऊनच तो निघाला होता. लगेच त्यानें आपलें पिस्तुल स्वतःच्या छातीवर रोखून उडविलें. तो रक्तबंबाळ होऊन जमिनीवर पडला, पण मेला नाहीं-बेशुद्ध झाला. दवाखान्यांत त्याची प्रकृती सुधारली. तेव्हां त्याच्यावर लष्करी कोर्टांत खटला भरण्यांत आला. खटल्याचा निकाल दुसरा काय व्हावयाचा?—फांशी!

ता. ८ एप्रिल रोजीं सर्व पलटणीसमोर मंगलला फांशीं देण्यांत आलें! तेव्हां कलकत्त्याहून चार मांग बोलावण्यांत आले! कारण त्याला फांशी देण्यास तेथील कोणी मांग पुढें येईना.

मंगल हुतात्मा ठरला!

ज्या तळ्याच्या कांठीं मंगलला फांशी दिलें, तें स्थान सैनिक पवित्र मानूं लागले!

मंगलची संध्या करण्याची जीं भांडीं होतीं, त्यांची पूजा सैनिक करूं लागले.

सैनिकांना आपला संताप प्रगट करण्याचा एक नवाच मार्ग दिसला. मंगलनें त्यांना प्रतिकाराचा धडाच घालून दिला. त्याचें तें मृत्युंजय असें एक कृत्य म्हणजे शौर्याचीं लाख व्याख्यानें होतें!

लष्करी शिस्त म्हणजे पोलादी कांब ! तीहि वाकूं शकते हें मंगलनें दाखविलें. इंग्रज हा अजिंक्य आहे–त्याच्यावर आपण हात उगारूं शकत नाहीं, ही भावना चिरेबंदी, तटबंदीप्रमाणें भक्कम होती–अभेद्य होती. तिचा भेद मंगलनें केला. भक्कम तटबंदीहि धडाधड् कोसळली. सिंहाची आयाळहि ओढतां येते, अग्नीचे निखारेहि मुठींत धरतां येतात, तसे अन्यायी इंग्रजाला आपण जमिनीवर लोळवूं शकतों, अशी नवीच आत्मविश्वासाची शक्ति हिंदी सैनिकांमध्यें संचरूं लागली.

मंगलच्या एकाकी आततायी कृत्याचा परिणाम इंग्रज अधिकाऱ्यावर काय झाला ? सेनापतींनें इंग्रज सरकारला अशी शिफारस केली कीं, सैनिकांना चरबी न लावलेलीं काडतुसें द्यावींत. खरोखर स्थिति अशी होती कीं, चरबी लावलेलें एकहि काडतुस तोंपावेतों हिंदी सैनिकांना दिलेलें नव्हतें. पण तें दिलें जाणार या भुमकंनेंच साऱ्या सैनिकांत बेदिली निर्माण झाली. आपल्या सैन्याचा चिरा न् चिरा निखळत आहे, हें गव्हर्नर जनरलनें ताडलें आणि त्यानें मीरत येथील मुख्य सैन्याधिकारास हुकूम पाठविला कीं, चरबी लावलेलीं काडतुसें कोणालाहि देऊं नयेत. पण त्या सैन्याधिकाऱ्याला जादा गुर्मी होती. त्यानें गव्हर्नर जनरलला कळविलें, सैन्यांत शिस्त राखण्याच्या दृष्टीनें हा हुकूम आपण परत घ्यावा.

त्या वेळीं गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग हा होता. तो स्वभावानें शांत व दयाळू होता. इंग्लंडच्या मुख्य प्रधानाचा तो मुलगा. तेथील कॉलेजांत उच्च शिक्षण घेतलेला तो उमदा तरुण होता. त्यानें आपल्या हाताखालील अधिकाऱ्याचा सल्ला ऐकला व आपला हुकूम परत घेतला. इभ्रतीच्या भलत्या भावनेला तो बळी पडला नाहीं. पण त्यानें आपला हुकूम कायम ठेवला असता आणि नवीं काडतुसें वापरण्यास बंदी झाली असती, तर पुढील किती तरी अनर्थ कदाचित् टळले असते !

' कदाचित् ' म्हणण्याचें कारण असें कीं, काडतुसें हें केवळ एक निमित्त होतें. पण हिंदी सैनिकांची एकूण भावनाच अशी झाली होती कीं, हे परधर्मी राज्यकर्ते आपल्या धर्मावर उठले आहेत. ईस्ट इंडिया कंपनीचे एक प्रमुख डायरेक्टर इंग्लंडच्या कॉमन्स सभेंत जाहीरपणें असें

बोलले होते कीं, " हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत खिस्ताचें निशाण दिग्विजयानें फडकवावें, म्हणूनच परमेश्वरानें हिंदुस्थानचें अवाढव्य साम्राज्य ब्रिटनच्या हातीं दिलें आहे. सर्व हिंदी लोकांना किरिस्तांव करण्याच्या या दिव्य कार्यांत कोणत्याहि प्रकारची हयगय होऊं न देतां, प्रत्येकानें या कामीं आपली सर्व शक्ति उपयोगांत आणली पाहिजे. " लॉर्ड मेकॉलेनें इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार करतांना आपल्या पोटांतील हेतु स्पष्ट केला होता कीं, " तीस वर्षांत एकहि हिंदु मूर्तिपूजक राहतां कामा नये. बहिरंग हिंदूचें पण मन खिस्ती—असे सुशिक्षित सर्वत्र दिसूं लागतील. "

आणि केवळ हें नुसतें बोलणेंच नव्हतें, प्रत्यक्ष कृतीहि तशीच होत होती. इंग्रजांच्या बंदुकीमागोमाग बायबल व बाटली हिंदुस्थानांत फिरूं लागली होती. खिस्ती मिशनरी आपलें जाळें सर्वत्र पसरीत होते. त्यांतहि कोठें दुष्काळ पडला कीं, त्या जाळ्यांत शेंकडों भुकेले मासे अलगद सांपडत. बायबलाबरोबर दारूची बाटलीहि इंग्रजांनीं येथें आणली. येथील हिंदु व मुसलमान या दोन्ही धर्मांनीं मद्यपान हें महापातक मानलेलें आहे. पेशवाईंत दारूचा खप जवळ जवळ शून्य होता. पण इंग्रजी राज्याच्या कालव्यांतून दारूचे लोट हिंदुस्थानांत इतक्या प्रचंड प्रमाणावर येत राहिले कीं, आतां दारूबंदी करणें अवघड होऊन बसलें आहे—काहीं जणांना तर तें अशक्यच वाटत आहे.

बाजारा-बाजारांत उभे राहून हिंदूंच्या देव-देवतांची निंदा-नालस्ती करणाऱ्या खिस्ती मिशनऱ्यांनीं असंतोष वाढविण्यासच मदत केली. त्याचप्रमाणें आगगाड्यांमध्यें सारे लोक एकत्र बसत असल्यामुळें स्पर्शास्पर्श भावना नष्ट झाली. हाहि आपल्या धर्मावर घाला आला, असें लोकांना वाटूं लागलें. प्रगट व प्रच्छन्न अशा नाना उपायांनीं इंग्रज लोक आपल्या धर्माला आग लावीत आहेत, असा ग्रह एकदां झाला कीं, त्यांच्या प्रत्येक कृतीकडे हिंदी प्रजा त्याच संशयी दृष्टीनें पाहूं लागली. मीरत येथें अशी आवई उठली कीं, बाजारांत विकत मिळणाऱ्या कणिकेंत गायींच्या हाडांची पूड मिसळलेली आहे आणि तुपांत चरबी मिसळलेली आहे.

झालें! खरें-खोटें पाहतो कोण? सर्वांना वाटलें, आपणांला धर्म-भ्रष्ट करण्यासाठींच इंग्रजांनीं ही क्लृप्ति काढली. सर्वांचीं माथीं भडकलीं! त्यांत कोणी असा बोभाटा केला, हिंदूंचे धर्म-गुरु ब्राह्मण व मुसलमानांचे धर्म-गुरु मौलवी— अशा तीन लाख लोकांची कत्तल केली, तर सर्व हिंदुस्थान देश खिस्ती होईल; असें मत गव्हर्नर जनरलनें इंग्लंडच्या राणी-सरकारला कळविलें आहे आणि राणी सरकारनें उत्तर पाठविलें कीं, "बेहत्तर आहे तीन लाख लोकांची कत्तल उडाली तरी! पण साऱ्या हिंदी लोकांना बाटवा–आणि बाटविण्याचा प्रारंभ सैनिकांपासून करा."

अर्थात् हा सारा पत्रव्यवहार काल्पनिक होता—प्रत्यक्षांत मुळींच घडलेला नव्हता. पण पराचा कावळा व राईचा पर्वत करून दुनिया झुकविणारे लोक असतातच. स्त्रीच्या पातिव्रत्याचा संशय कोणीहि कसाहि घेतला, तरी तो जसा खपतो व फैलावतो, तशीच धर्मावरील आक्रमणाची भीति आपल्या पायानें पळत सुटते. आणि इंग्रजांचें धोरण त्या भीतीला आधार देणारेंच होतें.

"प्राण गेला तरी आम्ही या नव्या, धर्मघातक काडतुसांना शिवणार नाहीं." अशी निर्धाराची घोषणा मीरत येथील ८५ हिंदी सैनिकांनीं केली.

ता. ६ मे १८५७ रोजीं सकाळीं मीरत येथें हिंदी घोडेस्वारांच्या पलटणींची परेड होती. त्या घोडेस्वारांनीं काडतुसें घेण्याचें नाकारलें होतें. तेव्हां त्यांना अद्दल घडविण्यासाठीं मैदानावर आणलेलें होतें. समोर युरोपियन पलटणी बंदुका रोखून उभ्या होत्या. आणि जवळच मृत्यूच्या गुहा भासणाऱ्या तोफा ठेवलेल्या होत्या. लष्करी अधिकाऱ्यानें त्या हिंदी घोडेस्वारांना सवाल टाकला, "नवीं काडतुसें वापरणार कीं नाहीं?"

"नाहीं! नाहीं! नाहीं!"

"पकडा त्यांना! भरा त्यांच्यावर खटले!"

"सहा वर्षें सक्तमजुरी! दहा वर्षें सक्तमजुरी!" अशा सण-सणींत शिक्षा लगोलग ठोठावण्यांत आल्या!

ज्या हातांत सरकारी बंदुका शोभत होत्या, त्यांनाच आतां बेड्यांनीं जखडण्यांत आलें. हातांत बेड्या नि पायांतहि बेड्या! अशा थाटांत त्या धर्म वीरांना मीरतच्या तुरुंगांत पाठविण्यांत आलें!

आपले ८५ भाईबंद केवळ धर्म–प्रेमामुळें आज कैदी बनले, चोर-बदमाशांप्रमाणें तुरुंगांत डांबले गेले, याचें शल्य इतर शेकडों हिंदी सैनिकांना जाचत होतें–जाळत होतें! त्यांचें रक्त सळसळूं लागलें. धर्म-प्रेम व बंधु-प्रेम यांच्या लाटा त्यांच्या हृदयांत उसळल्या. "एक घाव नि दोन तुकडे" हा शिपाईगड्याचा बाणा! त्याला दूरवरचा विचार कोठला? कांहींहि करून आपल्या ८५ धर्मनिष्ठ बांधवांना कैदेंतून मुक्त करावयाचा निश्चय त्यांनीं केला.

"कशी करावयाची ही मुक्तता? केव्हां करावयाची ती?" प्रश्न पडला.

"रविवारीं संध्याकाळीं साहेबलोक प्रार्थनेसाठीं आपल्या प्रार्थना-मंदिरांत जातील, त्या वेळीं आपण तुरुंगावर हल्ला चढवूं आणि आपल्या सैनिक-बंधूंना मुक्त करूं." एकानें युक्ति सुचविली.

ता. १० मेचा रविवार उजाडला. उगवलेला सूर्य मावळतीकडे झुकला. संध्याकाळ झाली. चर्चमधील घंटेचे टोले पडूं लागले––त्यांचे आवाज आकाशांत पसरले. आणि त्याच वेळीं, घोडयांच्या खुरांचा टाप् टाप् आवाजहि उठला.

हिंदी घोडदळाचे शिपायी आपल्या घोडयावर स्वार होऊन मीरतच्या तुरुंगाकडे दौडत गेले. तेथें त्यांना अडविणार कोण? तुरुंगावरील पहारेकरीहि त्यांना सामील होते. धर्म-कार्यापुढें धन्याच्या हुकुमाची किंमत काय? त्यांनीं तुरुंगाचे दरवाजे उघडून दिले. तुरुंगांत टाकलेल्या ८५ सैनिकांच्या हातापायांतील बेडया लोहारांनीं तोडल्या. बंधमुक्त सैनिक घोडयावर स्वार होऊन विजयी मुद्रेनें आपल्या छावणीकडे निघाले. तेथील सैनिकांनीं तर हलकल्लोळ उडविला होता. वरिष्ठ युरोपियन अधिकाऱ्यांना गोळ्या घालून त्यांनीं ठार केलें होतें, आणि त्यांच्या बंगल्यांना आगी लावल्या होत्या. मिळेल तेवढी लूट घेऊन त्यांनीं थेट दिल्लीचा रस्ता धरला होता. 'मारो फिरंगीको! मारो फिरंगीको' अशा गर्जना सर्वत्र दुमदुमत होत्या.

हिंदी सैनिकांचें हें रौद्ररूप पाहून व विराट कृत्य ऐकून मीरतचा गोरा सेनापति अगदीं हतबुद्ध झाला. त्याची मति गुंगच झाली. त्याची धृति पार गळाली. कोणतीहि कृति करण्याचें त्राण त्याच्या अंगांत राहिलें नाहीं. २००० सशस्त्र इंग्रज सैनिक हाताखालीं असतांना आणि आग ओकणारा तोफखाना पाठीशीं असतांनासुद्धां, त्यानें त्या बंडखोर सैनिकांचा पाठलाग केला नाहीं—फार काय, युरोपियनांचें संरक्षण केलें नाहीं. सारी रात्र त्यानें परेडच्या मैदानावर जागून काढली. बंडवाल्यांनीं तुरुंगांतील इतरहि कैदी मुक्त केले होते. ते हजार-बाराशें गुन्हेगार शहरांत मोकाट सुटले—घरें जाळूं लागले व लूटमार करूं लागले. त्यांनीं अनेक गोऱ्या नागरिकांचीहि कत्तल केली.


खुद्द गोऱ्या कमिशनरच्या बंगल्यालाहि या गुन्हेगारांनीं आग लावली. तेव्हां साहेब व त्याची मंडळी वरच्या माळ्यावर लपून बसली. बंगला चोहोबाजूंनीं पेटूं लागला. ज्वाला माळ्यापर्यंत पोचूं लागल्या. साहेबाला दोन्हीकडून संकट !— माळ्यावर राहिलें, तर भस्मसात् होण्याचें व माळ्यावरून खालीं आलें, तर दंगेखोराच्या तावडींत सांपडण्याचें !

अशा वेळीं त्याचा माळी त्याच्या मदतीस धांवला. तो मोठा हुषार होता. तो स्वामिनिष्ठ माळी त्या गुन्हेगार दंगेखोरांना म्हणाला, "अरे, येथें काय आहे ? खरा खजिना व मोलाची मालमत्ता त्या पलीकडच्या बंगल्यांत आहे." हें ऐकतांच दंगेखोरांनीं दुसऱ्या बंगल्याकडे मुसंडी मारली आणि त्या स्वामिनिष्ठ माळ्यानें साहेबाला कुटुंबीयांसह इंग्रजांच्या छावणींत नेऊन सोडलें. कांहीं नागरिकांनींहि इंग्रजांच्या बायका-मुलांना आश्रय दिला. फितलेल्या सैनिकांनींहि नाहक हत्या केली नाहीं, पण गुन्हेगार दंगेखोरांनीं मात्र रात्रभर हैदोस घातला. त्यांत मृत्यु पावलेल्या इंग्रजांचीं प्रेतें दुसरे दिवशीं नाटक-गृहांत जमा करण्यांत आलीं.

सैनिकांच्या त्वेषाचा हा पहिला स्फोट !

★

६ चलो दिल्ली



मीरत ते दिल्ली!— ३६ मैलांचें अंतर! पण तें तीराप्रमाणें धांवत निघालेल्या हिंदी सैनिकांनीं रातोरात काटलें. झाडावर लोंबकळणाऱ्या मधाच्या मोहोळावर दगड फेकावा आणि त्यांतून असंख्य

गांधीलमाशा आपल्याला चावावयास येतील म्हणून एखाद्यानें धूम ठोकावी, तशी त्वरा त्या मीरतच्या सैनिकांनीं केली आणि सोमवारची सकाळ उजाडण्याच्या आंत दिल्ली गांठली ! त्यांच्या युद्ध-चातुर्याची ही पहिली चुणूक !

'दिल्ली गांठली' याला फार मोठा अर्थ होता. "ज्याच्या हातीं ती राजधानी; तो सर्व राष्ट्राचा धनी." अशी भावना त्या काळीं असे. राजधानी म्हणजे राष्ट्राचें हृदय ! ती ज्यानें सर केली तो सत्ताधीश. म्हणून जिवाची पर्वा न करतां, रात्रीच्या अंधाराची तमा न धरतां, त्या सैनिकांनीं आपलीं घोडीं दिल्लीपलीकडे दामटलीं आणि ता. ११ रोजीं सकाळीं दिल्लींत प्रवेश केला. येतां येतां वाटेंत जेथें तारायंत्राच्या तारा दिसल्या; तेथें त्या त्यांनीं तोडून टाकल्या. इंग्रजी राज्यकारभाराच्या नाड्याच तुटल्या. त्याची चौकशी करण्यासाठीं एक इंग्रज अधिकारी यमुनेच्या पुलाकडे गेला, तों तेथें बंडवाले उभे! त्यांनीं त्या इंग्रज अधिकाऱ्याला तत्काळ ठार केलें. त्यांनीं पूल ओलांडला आणि पुलाच्या दोन्ही बाजूंस आपले चौकीपहारे बसविले.

दिल्ली काबीज करण्याइतकेंच दिल्लींतील बादशहा मुठींत घेणें महत्त्वाचें होतें. त्याच्या नांवाला विलक्षण वजन होतें. तो वयानें म्हातारा व सत्तेनें शून्य असला, तरी त्याच्या शब्दाला किंमत होती. म्हणून ते प्रतापी सैनिक ' लाल किल्ल्या 'कडे दौडत गेले. म्हाताऱ्या बादशहाच्या अंगीं इंग्रजांविरुद्ध बंड करण्याची हिंमत नव्हती. तो ' लाल किल्ल्यां 'त लपून बसला; किंबहुना, इंग्रज अधिकाऱ्याला त्यानें संरक्षणासाठीं बोलाविलें. पण ' लाल किल्ल्या 'वरील सैनिकांनीं मीरतच्या सैनिकांना किल्ल्याचा दरवाजा उघडून दिला. मग काय ?

" दीन ! दीन ! " करीत ते बंडखोर सैनिक ' लाल किल्ल्यां 'त घुसले—' दिवाण-ई-आम 'मध्यें शिरले —' दिवाण-ई-खास 'मध्यें संचार करूं लागले—आणि दिसेल त्या इंग्रजाची कत्तल उडवूं लागले—त्यांच्या बायकांनाहि त्यांनीं जीवें सोडलें नाहीं. तुरुंग उघडला गेला ! बँक लुटली गेली ! चर्च जमीनदोस्त झालें ! आणि ते सैनिक बादशहापुढें जाऊन उभे ठाकले.

बादशहा मनांतून थरथरा कांपत होता. त्याला कुर्निसात करून सैनिक अदबीनें म्हणाले, " जहांपन्हा, आपण तख्तावर बसावें—आमचें पुढारीपण स्वीकारावें, आपल्या नांवानें आम्ही दिल्ली जिंकूं—सारा हिंदुस्थान जिंकूं. इंग्रजी राज्याचें येथून पार उच्चाटन करूं. "

पण बादशहाला मनांत वाटलें, " इंग्रजांचें सामर्थ्य केवढें! शस्त्रें केवढीं! त्यांचा पाडाव ही एक घोडदळाची तुकडी काय करणार?" तेव्हां त्यानें सैनिकांना नकार दिला,—पण दुसऱ्या निमित्तानें. त्यानें उत्तर दिलें, " भाईहो, माझ्याजवळ पैसा कोठें आहे? खजिन्यांत सारा खडखडाट आहे. मी तुम्हांला पगार कोठून देऊं? "

" ती फिकीर बादशहांनीं करूं नये. साऱ्या हिंदुस्थानांत जेथें जेथें म्हणून ब्रिटिशांचे खजिने आहेत; तेथें तेथें जाऊन आम्ही ते सारे खजिने लुटूं आणि त्यांतील दौलत खाविंदांच्या पायापाशीं आणून ओतूं. आपण फक्त आमच्या युद्धाचीं सूत्रें तेवढीं हातीं घ्यावीत. "

बादशहाला नाहीं म्हणवेना. त्याची तरुण बेगम झिन्नतमहाल इंग्रजांवर जळत होती—क्रांतीच्या भावनेनें तिची वृत्ति थरारलेली होती—क्रांतिकारकांना ती साहाय्यहि करीत होती.

या वेळीं दिल्लींत इंग्रजांजवळ सुमारें ३५०० सैनिक होते आणि शिवाय तोफखानाहि होता. दारूगोळा तर प्रचंड प्रमाणावर सांठविलेला होता. पण उपयोग काय? सैनिकांचीं माथीं भडकलीं होतीं—मनें फिरलीं होतीं—शस्त्रें उलटलीं होतीं. दिल्ली शहरांत मीरतचे सैनिक घुसूं लागले, तेव्हां इंग्रज अधिकाऱ्यांनीं आपल्या हाताखालील हिंदी सैनिकांना हुकूम सोडला, " गोळ्या झाडा! "

गोळ्या झाडल्या गेल्या—पण त्या इंग्रज अधिकाऱ्यांवरच—मीरतच्या हिंदी सैनिकांवर नव्हे! संध्याकाळपर्यंत दिल्लींतील बहुतेक सारे हिंदी शिपायी बंडखोरांना सामील झाले. त्यापूर्वी त्यांनीं आपल्या इंग्रज अधिकाऱ्यांना कापून काढलें.

' लाल किल्ला ' घेतला, बादशहा वश केला, शहरावरहि कबजा बसविला, आतां फक्त इंग्रजांचें दारूचें कोठार घ्यावयाचें राहिलें. तेथें बंडवाले जाऊन पोहोंचले. कोठाराच्या रक्षणासाठीं पांचसातच इंग्रज तेथें

होते. त्यांनीं ओळखलें, आतां या बंडखोरापुढें आपली धडगत नाहीं. त्यांच्याहातीं दारूगोळ्याचा हा प्रचंड सांठा पडला, तर आपल्या सत्तेला मोठाच धोका उत्पन्न होईल. तो टाळण्यासाठीं त्या देशाभिमानी इंग्रजांनीं एक अचाट धाडस केलें.

त्यांनीं एक काकडा पेटविला आणि कोठारांतील दारूवर फेकला. त्यासरशीं प्रचंड स्फोट झाला—एखाद्या भूकंपासारखा !- एखाद्या ज्वालामुखीसारखा ! आवाजानंतर धुराचे लोट नि आगीचे लोळ आकाशाला जाऊन भिडले आणि त्यांतून बंदुकांच्या गोळ्या व तोफांचे गोळे असंख्य उडाले. ते देशभक्त इंग्रज तर भस्मसात् झालेच, पण जवळजवळ एक हजार बंडवाले ठार झाले—आणि शहरांतील चारपांचशें नागरिकहि प्राणास मुकले ! तरीसुद्धां बंडवाल्यांना दिल्ली येथें बंदुकीच्या नऊ लाख गोळ्या व बंदुकीच्या दारूचीं दहा हजार पिपें मिळालीं. याशिवाय हजारो बंदुकाहि त्यांच्या हातीं पडल्या.

पण याहिपेक्षां त्यांना दिल्लींत मोठा लाभ झाला तो म्हणजे, 'एक नेता, एक निशाण व एक नीति.' त्यामुळें क्षणांत बंडाचें रूपांतर क्रांति-युद्धांत झालें. साऱ्या दिल्ली शहरांत बंडखोरांनीं इंग्रजांना "दे माय धरणी ठाय" करून सोडलें !

'काश्मीर दरवाजा'जवळील एका लहानशा इमारतींत सारे इंग्रज धाकधूक करीत बसले होते. संध्याकाळ झाली. रात्र पडली. तीस फूट खोल असलेल्या खंदकांत इंग्रज सैनिक उतरले- त्यांचीं बायकामुलें उतरलीं. खंदकाचा दुसरा तट चढून ते वर गेले. पण बायका-मुलांना, रात्रींच्या वेळीं, तीस फूट कसें चढतां येणार ? एक दोर लावून इंग्रजांनीं त्यांना वर चढविलें. आणि मग सारेजण जंगलांत गडप झाले. तेथून लपतछपत, कोणी मीरतला गेले, तर कोणी अंबाल्याला पोंचले. कांहीं तर रस्त्यांतच मेले. वाटेंत हिंदु-मुसलमान गांवकऱ्यांनीं भूतदयेनें या भयभीत इंग्रजांना आसरा दिला व अन्नहि दिलें.

ता. १० रोजीं मीरतचा उद्रेक !

ता. ११ रोजीं दिल्लींत प्रवेश !

ता. १२ रोजीं बादशहाच्या नांवाची द्वाही !

असे एकामागून एक विजय हिंदी सैनिकांना मिळत गेले. तोंपर्यंत 'ईस्ट इंडिया कंपनी' बादशहाची मुनीम म्हणून कारभार करीत होती. पण बहादुरशहानें गादीवर बसतांच पहिलें फर्मान असें काढलें कीं, "या परधर्मी व बेइमान इंग्रजाला आम्ही बडतर्फ केलें आहे, तरी यापुढें कंपनीची आज्ञा कोणीहि मानूं नये. कंपनी बंडखोर आहे. आमच्या हुकुमाप्रमाणें हिंदुस्थानांतील सर्व प्रजाजनांनीं चालावें."

"काफर इंग्रजांच्या जुलुमामुळें सध्यां सर्व हिंदु आणि मुसलमान प्रजा पिळून निघत आहे हें सर्वांना ठाऊक आहेच. प्रमुख हिंदु व मुसलमान लोक कित्येक दिवसांपूर्वीं धर्मपालनासाठीं घरेंदारें सोडून मजकडे आले आहेत आणि त्यांनीं चालू असलेल्या धर्मयुद्धांत भाग घेऊन ब्रिटिश सत्ता मुळासकट उखडून टाकण्याचा निकराचा यत्न चालविला आहे." असा जाहीरनामा हिंदुस्थानांतील शहराशहरांत लागला. दुसऱ्या जाहीरनाम्यांत सैनिकांनीं असा आत्मविश्वास प्रगट केला कीं, "जर शिपायांनीं एकी केली, तर गोरे लोक म्हणजे महासागरांतील एक थेंब आहेत. बंधूंनो, ही परकीयांची कट्यार आपण आपल्या हातानें आपल्या शरिरांत खुपसून घेत आहोंत. ती फेकून द्या. आपण जर उठाव केला, तर यश ठेवलेलें आहे."

अशीं फर्मानें एकामागून एक निघूं लागलीं. दिल्लीहून निघालेलीं तीं बादशाही फर्मानें वाचून हिंदी लोकांना पूर्वींच्या मोंगल बादशाहीची आठवण झाली. पूर्वींप्रमाणेंच ठिकठिकाणांहून सैनिकांच्या तुकड्या दिल्लीकडे कूच करूं लागल्या. तेथें ता. ११ मेपासून ७ जूनपर्यंत २७ दिवस बादशहाचें-म्हणजे बंडखोरांचें राज्य-अबाधित चालू होतें.

"खुल्क – इ – खुदा
मुल्क – इ – पातशाह
हुक्म – इ – सीपाह"

अशी दवंडी गांवोगांव पिटली गेली. इंग्रजांच्या अन्यायानें व जुलुमानें गांजलेले व पिळलेले जे कोट्यवधि लोक होते, त्यांनींहि या बंडखोर सैनिकांना सहानुभूति दाखविली व यथाशक्य सहाय्यहि केलें.

यांत हिंदु-मुसलमान असा भेदभाव नांवालाहि नव्हता. सर्व एक झाले होते. मुसलमानच आघाडीवर होते.

हिंदु-मुसलमानांच्या वादाला, कलहाला व रक्तपाताला दीर्घकाल कारण झालेली गोष्ट म्हणजे गोहत्त्या! पण दिल्लीच्या बादशहांनीं गोहत्त्या कायद्यानें तावडतोब बंद केली. बरेलीच्या नबाबानें हीं ऐक्यभावना आळवितांना असें जाहीर केलें कीं, " ब्रिटिशांना हिंदुस्थानाबाहेर काढण्यास जर हिंदूंनीं मदत केली, तर मुसलमान लोक गायी मारण्याचें बंद करतील व गायीचें मांस डुकराच्या मांसाप्रमाणेंच वर्ज्य मानतील."

या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या यज्ञांत इंग्रजी सत्तेचा बळी द्यावा, म्हणून हिंदु-मुसलमानांनीं आपल्या भेदभावाची आहुति टाकली -- आणि त्याची खूण म्हणून गोहत्त्या निषिद्ध मानली; एवढेंच नव्हे, तर दिल्लीच्या बादशहांनीं आपल्या राज्याधिकारावरहि पाणी सोडण्याची तयारी दाखविली. त्यांनीं जयपूर, जोधपूर, बिकानेर इत्यादि संस्थानांच्या हिंदु राजांना अशीं स्वच्छ पत्रें लिहिलीं, " माझी तीव्र इच्छा आहे कीं, कांहींहि करून, कांहींहि पणास लावून, फिरंग्यांना हिंदुस्थानाबाहेर घालविलें पाहिजे. संपूर्ण हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा हीच माझी इच्छा आहे. इंग्रजांना हिंदुस्थानांतून हांकून लावल्यावर, हिंदुस्थानच्या तख्तावर बसण्याची माझी इच्छा नाहीं. तुम्हीं सर्व हिंदु राजे शत्रूस हांकून लावण्यासाठीं जर शस्त्र उचलणार असाल, तर माझे सर्व अधिकार व अधिकार-सूत्रें, राज्यशकट चालविण्यासाठीं तुम्ही निवडून दिलेल्या प्रतिनिधि-मंडळाचे हातांत देण्यास, मी तयार आहें."

ऐक्याचें हें आवाहन राजे-महाराजांच्या हृदयाला जाऊन भिडलें. स्वातंत्र्याचें हें वारें निदान उत्तर हिंदुस्थानांत तरी शहरोंशहरीं व गांवोंगांवीं संचरलें. सैनिकांच्या पराक्रमाचे किरण रानावनांत व डोंगर-दऱ्यांत जाऊन पोहोंचले. क्रांतीची वार्ता गात गात नद्या वाहूं लागल्या. फकीर व गोसावी, मौलवी व संन्यासी, वैदू व बहुरूपी कोठून येत व कोठें जात हें कळत नसे, पण त्यांच्या मुखानें क्रांतीचा संदेश देशाच्या कोनाकोपऱ्यापर्यंत पोहोचविला गेला. इंग्रजांच्या तारायंत्रापेक्षांहि अधिक द्रुत गतीनें, क्रांतिकारकांच्या बिनपंखांच्या वार्ता प्रवास करूं लागल्या.

आणि क्रांतिकारकांनींहि आपलीं कांहीं संकेत-चिन्हें देशभर पसरविलीं. या गांवाहून त्या गांवाला चार बोटें व्यासाच्या चपात्या जात होत्या. कोणाकडून ?—कोणाकडे ?—कोणालाच माहीत नाहीं. पण ‘ उडत्या तबकड्या 'प्रमाणें या चपात्या सर्वत्र प्रवास करीत होत्या.—क्रांतीच्या ठिणग्या पाडीत होत्या—मेलेलीं अंत:करणें जागी करीत होत्या. इंग्रजी राजवटीमुळें जे निराश बनले होते, ते आशेनें उभे ठाकले आणि भ्यालेले लोक शूर बनत चालले. जशा चपात्या तसे नारळहि क्रांतीचा गूढ संदेश पसरवीत होते. आणि तसेंच तें रक्त-कमळ ! तें या हातांतून त्या हातांत जात होतें—आणि जातां जातां विजेचा संचार करून जात होतें. ‘ सब कुछ लाल हो जायगा ’ असें भविष्य तें पसरवीत होतें. गुजरातेंत तर दोन फांद्या गांवागांवाला जात होत्या.

सैनिक असो कीं संस्थानिक असो, जमीनदार असो कीं जहागीरदार असो, व्यापारी असो कीं कारागीर असो,—सर्वांचीं अंत:करणें क्रांतीच्या भावनेनें थरारत होतीं. ब्रिटिशांच्या शिस्तीमुळें जे हजारों सैनिक बेकार झालेहोते, ते व्यक्तिगत दु:खानें जळफळत होते. त्याचप्रमाणें ज्या विणकरांचे अंगठे ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं निर्दयतेनें कापून खेड्यांतील जनतेला अन्नान्नदशेस लावलें होतें, त्यांची सारखी तडफड चालली होती. हवेइतकी तलम अशी डाक्याची मलमल काढणाऱ्या विणकरांचा धंदा इंग्रजांनीं केवळ स्वार्थानें व अघोर क्रौर्यानें ठार बुडविला आपल्या मँचेस्टरमधील मलमल हिंदुस्थानांत खपावी म्हणून इंग्रजांनीं हा अमानुष अत्याचार केला. इतर ग्रामोद्योगांचीहि तीच वाट लावली. ग्रामपंचायतीची प्राचीन व्यवस्था हि पार ढासळून टाकली. या प्रजा-पीडनामुळें उद्‌भवलेला प्रक्षोभ या क्रांति-युद्धाला इंधनाप्रमाणें उपयोगीं पडला. सर्वांनीं आपला इंग्रजांवरील संताप यावेळीं प्रगट केला.

याला अपवाद थोडे होते, नाहीं असें नाहीं. कांहीं जाती आपापसांतील जुनीं वैरें विसरण्याइतक्या शहाण्या झाल्या नव्हत्या. राष्ट्राचा व्यापक विचारच त्यांच्या स्वार्थी वृत्तीला करतां येईना. पंजाब-मधील शीख हे किती शूर ! त्यांचा प्रांत इंग्रजांनीं खालसा केला, म्हणून त्यांनीं इंग्रजावर सिंहासारखें तुटून पडावयास हवें होतें, पण नाहीं.

त्यांना आठवलें मुसलमानांचें जुनें हाडवैर ! गुरु गोविंदसिंहाला, त्याच्या पुत्रांसह, ज्या मुसलमानांनीं हालहाल करून मारलें, त्यांच्याशीं सहकार्य करण्यास त्यांचें मन घेईना. तो जुना जुलूम त्यांना आठवला; पण इंग्रजांचा नवा जुलूम त्यांना जाणवला नाहीं. त्यांनीं इंग्रजांना साहाय्य केलें. इंग्रजांच्या निशाणाखालीं उभे राहून त्यांनीं स्वदेश-बांधवांवर हत्यार चालविलें.

हीच क्षुद्र वृत्ति गुरखे लोकांचीहि ! " आपण कडवे हिंदु ! शंकराचे कट्टे उपासक ! मग मूर्ति—भंजक मोंगल बादशहाशीं सख्य कसें जोडावयाचें ?" असा भ्रांत विचार गुरख्यांच्या डोक्यांत घुमूं लागला. इंग्रज काय, हिंदुधर्माचे आणि शंकराचे भक्त होते ? कीं मूर्ति-पूजक होते ? पण गुरख्यांना सुविचार सुचला नाहीं.

तीच स्थिति रजपूत लोकांची ! केवढी मानी व पराक्रमी जात ही ! सूर्य चन्द्रापर्यंत त्यांच्या वंश-वृक्षाच्या मुळ्या पोंचलेल्या ! पण सिंहासिंहांनीं आपापसांत झुंज खेळून घायाळ व्हावें, तशी दुर्दशा या रजपुतांची झाली. आपापसांतील चुरशीमुळें त्यांच्यांत एकी निर्माण झाली नाहीं. अफू, गांजा, भांग यांच्या तारेंत ते तर राहूं लागले. स्वतःच्या संस्थानासाठीं 'केशरी पोषाख ' करून धारातीर्थीं देह ठेवणारे ते रजपूत वीर-पुरुष ! आणि आपल्या शील-रक्षणासाठीं जोहार करून स्वतःचे देह जाळून घेणाऱ्या त्या वीर-रमणी ! पण ही अलोट शक्ति आंधळी झाल्यामुळें क्रांति—युद्धाला उपयोगीं पडली नाहीं. रजपूत इंग्रजांशीं राजनिष्ठच राहिले !

जसे शीख, जसे गुरखे, जसे रजपूत, तसेच मराठेहि ! मोठे पराक्रमी व स्वाभिमानी ! त्यांत छत्रपति व पेशवे या दोघांच्याहि सत्तेवरून इंग्रजांनीं नांगर फिरविलेला. त्यामुळें मराठ्यांचें रक्त इंग्रजांविरुद्ध उसळत होतें. परंतु शिंदे-होळकरासारखे संस्थानिक स्वार्थानें अन्ध झाले—— आपलें संस्थान सुखरूप राहावें म्हणून इंग्रजांशीं राजनिष्ठ राहिले. हैद्राबादचा निजाम तर इंग्रजांचा पाठीराखाच बनला. त्याचा दिवाण सालरजंग क्रांतिकारकांना पाठमोरा झाला. या पांच राजनिष्ठ जातींपैकीं एक जरी क्रांतिकारकांना मिळती, तरी इंग्रजांचें तळपट उडालें असतें.

पण हे झाले केवळ अपवाद ! बाकीचा सारा जन-समुद्र इंग्रजांविरुद्ध खवळलेला होता. दिशादिशांना उठणाऱ्या त्याच्या लाटा अस्मानाला

जाऊन भिडत होत्या. या तुफान खवळलेल्या समुद्रांत आपल्या राज्याचें जहाज केव्हां गटांगळ्या खाऊन गडप होईल, अशी धाकधूक ग. ज. लॉर्ड कॅनिंग याच्या मनांत एकसारखी होत होती. कलकत्ता येथें वास्तव्य करून तो सर्व इंग्रजी राज्यावर देखरेख ठेवीत होता. मीरत ते कलकत्ता या ७०० मैलांच्या टापूचे रक्षण करण्याची जबाबदारी त्याच्यावर होती. त्यावेळीं त्याच्याजवळ फक्त दोन गोऱ्या पलटणी होत्या. इराण, चीन, अफगणिस्तान इत्यादि देशांतील युद्धांत इंग्रज-सेना गुंतलेली होती. त्यामुळें साऱ्या हिंदुस्थानांत गोरी फौज फक्त २३०० होती. ता. २० मे रोजीं लॉर्ड कॅनिंगनें एक पत्रक काढून असें जाहीर केलें कीं, हिंदी लोकांना खिस्ती करण्याचा कंपनीचा मुळींच विचार नाहीं. त्यानंतर पांच दिवसांनीं व्हिक्टोरिया राणीचा वाढदिवस होता. तो त्यानें दरसालप्रमाणें साजरा केला. कॅनिंगचे शरीर-संरक्षक हिंदी होते, तेहि त्यानें तसेच कायम ठेवले. तो आपला राज्यकारभार धीर-गंभीर वृत्तीनें चालवीत होता.

ता. ४ जून रोजीं त्यानें सर्व उत्तर हिंदुस्थानांत 'लष्करी कायदा' जारी केला.याशिवाय खास इंग्रजांच्या ठिकठिकाणच्या सेनाहि त्यानें उत्तरेकडे खेचल्या. इराणच्या स्वारीवरून इंग्रज फौज मुंबईस आलेली होती. ती दिल्लीकडे पाठविण्याचा हुकूम कॅनिंगनें मुंबईच्या गव्हर्नरला सोडला. ब्रह्मदेशांतून एक गोरी पलटण कलकत्त्यास आलेली होती व ती परत ब्रह्मदेशास जाणार होती, पण तिला कॅनिंगनें तेथेंच ठेवून घेतलें व ब्रह्मदेशांतून आणखी एक गोरी पलटण बोलावली. इंग्लंडहून चीनकडे एक लष्करी तुकडी निघाली होती, तीहि त्यानें हिंदुस्थानांतच उतरवून घेतली. मद्रासहून दोन पलटणी पाठविण्याची आज्ञा त्यानें तेथील गव्हर्नरला दिली. क्लाइव्ह—हेस्टिंग्जच्या वेळेपासून एवढ्या कपटानें—करामतीनें—क्रौर्यानें इंग्रजी सत्तेची जी इमारत शंभर वर्षें हिंदुस्थानांत उभारली गेली, तिला बंडवाल्यांनीं चोहोबाजूंनीं आग लावल्याचें पाहतांच, ती आग विझविण्यासाठीं, जेथून मिळेल तेथून सर्व तऱ्हेची कुमक कॅनिंगनें मिळविली.

इंग्रजांची एक युक्ति या वेळीं चांगलीच फळास आली, ती म्हणजे तैनाती फौज. अनेक संस्थानांतील कलहांचा फायदा घेऊन इंग्रजांनीं आपली फौज त्यांच्या डोक्यावर बसविली होती. तिचा खर्च संस्थानिकांचा, पण तिचे

अधिकारी इंग्रज, आणि तिच्यावर हुकमतहि इंग्रजांचीच. त्यामुळें आकाशांत दूरदूर सोडलेलीं कबुतरें, हांक मारतांच, आपल्या मालकाकडे जशीं धांवत येतात, तशा या हिंदी पैशावर पोसलेल्या तैनाती फौजा इंग्रज सरकारच्या हाकेसरशीं धांवत आल्या. पतियाळा व झिंद यांच्या राजांनीं आपल्याहि पलटणी ताबडतोब रवाना केल्या. कर्नालच्या नबाबानें तर सैन्याबरोबर पैसेहि पाठविले.

कलकत्ता शहरांत जे इंग्रज व्यापारी होते, त्यांनीं आपली स्वतंत्र पलटण उभारली. कलकत्ता शहरांत इंग्रजांचा मोठा खजिना होता आणि जवळच लष्करी सामानाचे कारखाने होते. त्या सर्वांचा बंडवाल्यांपासून बचाव करणें अगत्याचें होतें. बंडवाल्यांचें वजन व वैभव नाहींसें करण्यासाठीं त्यांना दिल्लींतून हाकून लावणें जरूर आहे, असें कॅनिंगला वाटत होतें. म्हणून त्यानें आपल्या सेनापतीला हुकूम सोडला, "दिल्ली लगोलग सर करा."

सेनापति होते सिमल्याची थंड हवा खात ! मे महिना म्हणजे ऐन उन्हाळा ! उत्तर हिंदुस्थानांत तर यावेळीं आकाश आग ओकीत असतें. थंड हवेंत जन्मलेल्या इंग्रजांना तिकडे उन्हाळा काढतांना, पाण्याबाहेर काढलेल्या मासोळीच्या यातना भोगाव्या लागत. त्या कमी करण्यासाठीं, सिमल्यासारख्या थंड हवेच्या ठिकाणीं इंग्रज अधिकारी जाऊन राहात. ता. २५ मे रोजीं इंग्रज सेनापति सिमल्याहून दिल्लीला निघाला. पण वाटेंतच कॉलरा होऊन तो मरण पावला. त्याच्या जागीं सर हेन्री बर्नार्ड हा तडफदार सेनापति आला. दिल्लीवर त्यानें स्वारी केली. ती करतांना वाटेंत कोणा माणसाचा संशय आला कीं, धर त्याला अन् दे फाशी, असा सपाटा त्यानें लावला. अशा कडक धोरणामुळें बंडखोरांवर वचक बसेल, अशी त्याची अपेक्षा.


परंतु इंग्रजी सत्तेचा द्वेष हिंदी जनतेंत इतका खोलवर व दूरवर पसरला होता कीं, त्यावर बंडाच्या बातमीची ठिणगी पडण्याचा अवकाश, कीं स्फोट झालाच ! मीरतपासून ६० मैलांवरील एक गांव. रुडकी हें त्याचें नांव! तेथील ५०० सैनिकांना घेऊन एक इंग्रज अधिकारी मीरतची बंडाळी मोडण्यासाठीं गेला. पण तेथें जातांच आणि तेथील बंडाचें उग्र

स्वरूप पाहतांच तो घाबरला. त्या सैनिकांनीं आपल्या साहेबालाच गोळी घालून ठार केलें आणि दिल्लीकडे कूच केलें. त्यांचा पाठलाग गोऱ्या सैन्यानें केला, पण त्यांच्या हातीं फक्त ५० बंडखोर लागले. त्यांना इंग्रजांनीं ताबडतोब तोफेच्या तोंडीं दिलें.

मीरत, अंबाला, लखनौ इत्यादि ठिकाणांहून इंग्रज पलटणी दिल्लीकडे दौडत आल्या. इंग्रजांचा नवा सेनापति बर्नार्ड यानें, दिल्लीजवळ सहा मैलांवर, बंडखोरांच्या छावणीवर, ता. ८ जून रोजीं, हल्ला चढविला व त्यांचा पराभव केला. या चकमकींत १३७ गोरे सैनिक ठार झाले, पण बंडखोरांच्या २६ तोफा इंग्रजांच्या हातीं लागल्या. बंडखोरांनीं दिल्लीचा कबजा घेतल्यानंतर इंग्रज सैन्य तेथें येण्यास एक महिना लागला. आणि दिल्ली परत सर करण्यास तर, तीन महिन्याहून अधिक काल लागला. ता. २० सप्टेंबर रोजीं इंग्रजांनीं बंडखोरांच्या हातून दिल्ली जिंकली.



७ शस्त्रसंन्यासाचें शल्य



सामान्यतः पंजाब प्रांत शांतच राहिला. याचीं कारणें दोन. एक म्हणजे शीखांचें मुसलमानांशीं हाडवैर व दुसरें, शीख सैनिकांना

इंग्रजांनीं आपल्या सैन्यांत भरती करून घेतलेलें. तथापि मीरतच्या व दिल्लीच्या ठिणग्या पंजाबांतील कांहीं कांहीं सैनिकांचीं मनें पेटवूं शकल्या.

लाहोर येथील लष्करांत १ गोऱ्या शिपायाला ४ काळे शिपाई, असें प्रमाण होतें. तेथील किल्ल्यावर ता. १५ रोजीं हिंदी सैनिकांची नवी तुकडी पहारा करण्यास येणार होती. पहारा बदलते वेळीं दोन्ही हिंदी तुकड्यांनीं एक होऊन इंग्रजांवर तुटून पडावयाचें आणि खजिना व दारुगोळा लुटावयाचा असा कट रचण्यांत आला. तुरुंग फोडून त्यांतील कैद्यांना बाहेर काढावयाचें व त्यांच्या साहाय्यानें इंग्रजांना कापून काढावयाचें, अशीहि योजना त्या कटांत होती. पण आमचा राष्ट्रीय दोष त्या कटाच्या आड आला.

तो दोष म्हणजे फितुरी. कटाची कुणकुण इंग्रज अधिकाऱ्यांच्या कानांवर गेली. त्यानें ता. १३ मे रोजीं सर्व शिपायांना कवायतीस हजर राहण्याचा हुकूम सोडला. त्याप्रमाणें सकाळीं २५०० हिंदी सैनिक मैदानावर परेडसाठीं उभे राहिले. त्यांच्यापुढें ६०० गोरे शिपायी भरलेल्या बंदुका हातांत घेऊन खडे होते.

पण तें तिकडे काय आहे?

ते तर तोफांचे मोर्चे!

कशासाठीं ही जय्यत तयारी? कोणी शत्रु हल्ला करणार आहे काय? का बंडवालेच लढाई पुकारणार आहेत?

छेः, त्यांनीं लढाई पुकारूं नये, म्हणून ही आगाऊ सावधगिरी होती. बंडाचा नुसता संशय ज्यांच्याविषयीं आला, त्या सर्व हिंदी सैनिकांना निःशस्त्र करण्याची ही तयारी होती.

हिंदी सैनिकांनीं हत्यारें खालीं नाहीं ठेवलीं, तर त्यांना शिक्षा करण्यास इंग्रज सैनिक तयार होतेच—आणि त्यांना यमलोकीं पाठविण्यास तोफा सज्ज होत्या. पण केवळ शिक्षेच्या प्रदर्शनानेंच इंग्रजांचें काम झालें. निःशस्त्रीकरणाचा समारंभ बिमूटपणें पार पडला. इंग्रज अधिकाऱ्यांचा हुकूम होतांच, २५०० हिंदी सैनिकांनीं आपापल्या बंदुका भराभर जमिनीवर ठेवल्या. 'हूं' नाहीं कीं 'चूं' नाहीं! अशा तऱ्हेनें निःशस्त्र

होण्यापेक्षां सैनिकांची दुसरी मानहानि ती कोणती ? तिच्यापेक्षां मृत्यु फार बरा.

●

ही अपमानाची वार्ता फिरोजपूर येथें जाऊन थडकली. तेथील हिंदी शिपायांत बेदिली निर्माण झाली, हें कळतांच इंग्रज अधिकाऱ्यानें गोरे सैनिक व काळे सैनिक यांना निरनिराळ्या ठिकाणीं ठेवलें. तेथील दारूच्या कोठारावर हिंदी शिपायांचा पहारा होता; तो बदलून त्यांच्या जागीं १०० गोऱ्या शिपायांना नेमण्यांत आलें. सर्व हिंदी शिपायांना परेडसाठीं मैदानावर बोलावण्यांत आलें.

या परेडचा अर्थ काय, हें आतां हिंदी सैनिकांना पक्कें कळलें होतें. लष्करी पोषाख करून व खांद्यावर बंदुक टाकून सकाळच्या वेळीं हिंदी सैनिक निघाले, पण कोठें ? कवायतीच्या मैदानाकडे ? छेः ! दारू-गोळ्याच्या कोठाराकडे ते निघाले ! कोठाराच्या भिंतीवरून चढून ते आंत उतरले, परंतु पुढें गोऱ्या सैनिकांचा खडा पहारा होता. त्यांच्यावर हिंदी सैनिकांनीं हल्ला केला. पण तो दिव्यावरील पतंगाची झेप ठरला. इंग्रज सैनिकांनीं हिंदी सैनिकांची सररहा कत्तल केली !

या वार्तेनें फिरोजपूरचा बाजार खवळला. सारे लोक इंग्रजांवर जळफळूं लागले. त्यांनीं इंग्रजांचे बंगले जाळले, त्यांच्या प्रार्थना-मंदिरांना आगी लावल्या आणि त्यांचीं उपाहारगृहें खाक करण्यांत आलीं. साऱ्या शहरांत हाहाःकार उडाला. इंग्रजांचा सूड घेण्यासाठीं सारे हिंदी नागरिक दांत-ओठ खाऊं लागले. त्यांचे हात वळवळूं लागले, पण त्यांची संस्कृति इतकी उच्च कीं, इंग्रज स्त्रियांना व मुलांना त्यांनीं हात लावला नाहीं.

●

लाहोरनंतर जसें फिरोजपूर, तसेंच पेशावरहि उठलें. तेथील छावणींत २००० इंग्रज सैनिक होते, तर ७६०० हिंदी शिपाई होते. त्यामुळें इंग्रज सेना-नायकांना बंडाची भीति वाटूं लागली. ती दूर करण्याचा त्यांचा एक शीघ्र व अमोघ उपाय म्हणजे निःशस्त्रीकरण !

ता. २२ मे रोजीं सकाळीं सर्व सैनिकांना कवायतीच्या मैदानावर हजर राहाण्याचा हुकूम सुटला. सैनिक हजर राहिले. हिंदी सैनिकांनीं हत्यारें खालीं ठेवण्याचा हुकूम मानला नाहीं, तर त्यांच्यावर अचूक गोळ्या झाडतां येतील, अशा सोयीस्कर जागीं इंग्रज पलटणी उभ्या होत्या. तोंपर्यंत विश्वासू सैनिक असणारे व आपल्यासाठीं जिवावर उदार होऊन लढतील असा भरवंसा देणारे हिंदी शिपाई आतां इंग्रजांच्या दृष्टीनें गुन्हे-गार ठरले. तुरुंगांतील कैद्यांचा दर्जा त्यांना प्राप्त झाला. मृत्यूचें भय त्यांच्या डोळ्यांपुढें नाचविण्यांत आलें. " हत्यारें खालीं ठेवा. " असा हुकूम सुटला. हिंदी सैनिकांनीं तो आपल्या कानांनीं ऐकला आणि आपल्या डोळ्यांनीं समोरच्या गोऱ्या सैनिकांचा निर्धार पाहिला व दुःखी अंतःकरणानें, लज्जित मनानें, नाइलाज होऊन, आपलीं प्राण-प्रिय शस्त्रें जमिनीवर ठेवलीं. तेव्हां त्यांना वाटलें, " आज आपलें शौर्य मातीमोल झालें ! आपलें मनुष्यपणच हिरावलें गेलें ! "

तो प्रचंड ढीग !– हत्यारांचा नव्हे, हृदयांचाच तो ! हजारों सैनिकांचीं हृदयेंच त्या ढिगांत पडलेलीं दिसत होतीं. तीं पाहून त्या शिपायांच्या प्रमुखांना भयंकर राग आला–त्वेष चढला आणि त्यांनीं तसा हुकूम नसतांहि, आपलींहि हत्यारें त्या ढिगांत टाकून दिलीं. शिपायाचें जिणें हत्याराविणें शून्यच ! सिंहाचीं नखें व नागाचे दांत काढून घेण्यासारखेंच तें ! निःशस्त्र अवस्थेंत तोंड दाखविणें कांहीं हिंदी सैनि-कांना मानवलें नाहीं. ते छावणींत परत न जातां दऱ्याखोऱ्यांत पळत गेले, पण तेथें त्यांच्यापुढें कसलें ताट वाढून ठेवलेलें होतें ?

फितुरीचें ! तेथील पहाडी लोकांनीं या स्वाभिमानी सैनिकांना धरून इंग्रजांच्या हातीं दिलें. त्यांतील एका सुभेदाराला इंग्रजांनीं सर्व शिपायांसमोर फांशी दिलें.

इंग्रजांनीं या देशांत पुष्कळ क्रूर व अधम कृत्यें केलीं. पण त्यांत माणुसकीला काळिमा फासणारीं व दुसऱ्याच्या आत्म्याचा अपमान करणारीं जीं कृत्यें आहेत, तीं अत्यंत तिरस्करणीय आहेत. सूत कातणाऱ्या विणकर लोकांचे आंगठे तोडणें हें असेंच एक तिरस्करणीय कृत्य होय. निःशस्त्रीकरण हें तसेंच दुसरें. त्यानें सैनिकांच्या अंतःकरणाला

प्राणांतिक वेदना होत असत. पण त्यांत नवल काय ? कोणत्याहि जातिवंत वीराला निःशस्त्र होणेंच नव्हें तर करणेंसुद्धां सहन होणार नाहीं. वुड नांवाचा पेशावर येथील एक गोरा सेनाधिकारी याच वृत्तीचा होता.

आपल्या विश्वासू सैनिकांना शस्त्र-संन्यास करण्यास लावण्यापेक्षां त्याला स्वतःचा प्राण-संन्यास करणें सुखाचें वाटलें. सतीचें वस्त्र-हरण, तसें सैनिकांचें शस्त्र-हरण—सज्जनांनीं उघड्या डोळ्यांनीं पाहूं नये, या विचारानें वुडसाहेब आपल्या खोलींत गेले—आणि आपलेंच पिस्तुल, आपल्या छातीवर रोखून, त्यांनीं आप-खुशीनें मरण स्वीकारलें !

वीर-पुरुषाचें बलिदान – वाया कसें जाईल ? हिंदी सैनिकांचीं मनें बेहोष झालीं. त्यांनीं गोऱ्या सैनिकांवर गोळीबार सुरू केला आणि नंतर ते पहाडांत शिरले. पण तेथील राजानें त्यांना आसरा दिला नाहीं. त्यांचा पाठलाग करीत गोरे सैनिक तेथें आले. चकमक उडाली. १२० बंडखोर ठार झाले, ४०० जखमी झाले व १५० कैद झाले. कांहीं काश्मीरकडे पळाले, तर कांहीं तुर्कस्तानाकडे वळले. पण चोहोंबाजूंनीं त्यांना इंग्रजांनीं घेरलें आणि ठार केलें.

कैद झालेल्या ४० बंडखोरांना फांशी देण्याचा हुकूम इंग्रजांनीं सोडला. ता. १० जून रोजीं हा सामुदायिक फाशी—समारंभ कवायतीच्या मैदानावर व्हावयाचें ठरलें. तो पाहण्यासाठीं सर्व शिपायांनीं हजर रहावें असाहि हुकूम सुटला. त्यांच्यावर वचक बसविणें हा तर या राक्षसी क्रौर्याचा मुख्य हेतु. त्याप्रमाणें ते सारे शिपाई तेथें जमले, हें साहजिकच. पण काय गंमत ! पेशावरमधील हजारोंहजार नागरिकहि त्या मैदानावर गोळा झाले, जणुं कांहीं एखादा कौशल्याचा, शौर्याचा, अभिमानाचा खेळच तेथें होणार होता.

होय, तेथें खेळ झाला !—मृत्यूचा खेळ झाला ! ४० तोफा रांगेनें ठेवलेल्या होत्या ! प्रत्येक तोफेच्या तोंडाशीं एकेक सैनिक बांधून ठेवलेला होता. सेनाधिकाऱ्यानें इशाऱ्याचें बोट उचललें आणि लगेच साऱ्या तोफा डागल्या गेल्या. कानठळ्या बसविणारा आवाज वातावरणांत दणाणला. आणि आगीच्या लाल लोटांत ते चाळीस स्वाभिमानी सैनिक चेंडूप्रमाणें

आकाशांत उडाले. पण आकाशांतून खालीं आल्या फक्त त्यांच्या बारीक बारीक ठिकऱ्या !

●

जालंदर येथेंहि शिपायांचें निःशस्त्रीकरण व्हावयाचें ठरलें होतें. परंतु लष्करांतील गोऱ्या अधिकाऱ्यांनाच तो अत्याचार रुचला नाहीं. म्हणून शस्त्र-संन्यासाचा विधि रहित झाला. पण बंडाच्या बातम्या तेथें एकसारख्या येऊं लागल्या. तेव्हां ता. ७ जून रोजीं हिंदी सैनिकांनीं इंग्रज सेनाधिकाऱ्याच्या बंगल्याला आग लावली. सैनिकांच्या टोळ्या मोकाट सुटल्या. पण त्यांनीं कोणाहि गोऱ्याची हत्या केली नाहीं. रात्रीं एक वाजतां ते १६०० बंडखोर शिपाई जालंदरहून दिल्लीला गेले.

●

जातांना वाटेंत लुधियाना येथें भयंकर चकमक झाली. सतलज नदी ओलांडून ते जातात, तोंच इंग्रजांच्या तोफांचा भडिमार सुरू. बंडवाल्यांजवळ तोफा कोठल्या ? पण बंदुकींच्या गोळ्यांचा अग्नि-वर्षाव मात्र त्यांनीं चालू ठेवला. दोन तास घनघोर युद्ध झालें. गोरे सैनिक पळूं लागले. त्यांना साथ देणारे शीख शिपाई पळूं लागले. नाभाच्या संस्थानिकानें पाठविलेले सैनिकहि पळूं लागले. मग काय ? विजयी बंडवाले लुधियाना शहरांत शिरले. त्यांनीं तुरुंग फोडून त्यांतील गुन्हेगार कैदी मोकळे केले. त्यांनीं चर्च जाळलें, छापखाना मोडला व सरकारी इमारती जमीनदोस्त केल्या. अमेरिकन व्यापाऱ्यांचीं घरें लुटलीं गेलीं. सारीं दुकानें बंद झालीं. मिळेल तो पैसा हातीं घेऊन बंडवाले संध्याकाळीं दिल्लीकडे रवाना झाले.

नंतर आले गोरे सैनिक. मग उसळलें त्यांचें शौर्य. शहरांतील काश्मीरी शालीचे वीस मोठमोठे व्यापारी त्यांनीं पकडले व फासावर लटकविले "बैल गेला नि झोपा केला" या म्हणीप्रमाणें नंतर त्यांनीं हिंदी शिपायांना निःशस्त्र केलें. पण तसे शिपाई आतां होतेच किती ?

●

अलीगड येथें ता. २१ मे रोजीं हिंदी शिपायांनीं बंड पुकारलें. तेथील सरकारी खजिन्यांत सात लाख रुपये शिल्लक होते. खजिन्याच्या

दोघा पहारेकऱ्यांना एका ब्राह्मणानें फितविलें. पण त्याचा हा कट आधींच फुटला, त्यामुळें त्या ब्राह्मणाला फाशीं देण्यांत आलें. या ब्रह्म-हत्येमुळें हिंदी शिपायांची धर्म-भावना चेतली. त्यांनीं एकदम दंगल सुरू केली. ती पाहतांच इंग्रज सैनिक आग्र्याकडे पळून गेले. भ्याडपणा हा त्यांनाहि कांहीं परका नव्हता. गोरे पळाले, तेव्हां बंडवाल्यांना फावलें. त्यांनीं तत्काळ खजिना लुटला आणि त्यांतील सात लाख रुपये लांबविले. त्यांनीं तुरुंग फोडले व गोऱ्यांचे बंगले जाळले.

इटावा येथील प्रकार संस्मरणीय आहे. तेथील मॅजिस्ट्रेट ह्यूम नांवाचा होता. पुढें १८८५ सालीं राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना ज्यांनीं केली, तेच हे ह्यूमसाहेब! बंडाच्या वावटळींत ते चांगलेच सांपडले. ते जसे विचारी, तसेच शूरहि होते. त्यांनीं प्रत्येक रस्त्यावर खडा पहारा ठेवला. सात घोडेस्वारांना त्यांनीं कैद केलें. पण त्या स्वारांनीं एका गोऱ्या अधिकाऱ्याला ठार केलें, तेव्हां त्या बंडखोरांना मारण्यांत आलें. बंडाच्या ठिणग्या इटाव्याच्या लष्करांत पसरूं नयेत, म्हणून ह्यूमनें आपल्या हिंदी सैनिकांना दुसऱ्या शहरीं पाठविण्याचें ठरविलें.

शिपाई निघाले, पण त्यांतील बरेचसे अर्ध्या वाटेंतूनच परत आले. आले तें "बंड! बंड!" करीतच. त्यांनीं इटावा शहरांत थैमान घातलें—तुरुंग फोडला—खजिना लुटला!—आगी लावल्या! बिचारा ह्यूम काय करणार? बायकांचा वेष घेऊन त्याला पळ काढावा लागला.

अशा पराभवाच्या, वनवासाच्या व अज्ञातवासाच्या काळांत ह्यूमसाहेबाला कुमार लक्ष्मणसिंह या राजकुमारानें फार मदत केली. जुलैअखेरपर्यंत साहेब अज्ञातच होते. लक्ष्मणसिंह स्वतः बैराग्याचा वेष घेऊन, बंडखोरांत मिसळून, त्यांची बातमी आणून इंग्रजांना पोचवीत असे. यामुळें हिंदी जनतेबद्दल ह्यूमचें मत एकंदरींत चांगलेंच राहिलें. ता. २५ मे रोजीं, ग्वाल्हेरची राजनिष्ठ पलटण इटावा येथें गेली आणि त्यांनीं, बंडखोरांशीं युद्ध करून, इंग्रजांना तें शहर परत मिळवून दिलें.

मथुरेचा खजिना आग्र्याला पाठविण्याची तयारी इंग्रज अधिकाऱ्यांनीं केली. बैलगाडया भरल्या. तेव्हां एक हिंदी जमादार साहेबाला विचारूं लागला,

" हा खजिना कोठें जात आहे ? "

" आग्रा येथें. "

" नव्हे, दिल्ली येथें—क्रांतिकारकांच्या खजिन्यामध्यें ! "

" अरे हरामखोरा ! तूं आज........"

पण इंग्रज अधिकाऱ्याचें तें वाक्य पुरें झालें नाहीं. त्या हिंदी जमादाराची गोळी त्याच्या छातींत घुसली व तो मेला. मथुरेंत बंडखोरांचें राज्य सुरू झालें. इंग्रजांच्या कचेरींतील सर्व सामानाची जंगी होळी रस्त्यावर पेटली, तुरुंगाचीं दारें उघडलीं. बंडखोरांनीं दिल्लीस कूच केलें.

" चलो दिल्ली !" " चलो दिल्ली ! " असा पुकारा करीत, ते मथुरेचे सैनिक राजधानी दिल्लीकडे चालले. त्यांच्यावर तोफा डागण्याचा हुकूम एका इंग्रज अधिकाऱ्यानें आपल्याजवळील भरतपूरच्या पलटणीला दिला. त्या पलटणींतील हिंदी गोलंदाजांनीं तोफा डागल्या, पण हिंदी शिपायांवर नव्हे–गोऱ्या सैनिकांवर ! गोरे पळाले ! त्यांचे बंगले जळाले.

या स्फोटाची वार्ता आग्रा येथें जाऊन थडकली. तेथील सैनिकांनीं राजनिष्ठेची ग्वाही पूर्वीं दिली होती, तरी आतां त्यांचा विश्वास गोऱ्या अधिकाऱ्यांना धरवेना. त्यांनीं तत्काळ दोन हिंदी पलटणी निःशस्त्र केल्या.

" गंगा नदीच्या कांठीं बंडखोरांची टोळी उतरली आहे आणि तिच्याजवळ लुटीची मोठी रक्कमहि आहे." अशी बातमी मुरादाबादच्या गोऱ्या अधिकाऱ्याला लागली. त्यासरशीं त्यानें धर्मयुद्धाचे सारे नियम धाब्यावर बसविले–माणुसकीचे सारे विचार गुंडाळून ठेवले आणि रात्रींच्या घनदाट अंधारांत, झोंप घेत पडलेल्या निःशस्त्र हिंदी सैनिकांवर, अचानक क्रूर हल्ला केला. बंडखोरांची पळापळ सुरू झाली. साहेब मोठा शेफारला. पण दुसरे दिवशीं—

" सूड ! सूड ! " करीत बंडवाले मुरादाबाद शहरांत शिरले. प्रथम त्यांनीं तुरुंग फोडला. कारण त्यांत त्यांच्या सहाशें सहकाऱ्यांना कैद करून ठेवलेलें होतें. ते सारे बेहोषपणें शहरांत हिंडूं लागले. त्यांचा प्रतिकार साहेबाला करतां येईना. त्यानें रामपूरच्या नबाबाजवळ मदत मागितली, पण ती नाकारली गेली. तेव्हां साहेबानें आपल्या शिपायांनाच बोलावून घेतलें आणि बायबलची शपथ घेऊन सांगितलें, " तुम्ही राजनिष्ठ राहाल, तर तुम्हांला सारे अपराध माफ होतील. " एवढ्या आश्वासनानें ते शिपाई राजनिष्ठ राहिले आणि शहरांत शांतता राहिली.

" एकूण एक सर्व हिंदी सैनिकांची कत्तल इंग्रज सरकार करणार आहे " अशी भयंकर बातमी बरेली गांवांत पसरली. तिचा परिणाम हिंदी सैनिकावर विलक्षण झाला. तेथें फक्त दोन हिंदी पलटणी होत्या. त्यांच्याकडून इंग्रज अधिकाऱ्यांनीं राजनिष्ठेच्या शपथा पुन: घेतल्या. पण काय उपयोग ? ता. ३१ मे रोजीं, दुपारीं अकराचा ठोका पडला आणि तोफेचा धडाका ऐकूं आला.

सैनिक बिथरले ! गोरे घाबरले !—आमराईंत लपले ! तेथें त्यांना आपले बंगले जळत असलेले दिसूं लागले. ते घोड्यावर स्वार होऊन नैनितालकडे निघाले. पण वाटेंत बंडवाल्यांनीं त्यांना गांठलें व परलोकास पोचविलें. सबंध बरेली शहरांत इंग्रज माणूस औषधालादेखील राहिला नाहीं सारें राज्य बंडखोरांचें !

त्यांनीं बहादूदुरखान याला रोहिलखंडाचा नबाब बनविला. त्यानें इंग्रजांना सळो कीं पळो करून सोडलें. इंग्रज व बाटून ख्रिस्ती झालेले हिंदी लोक या सर्वांची त्यानें सररहा कत्तल केली. नंतर त्यानें आपल्या नबाबशाहीची द्वाही फिरविली. त्याची मोठी मिरवणूक निघाली. तालुकदार-जहागिरदार त्याच्यापुढें मान लववूं लागले. त्यानें आपले आधकारी नेमले व ते कर वसूल करूं लागले. त्यानें असा जाहीरनामा काढला कीं, " इंग्रजांना या देशांतून पिटाळून लावण्याचा आमचा निर्धार आहे. या कामीं हिंदु

लोकांनी आम्हांला मदत करावी म्हणजे आम्ही त्यांच्या धर्म-भावनेला मान देऊन गाईची हत्या कायमची बंद करूं."

●

ता. ३१ मे! क्रांतीचा मुहूर्त! तो शहाजहानपूर येथील सैनिकांनींहि साधला. रविवार असल्यामुळें सारे इंग्रज लोक चर्चमध्यें जाऊन प्रार्थना करीत होते. त्यांच्यावर बंडखोरांनीं हल्ला केला व त्या सर्वांना ठार केलें. एक इंग्रज डॉक्टर आपल्या बायका-मुलांना घेऊन एका गाडींतून चर्चकडे निघाला होता, त्याचाहि निकाल बंडखोरांनीं लावला !

युद्ध म्हटलें कीं त्यांत दया-माया कोठली ? आणि धर्मनीति तरी कोठली ? आपल्या हृदयांतील माणुसकीची हत्या प्रथम करून मगच सैनिक युद्धाला निघतो. पण कांहीं वेळां कांहीं सैनिकांच्या अंत:करणांत माणुसकी जागी होते. तशी ती शहाजहानपूर येथील शंभर एक शिपायांच्या अंत:करणांत जागृत झाली. त्यांनीं इंग्रजांना वांचविण्याचें ठरविलें– चर्चमधील गोऱ्यांना बाहेरगांवीं पोचविण्याचें योजलें. परंतु त्यांचा सुविचार सिद्धीस कसा जाणार ? ते चर्चजवळ जाऊन पोचले, तेव्हां इतर बंडखोरांनीं त्यांना मना केलें.

बदाऊ येथील सैनिकांनींहि, ता. ३१ मे रोजीं, रात्रीं अडीच वाजतां, उठावणी केली. तेव्हां तेथील मॅजिस्ट्रेट, हिंदुस्थानी पोषाख करून, पळून गेला. मग तेथें बंडखोरांचें राज्य–म्हणजे अराजक–सुरू झालें.

●

फत्तेगड येथें तर नदींतील नावावर लढाई झाली. तेथील सुमारें दोनशें इंग्रज बायका-मुलांना कानपूरला पाठविण्याचें इंग्रज अधिकाऱ्यानें ठरविलें. त्याप्रमाणें ता. ४ जून रोजीं, रात्रीं दोन वाजतां, गडद काळोखांत, बारा नावा नदीवर तयार झाल्या. जीव मुठींत धरून नावांतील इंग्रज कानपूरला जाऊन पोचले. ता. २६ जून रोजीं, फत्तेगडच्या किल्ल्यावर बंडखोरांच्या तोफांचा मारा सुरू झाला. इंग्रज सैनिक थोडे होते, पण ते निकरानें लढले. पांच दिवस त्यांनीं बंडखोरांना दाद दिली नाहीं, पण नंतर त्यांचा दारूगोळा संपला. तेव्हां त्यांनीं कानपूरला जाण्याचें ठरविलें; पण जायचें कसें ?

वाटेंत गंगा नदी. तिला महापूर आलेला. तरी ता. ३ जुलै रोजीं, ऐन मध्यरात्रीं, तीन मोठमोठ्या नावांतून ते इंग्रज शिपाई कानपूरकडे निघाले. त्यांतील एक नाव भोंवऱ्यांत सांपडली. जरा पुढें गेल्यावर नदीच्या दोन्ही कांठांवरून गांवकऱ्यांनीं त्यांच्यावर गोळीबार सुरू केला. पाठीमागून बंडखोर येतच होते. मग काय करणार ? इंग्रज बायकांमुलांनीं नदींत उड्या टाकल्या. कोणी नदींत बुडून मेले, तर कोणी गोळ्या लागून ठार झाले. जे उरले, ते पकडले गेले. त्यांना नबाबानें तोफेच्या तोंडी दिलें. सबंध फरूखाबाद प्रांतांत एकहि इंग्रज शिल्लक राहिला नाहीं.

•

काशी येथें शस्त्र-संन्यासाचा विधि मोठ्या चमत्कारिक रीतीनें पार पडला. सायंकाळीं ५ वाजण्याची वेळ. कवायतीच्या मैदानावर सारे सैनिक गोळा झाले होते. त्यांत हिंदी शिपाई २००० होते; इंग्रज होते फक्त २५० ! बिगुल वाजला. सेनाधिकारी नील घोड्यावर स्वार होऊन तेथें आला. जवळच तोफा तयार होत्या.

"हत्यारें खालीं ठेवा." हुकूम सुटला.

हिंदी शिपायांनीं एकवार गोऱ्या सैनिकाकडे पाहिलें आणि आपला घांस घेऊं पाहणाऱ्या तोफांवर क्षणभर नजर फिरविली—आणि आपल्या हातांतील एकेक हत्यार ते जमिनीवर ठेवूं लागले. आपल्या शरिरांतील एकेक डोळा काढून ठेवणें किंवा आपल्या पोटांतील एकेक आंतडें बाहेर काढणें—इतकें प्राणसंकट त्यांना वाटत होतें. तीव्र दुःखानें त्यांनीं आपलीं शस्त्रें जमिनीवर ठेवलीं. तीं उचलण्यासाठीं गोरे सैनिक तेथें आले. इतक्यांत —

कां कोण जाणे, पण त्या आज्ञाधारक हिंदी सैनिकांच्या मनांत असा संशय आला कीं, आपण निःशस्त्र झाल्यानंतर इंग्रज लोक आपल्याला तोफा डागून मारतील. झालें ! त्यांचीं मनें फिरलीं. टाकलेलीं हत्यारें त्यांनीं वर उचललीं आणि अकस्मात्, अकल्पितपणें, त्या आपल्या बंदुकांतून गोऱ्या सैनिकांवर गोळ्यांचा वर्षाव एकदम सुरू केला. त्यांचें हें हृदय-परिवर्तन पाहून इंग्रज अधिकाऱ्याचें हृदय बंद पडण्याची वेळ आली ! पण त्यानें लगेच स्वतःला सावरलें आणि तोफा सुरु करण्याचा

हुकूम दिला. त्या राक्षसी यंत्रापुढें मानवाची मात्रा काय चालणार ! वाघापुढें हरिणें, तसे त्या तोफांपुढें ते बंडखोर पाठीला पाय लावून पळूं लागले.

पण रण-देवता चंचल ! जयापजयाच्या लाटा उलटसुलट उठतात. हिंदी घोडेस्वारांची पलटण त्याच वेळीं तेथें आली. त्यांनीं आपल्या भाईबंदांचा हा संहार पाहतांच गोऱ्या सैनिकांवर हल्ला केला. त्या वेळीं तोफा रिकाम्या पडल्या होत्या. त्याचे गोलंदाज पळपुट्या बंडखोरांचा पाठलाग करण्यास गेले होते— झोपड्याझोपड्यांत लपून बसलेल्या बंडखोरांचा नाश करण्यासाठीं आगी लावीत होते—माणुसकीची राखरांगोळी करून लहानलहान मुलांना फांशीं देत होते ! गांवेंच्या गांवें भस्म करून टाकण्याचा सपाटा इंग्रजांनीं लावला !

" हा जो गांव तुम्ही जाळून खाक केलात, त्याची नुकसान-भरपाई तुम्हांला द्यावी लागेल. " अशी कर्तव्याची जाणीव एका म्हाताऱ्या हिंदी माणसानें इंग्रज मॅजिस्ट्रेटला धीटपणें दिली. त्याचें फल त्याला काय मिळालें ? जवळच्याच झाडावर त्याला फांशी देण्यांत आलें. फांशी देणें, गांवें जाळणें, फटके मारणें—हे सूडाचे प्रकार इंग्रजांचे नित्याचे झाले ! तसें करतांना त्यांनीं आजारी माणूस पाहिला नाहीं कीं बाळंत स्त्री पाहिली नाहीं ! चार वर्षांचें अर्भक पाहिलें नाहीं कीं ऐंशी वर्षांचा म्हातारा पाहिला नाहीं ! नीलचा कायदाच तसा कडक !

नील नुसता क्रूर नव्हता, तर नीचहि होता. या नीच नीलनें असा अधमपणा केला कीं, धर्मभावनेनें प्राणावर उदार झालेल्या हिंदी सैनिकांना, फांशी देतांनाहि, धर्मभ्रष्ट केलें ! फांशी देण्यापूर्वीं हिंदी बंडखोरांना सक्तीनें गोमांस चारण्याचा व त्यांना खिस्ती बनविण्याचा आततायीपणा नीलनें केला. त्यामुळें त्याच्यावर सारे हिंदी सैनिक दांतओठ खात होते. तो स्वत: तर १८५७ च्या नोव्हेंबरमध्यें लखनौ येथें एका हिंदी सैनिकाच्या गोळीला बळी पडलाच. पण तीस वर्षांनंतर त्याच्या मुलालाहि एका हिंदी शिपायानें ठार मारलें, कारण त्याच्या बापाला नीच नीलनें धर्म-भ्रष्ट करून फांशी दिलें होतें !

काशीची गंगा प्रयागला गेलेली. तशीच तेथील क्रांतिहि प्रयागला जाऊन पोचली. ता. ६ जूनची रात्र. सर्वजण निजलेले. सर्वत्र सामसूम. आकाशांत चांदणें स्वच्छ पडलेलें ! गंगेच्या कांठावर हिंदी सैनिक पहारा करीत होते. तोफा सज्ज केलेल्या होत्या. सैनिकांनीं रण-शिंग फुंकलें. तें ऐकतांच कर्नल सिम्सनचें धाबें दणाणलें. तो शिपायांना जाब विचारण्यास गेला. पण त्याला जाब मिळाला गोळीच्या रूपानेंच ! तरी तो सुरक्षित राहिला. मात्र त्याचा घोडा मेला. त्याच्या रक्तानें न्हालेला सिम्सन किल्ल्यांत शिरला. त्यानें सैनिकांना निःशस्त्र करण्याचा हुकूम सोडला. त्या हुकुमाची तामिली राजनिष्ठ शीख शिपायांनीं केली. निःशस्त्र सैनिक शहरांत घुसले व लुटालूट करूं लागले.

फक्त किल्ला इंग्रजांच्या ताब्यांत, बाकी सर्वत्र बंडखोरांचें राज्य. सरकारी खजिन्यांतील तीस लाख रुपये बंडखोरांनीं हां हां म्हणतां लुटले. हजार हजार रुपयांच्या २।२, ४।४ थैल्या प्रत्येक बंडखोर घेऊन पळाला. त्या वाहत्या गंगेंत गांवगुंडांनीं आपले हात धुऊन घेतले. ता. ११ रोजीं नील अलाहाबादेस आला. किल्ल्यांत जाऊन पाहतो तों काय ? इंग्रज सैनिक दारुच्या बाटल्या फस्त करीत आहेत—मारामाऱ्या करीत आहेत ! त्यांना नीलनें तात्काळ ताळ्यावर आणलें. त्याच्या कडक धोरणामुळें बंडखोरांना शहरांतून पळ काढावा लागला. संशयावरून कोणासहि फांशी देण्याचा सपाटा त्यानें लावला. इंग्रजांविषयींच्या असंतोषांत त्यानें तेल ओतलें. हें ओळखून लॉर्ड कॅनिंग यानें, त्याच्या डोक्यावर हॅवलॉक याला, अलाहाबाद येथें मुख्य सेनापति म्हणून नेमलें. अलाहाबादेहून ता. ३० जून रोजीं, एक इंग्रज पलटण, दोन तोफांसह, कानपूरला रवाना करण्यांत आली. पण खुद्द कानपूरला काय घडत होतें ? रण-देवता तेथें किती रौद्र स्वरूप धारण करीत होती ? इंग्रजांचें जीवित तेथें किती क्षण-भंगुर झालें होतें ?

★

८ मराठी नेतृत्व



"For months, for years indeed, ever since the failure of the mission to England had been apparent, they had been quietly spreading their net-work of in-

trigue all over the country. In the Southern Mahratta country, indeed it seemed that Princes and Nobles were alike ripe for rebellion."

Sir J. Kaye (Vol. 1. p. 578.)

बंडखोर सैनिकांच्या तुकड्या निरनिराळ्या दिशांनीं दिल्लीकडे धांवत येत होत्या. पण त्या सर्वांना एकत्र आणून, एकसूत्र बनवून, निश्चित कार्यक्रम आंखून, राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या ध्येयाकडे नेणारा नेता कोण ?

पर्वतावरून वाहणारे पाण्याचे पाझर एके ठिकाणीं सांठवून जल-प्रवाहाची शक्ति निर्माण करणें, हेंच चातुर्याचें असतें.

आकाशांत दाही दिशा वारे सैरावैरा धांवत असतात. पण त्या वाऱ्यांची मोट बांधून एक प्रचंड झंझावात निर्माण केला, तरच मोठमोठीं घरें व झाडें उध्वस्त करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं येतें.

निरनिराळ्या दिशांतून सुटलेले हे क्रांतीचे दोर एके ठिकाणीं वळवून, त्यांच्या दोरखंडानें ब्रिटिश हत्तीला बांधून टाकण्याचें धोरण आंखणारा नायक १८५७ ची क्रांति शोधीत होती. मीरतहून दिल्लीला ती क्रांतिदेवी आपल्या नायकाच्या शोधार्थ गेली, आणि तेथें वृद्ध बहादुरशहा याला तिनें बादशाही तख्तावर बसविलें खरें, पण त्या ८० वर्षांच्या म्हाताऱ्याच्या अंगीं क्रांतीचें नेतृत्व करण्याची धमक नव्हती. त्यामुळें ती क्रांतिदेवी इकडे–तिकडे आपल्या नायकाचा शोध करीत होती.

राज्य-क्रांति व बंड यांचें स्वरूप बाह्यतः सारखेंच असतें. दोन्ही वेळां प्रस्थापित राज्यसत्तेविरुद्ध प्रक्षोभ प्रगट होतो. हाणामारी, कापाकापी, रक्तपात हे सारे प्रकार दोन्ही वेळां होतात. पण बंडांतील उत्पात अल्पकाळांत विझतो. कारण बंडाच्या डोळ्यांपुढें विशिष्ट ध्येय नसतें आणि पाठीशीं जनतेचा आधार नसतो. केवळ संतापाचा आविष्कार हें कांहीं स्थिर व विशाल ध्येय होऊं शकत नाहीं. तो क्षणिक उद्रेक असतो. माणसाचा राग जसा थोडा वेळच टिकतो, तसें राष्ट्राचें बंडाहि अल्पकाळच जीव धरूं शकतें. परंतु राज्य-क्रांति म्हटली म्हणजे तिचीं पाळेंमुळें बहुजनांच्या मनोभूमींत रुजलेलीं असतात आणि विशिष्ट तत्त्वाचें फळ क्रांतिकारकांच्या डोळ्यांपुढें सतत नाचत असतें. जीर्ण राज्य-

व्यवस्था नष्ट करून नवी राज्य-व्यवस्था निर्माण करणें हें राज्य-क्रांतीचें कार्य असतें. फ्रेंच राज्य-क्रांति हें याचें ठळक उदाहरण !

१८५७ सालीं हिंदुस्थानांत जो असंतोषाचा डोंब उठला, तो प्रारंभीं केवळ सैनिकांचें बंडच होता, यांत शंका नाहीं. पण बंडाच्या त्या तापलेल्या लोखंडी गोळ्यावर, ध्येयाचे घाव घालून, त्याला स्वातंत्र्य-युद्धाचा सुबक आकार देणारे कारागीर सुदैवानें हिंदुस्थानांत जन्मलेले होते. १८५७ चें आंदोलन हें बंड नव्हतें–तसेंच राज्य-क्रांतीहि नव्हतें; पण तें स्वातंत्र्ययुद्ध बनत होतें खास. देशाला स्वतंत्र करण्याची, परक्या इंग्रजांना घालवून लावण्याची भावना, या स्वातंत्र्य-समरांत ओतप्रोत भरलेली होती, यांत शंकाच नाहीं.

बंडाचा हा विकास ज्यांच्या स्थूल दृष्टीला उमगला नाहीं, असे अनेक विद्वान आहेत. सर्व ' जगाचा इतिहास ' लिहिणारे जग-विख्यात इंग्रज लेखक मि. एच्. जी. वेल्स यांनीं असा खडखडीत शेरा मारला आहे कीं, " फक्त बंगाली लष्करांनीं केलेलें तें एक बंड होतें. तें कोणत्याहि अर्थानें जनतेची उठावणी ठरत नाहीं. " रियासतकार पद्मश्री सरदेसाई यांच्या मतें, " दूरच्या निर्विकार दृष्टीनें पाहिल्यास, ही घटना एखाद्या क्षणिक दंग्यासारखी खासगी किंवा व्यक्तिगत स्वरूपाची होती, असें वाटल्याशिवाय राहत नाहीं." पण पेशावरचा फील्डमार्शल रॉबर्टसन आपल्या परमप्रिय मातोश्रीस १८५७ मध्येंच लिहिलेल्या खासगी पत्रांत ग्वाही देतो, " बंड केवळ शिपायांपुरतेंच मर्यादित होतें असें म्हणणें मूर्खपणाचें होईल. (What nonsense the Times talks about the mutiny being confined to the Army.) " मुंबईचा गव्हर्नर एल्फिन्स्टन यानें तर अशी स्वच्छ कबुली दिली कीं, " सारी प्रजा आमचेवर उलटली आहे. " (The whole population is against us) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारचे जे गुप्त कागदपत्र सांपडले आहेत, तेहि असेंच सिद्ध करीत आहेत कीं, प्रारंभीं हें शिपायांचें धार्मिक बंड असलें, तरी अंतीं तें राष्ट्रीय स्वातंत्र्य-युद्धाचें स्वरूप धारण करीत होतें. तें स्वरूप पूर्ण होण्याच्या आंतच तें समाप्त झालें असलें, तरी त्याचा हेतु व स्वरूप स्वातंत्र्य-युद्धाचेंच होतें, हें नाकारतां येणार नाहीं. – डॉ. सुरेंद्रनाथ सेन (१८५७).

" भारताचा शोध " करणारे पं. जवाहरलाल नेहरू यांनीं १८५७ च्या विप्लवाची जी मीमांसा केली आहे, ती पूर्ण नि:पक्षपाती आहे. राष्ट्राभिमानाची भावना त्या वेळीं जन्मास यावयाची होती, हें मान्य करूनहि ते या आंदोलनाचें वर्णन पुढीलप्रमाणें करतात—" मुख्यत: संस्थानिकांनीं व सरंजामदारांनीं ही उठावणी केलेली असली, तरी तिच्यामध्यें राष्ट्रीयत्वाचीं बीजें होतीं. या आंदोलनानें अखिल हिंदुस्थानाला हालवून सोडलें आणि ब्रिटिशांच्या राज्यकारभाराला तर चांगलाच हादरा दिला. पारतंत्र्याचा तिटकारा स्वाभाविकच असतो, पण इंग्रजी राजवटी-बद्दल तीव्र असंतोष व विरोधी भावना जनतेमध्यें पसरलेली होती. केवळ लष्कराचें बंड, असेंच त्याचें स्वरूप नव्हतें. त्याहून त्यांत अधिक कांहीं होतें. त्याची पूर्वतयारी गुप्तपणें व उत्तम रीतीनें झालेली होती. तें आंदोलन झपाट्यानें पसरत होतें आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य-युद्धाचें स्वरूप धारण करीत होतें. "

बंडाला स्वातंत्र्य-युद्धाचें, ठिणगीला वणव्याचें स्वरूप देण्याचें हें कार्य करणारा बुद्धिमान, दूरदर्शी व हिंमतबहाद्दर असा नेता त्या वेळीं ब्रह्मावर्त येथें वास्तव्य करीत होता. त्याचें नांव नानासाहेब पेशवे. त्यानें नाराज सैनिकांच्या व पदच्युत संस्थानिकांच्या प्रक्षुब्ध आंदोलनाला " ध्येय, ध्वज व धुरीण " यांची जोड दिली.

आभार इंग्रजांचे कीं, त्यांनीं पेशवाईपासून पदच्युत केलेल्या बाजीरावाला उत्तर हिंदुस्थानांत नेऊन ठेवलें. त्यामुळें तेथील बंडाचें नेतृत्व त्यांच्या चिरंजीवांस करणें सुलभ झालें. आठ लाख रुपयांचा वार्षिक तनखा ३३ वर्षें घेऊन १८५१ सालीं बाजीरावानें इहलोक सोडला. त्यानें तीन दत्तक घेतले. ते म्हणजे नानासाहेब, दादासाहेब व बाळासाहेब. त्यांपैकीं दादासाहेब लवकरच वारले, तेव्हां त्यांच्या पत्नीनें रावसाहेब नांवाचा एक दत्तक घेतला. रावसाहेब हा नानासाहेबांचा पुतण्या. या दोघांनीं बंडाच्या भावनेला शिस्तबद्ध स्वरूप दिलें.

नानासाहेबांचें मूळ नांव धोंडोपंत. त्यांचा जन्म १८२४ सालीं झाला. त्यांना बाजीरावानें १८२७ सालीं दत्तक घेतलें. त्यांचें पेन्शन

इंग्रज सरकारनें बंद केलें, तेव्हां त्यानें इंग्रज सरकारशीं असा युक्तिवाद केला, " श्रीमंत बाजीरावसाहेबांनीं जेव्हां आपलें सिंहासन कंपनीच्या स्वाधीन केलें तेव्हां असें स्पष्ट ठरलें होतें कीं, त्याची किंमत म्हणून कंपनीनें प्रतिवर्षी आठ लाख रुपये द्यावेत. आतां तें पेन्शन जर चालू राहणार नसेल, तर पेन्शनीच्या बदल्यांत सोडलेलें आमचें राज्य तरी तुमच्या हातांत कायमचें कसें राहूं शकेल? राज्यहि घ्यावयाचें आणि पेन्शन बुडवावयाचें हें कंपनीचें धोरण पूर्ण अन्यायाचें, थिल्लरपणाचें व उन्मत्तपणाचें आहे. " राज्य द्या किंवा त्याचें मोल असलेलें पेन्शन द्या— असा हा पेंच होता. दिल्लीचा बादशहा किंवा टिपू यांच्या नेमणुका वंशपरंपरा चालू होत्या, मग पेशव्यांच्या कां नकोत? पण कंपनीनें कोणताच युक्तिवाद मनावर घेतला नाहीं. हिंदुस्थान वशाखालीं घालण्याच्या एकाच स्वार्थी वासनेनें इंग्रज सरकार आंधळें व बहिरें झालेलें होतें.

सातारचे छत्रपति, दिल्लीचे बादशहा व झांशीची राणी यांनीं आपल्यावरील अन्यायाची अखेरची दाद मागण्यासाठीं आपले वकील जसे इंग्लंडला रवाना केले, तसेच नानासाहेबांनीं आपला एक मुखत्यार १८५४ मध्यें विलायतेस पाठविला. त्याचें नांव अजमुल्लाखान. हा एक साधा मुसलमान. तो घरचा गरीब. इतका कीं, एका इंग्रज कुटुंबांत बटलरची नोकरी त्यानें केली. पण स्वभाव महत्त्वाकांक्षी! त्यामुळें स्वयंपाक्याची नोकरी करतां करतांच तो इंग्रजी व फ्रेंच भाषा शिकला. नंतर ती नोकरी सोडून तो कानपूरच्या शाळेंत विद्यार्थी बनला व लवकरच शिक्षकहि झाला. त्याचा चेहरा मोहक व वाणी मधुर होती. लंडनमधील आंग्ल तरुणींचें मन त्यानें जिंकून घेतलें. इतकें कीं, त्यांपैकीं कांहीं तरुणी त्याला बरींच वर्षें प्रेम-पत्रें पाठवीत राहिल्या.

इंग्लंडमधील शिष्टाईस यश न आलें तरी, अजमुल्लाखान निराश न होतां, इंग्रजांचा कांटा काढण्याच्या मार्गाला लागला. परत येतांना त्यानें युरोप खंडांतील नाना देशांना भेटी दिल्या. तुर्कस्तान व रशिया या देशांतहि जाऊन तेथील प्रमुख व्यक्तींना तो भेटला. रशियानें त्या वेळीं इंग्लंडला युद्धांत पराभवाची धूळ चारली होती. रशियाचें भारी शस्त्रबळ त्यानें प्रत्यक्ष पाहिलें. या सर्व पाहणीचा परिणाम त्याच्या मना-

वर असा झाला कीं, हिंदुस्थानांतून इंग्रजांना पिटाळून लावणें मुळींच अशक्य नाहीं. या नव्या जाणिवेनें तो हिंदुस्थानास परत आला आणि ब्रह्मावर्त येथें नानासाहेबांना जाऊन भेटला. नानासाहेबांनीं जम्मूच्या गुलाबसिंगामार्फत रशियाशीं पत्रव्यवहार चालू ठेवला. त्या वेळीं नानासाहेब राजकारणाचे दुहेरी डाव खेळत होते.

नानासाहेब काल-मान ओळखण्यांत चतुर होते. इंग्रजांचें सैन्यबळ व राज्यव्यवस्था यांची पुरेपूर कल्पना त्यांना होती. गोड बोलून, पद्धतशीर रीतीनें आपल्या स्वार्थासाठीं इंग्रज दुसऱ्याचा गळाहि कापण्यास कसे कचरत नाहींत, याची जाणीव त्यांना पूर्णपणें होती. त्याबरोबरच आपल्या देशांतील अज्ञानाचा अंधार व फुटीरपणाचा महारोग यांचेंहि ज्ञान त्यांना यथास्थित होतें. स्व-पर-पक्षांचें बलाबल अचूक जाणल्यामुळें नानासाहेबांच्या मनाची अशी बालंबाल खात्री झाली कीं, या एकजुटीनें वागणाऱ्या, देशाभिमानानें चालणाऱ्या, शिस्तींत मुरलेल्या व आधुनिक शस्त्रास्त्रांनीं आणि तारा-आगगाड्या यांनीं सज्ज झालेल्या इंग्रजांशीं उघड, सरळ सामना देणें आपणांला अशक्य आहे. गनिमी कावाच आपलें लंगडेंपण भरून काढील, गुप्त संघटनाच आपली शक्ति प्रभावी करील आणि मुख्य म्हणजे योग्य काळ येईपर्यंत इंग्रजांशीं आपण दोस्तीचेंच नाटक चालू ठेवावयाचें.

पोटांत आग पण तोंडांत साखर—ही इंग्रजी नीति नानासाहेबांनीं आपलीशीं केली. ज्याचें तळपट करावयाचें, त्याचाच पाहुणचार ते दुप्पट उत्साहानें करूं लागले. नानासाहेब इंग्रजांशीं गोडीगुलाबीनें वागत, मिठास बोलत, त्यांना मेजवान्या देत आणि नाचरंगाचा जल्लोशहि करीत. ब्रह्मावर्त येथें त्यांनीं राजवाड्याचेंच वैभव उभविलें होतें. वास्तविक आतां ते पदच्युत झालेले, निर्वासित बनलेले, पेन्शनहि बंद झालेलें, असे अनाथ होते. पण त्यांच्या वाड्यांतील थाट काय विचारावा?

त्यांच्या दिवाणखान्यांत उंची उंची गालिचे पसरलेले असत आणि दारांना व खिडक्यांना निरनिराळ्या रंगांचे पडदे सोडलेले असत. दिवाणखान्यांत एकीकडे मोठमोठाले आरसे दिसत, तर दुसरीकडे चिनी मातीचीं नक्षीदार भांडीं शोभा देत. मेणबत्त्यांचीं रत्नजडित झाडें सुंदर

प्रकाश पाडीत, तर हस्तिदंतीं कोरीव काम पाहुण्याचे नेत्र लुब्ध करीत. त्यांना घोड्यांची आवड विशेष. अश्व-विद्येंत त्यांची बरोबरी फक्त झांशीची राणी लक्ष्मीबाईच करूं शके. त्यांच्या घोड्यावर चांदीचे अलंकार रुळलेले असत. शिवाय शिकारी कुत्रींहि बाळगण्याचा त्यांना छंद होता आणि त्यांचें शस्त्रागार तर फारच संपन्न !- लवलवणाऱ्या तलवारी, दूर पल्ल्याच्या बंदुका व मोठमोठे गोळे दूरवर फेकणाऱ्या तोफा !—यांचें जणूं प्रदर्शनच तेथें होतें.

त्याचप्रमाणें मोंगलशाही उलथणारे छत्रपति शिवाजीमहाराज, दिल्लीचें रुपेरी तख्त फोडणारे भाऊसाहेब, इंग्रजी उंटाचें पिल्लूं आपल्या राज्यांत शिरूं न देणारे नाना फडणवीस—इत्यादि शूर-वीरांच्या व मुत्सद्यांच्या प्रतिमा तेथें होत्या व क्रांतीचा संदेश देत होत्या.

नानासाहेबांची शरीरयष्टि थोडीशी स्थूल होती. त्यांचा चेहरा वाटोळा होता व त्यांचा वर्ण गोरा होता. शेंडी मोठी व दाढी नुकतीच वाढविलेली. त्यांचे डोळे वाघाप्रमाणें गरगर फिरणारे होते. त्यांच्या संभाषणांत विनोदाची झांक असे. त्यांचें सारें वर्तनच शिष्टाचार-संपन्न होतें. देशांतील राजकारणाची खडान् खडा माहिती ते मिळवीत होते; एवढेंच नव्हे, तर जगांतील मोठमोठ्या राष्ट्रांच्या राजकीय घटनाहि ते समजावून घेत. त्यासाठीं त्यांनीं दररोज इंग्रजी वर्तमानपत्र वाचून दाखविण्याकरितां एका इंग्रज माणसाची नेमणूक केली होती. पण त्या सर्वांपेक्षां त्यांचा मुख्य गुण म्हणजे इंग्रजी सत्तेला तिलांजलि देण्यास ते एका पायावर तयार होते. " नानासाहेब म्हणजे हिंद-भूमीचा साक्षात् क्रोधच होते.या भूमीचा मूर्तिमंत नरसिंह मंत्रच होते.'' त्यांचे जिवलग सेनापति तात्या टोपे. त्यांचें नांव रघुनाथ पांडुरंग भट. राहणार नगरकडचे. 'राघो भरारी' प्रमाणें मजलावर मजला जलद करण्यांत मोठे कुशल. नानासाहेबांनीं दिल्लीपासून म्हैसूरपर्यंत सर्व संस्थानिकांकडे आपले जासूद पाठविण्यास १८५६ च्या आधींपासूनच सुरुवात केली. इंग्रजांच्या कुटिल व अधाशी राजनीतीचें स्वरूप ते प्रत्येकाच्या मनावर ठसवूं लागले. प्रथम त्यांना कोणी साद देईना—साथ करीना. पण इंग्रज सरकार एकेक संस्थान गिळीत चालल्यामुळें राजेमहाराजे कावरेबावरे झाले. लखनौच्या नबाबानें नानासाहेबांशीं

सूत जोडलें. आणि नंतर एकेक संस्थानिक त्यांच्या कटांत सामील होऊं लागला.

१८५७ साल उजाडलें. क्रांतीचें रक्तबिंब क्षितिजावर उगवत असलेलें नानासाहेबांच्या सूक्ष्म नजरेस दिसूं लागलें. म्हणून त्यांनीं आपला विश्वासू दोस्त अजमुल्लाखान याला सांगातीं घेऊन दौरा काढला. प्रथम ते दिल्लीला गेले. तेथील क्रांतीचा कानोसा घेऊन ते अंबाल्याला रवाना झाले. एप्रिलमध्यें लखनौला भेट दिली. तेथें लोकांनीं त्यांची प्रचंड मिरवणूक काढली. तेथील चीफ कमिशनर सर हेन्री लॉरेन्स याची भेट त्यांनीं घेतली. " हें सुंदर शहर पाहण्यासाठीं मी मजेनें आलों आहें." अशी बतावणी नानासाहेबांनीं केली. तेथें नानासाहेबांनीं शिवाजीमहाराजांचा बाणेदारपणा प्रगट केला. लॉरेन्सनें फक्त त्यांनाच बसावयास खुर्ची दिली व त्यांच्या मित्रांना उभें ठेवलें. हा अपमानाचा प्रकार पाहतांच नानासाहेब ताडकन् त्या खोलींतून निघाले. साहेबाचें मन चपापलें.

तेथून नानासाहेब काल्पी येथें गेले. या सर्व ठिकाणची क्रांतीची तयारी त्यांनीं पाहिली आणि तेथील नेत्यांशीं सल्लामसलत केली. लष्करी ठाणीं त्यांनीं पारखलीं व पेटविलीं.

रविवार ता. ३१ मे !—हा दिवस क्रांतीच्या उठावणीचा म्हणून नानांनीं मुक्रर केला आणि सर्वांना सांगितला. काळ व कार्यक्रम निश्चित करून ते एप्रिलच्या अखेरीस ब्रह्मावर्तास परत आले. तेथून ते क्रांतीचीं सूत्रें हलवूं लागले—निरनिराळ्या संस्थानिकांना चेतवूं लागले—शूर व स्वातंत्र्य-प्रेमी तरुणांना जवळ करूं लागले.

कांहीं कांहीं संस्थानिकांनीं त्यांना स्वच्छ नकार दिला. कारण त्यांना बंडाच्या यशाची आशा वाटत नव्हती. उलट, विजयी होणाऱ्या इंग्रजांना साहाय्य केल्यास ते आपल्या राजनिष्ठेचें चीज करतील—निदान आपलें आहे तें वैभव तरी कायम टिकवतील, अशी त्यांची आपमतलबी अटकळ ! एखाद्या घरांत प्रचंड नाग निघाला म्हणजे शेजारीपाजारी जमतात खरे, पण त्यावर पहिला दगड टाकण्यास जो तो कचरतो. न जाणो, नाग निसटला, तर आपल्यावर जन्मभर दंश धरील. परंतु इतरांनीं दगड मारमारून त्याला अर्धमेला केला असें दिसलें, म्हणजे मग सर्वांना

वीरश्रीचें स्फुरण चढतें आणि त्याला ठार करण्यासाठीं जो तो आपला पराक्रम दाखवितो. असें स्वार्थी, भेकड व दुटप्पी धोरणच बहुतेक संस्थानिकांनीं धारण केलें होतें.

ग्वाल्हेरचे जयाजीराव शिंदे २३ वर्षांचे, इंदूरचे तुकोजीराव होळकर २१ वर्षांचे आणि धारचे आनंदराव पवार तर १३ वर्षांचे. या कच्या तरुणांच्या कोत्या बुद्धीला राष्ट्रहिताची विशाल कल्पना व स्वातंत्र्य–संपादनाची दूर-दृष्टि कोठून असणार ? ग्वाल्हेरचें १८००० सैन्य इंग्रजांच्या दिमतीस गेलें. इंदूरच्या महाराजांनीं आपल्या महालांत इंग्रजांचें रक्षण केलें आणि धारचा किल्ला बंडखोरांनीं जिंकला असतां, त्यांचा बीमोड तेथील महाराजांनीं केला.

याचप्रमाणें भोपाळ, देवास, रेवा इत्यादि संस्थानांनीं इंग्रज सरकारलाच साथ दिली. १८ संस्थानांचा सबंध राजपुताना इंग्रजांच्याच सेवेसाठीं धांवला. मेवाड, जयपूर, जोधपूर इत्यादि संस्थानांतील हजारों सैनिक व नागरिकहि इंग्रजांच्या पाठीशीं उभे राहिले. नाहीं तर त्यावेळीं सर्व राजपुतान्यांत इंग्रज सैनिक फक्त १०० होते. त्यांची चटणी बंडवाल्यांनीं केव्हांच उडविली असती. पण स्वार्थी व भित्रे राणे यांच्या कोत्या धोरणामुळें एक लक्ष चौरस मैलांचा राजपुतान्याचा प्रदेश बंडाच्या काळांत शांतच राहिला. किंबहुना बंडाच्या आगीचा लोट दक्षिणेंत न पसरण्याला उत्तरेकडील या संस्थानिकांचा तट आडवा आला.

उत्तरेस नेपाळ–भूतान, पश्चिमेस राजपुताना व दक्षिणेस मध्य हिंदुस्थानांतील ग्वाल्हेर–इंदूर इत्यादि संस्थानें यांचा बंडाच्या टापूभोंवतीं वेढा पडल्यामुळें बंडवाले आंतल्या आंत कोंडले गेले. पूर्वेकडून बंगाली व मद्रासी फौज बंडवाल्यांवर चालून जात होती व वायव्येकडून पंजाबी शिपायांनीं त्यांना चेपलें. त्यामुळें बंडवाले कैचींत सांपडल्यासारखे झाले.

अशा बिकट परिस्थितींत, सैरावैरा वाहणारे बंडाचे प्रवाह एकत्र आणून, ते क्रांतीच्या यंत्रांत कोंडून, त्यापासून स्वातंत्र्य-युद्धाची विद्युत शक्ति निर्माण करणें हें महान कार्य नानासाहेबांनीं आपल्या शिरावर घेतलें. ते ब्रह्मावर्त (म्हणजे बिठूर) येथें राहत होते. तेथून कानपूर १०।१२ मैलांवर. तेथें बंडाच्या झळी येऊं लागल्या, हें पाहतांच तेथील

सेनापतीनें आपल्या बचावाची तयारी केली. त्याचें नांव सर ह्यू व्हीलर. त्यानें हिंदुस्थानांत ५४ वर्षें सैन्यांत नोकरी केली होती. या वेळीं त्याचें वय ७३ वर्षांचें होतें. पण त्याच्याजवळ विश्वासू गोरे सैनिक शें-दीडशेंच होते. कानपुरांत त्यावेळीं सर्व इंग्रजांची संख्या सुमारें ३०० होती. व्हीलरच्या हाताखालीं तीन हजार हिंदी शिपाई होते. पण त्यांचा भरंवसा त्याला आतां कसा धरतां येईल ?

व्हीलरनें आपल्या छावणीजवळ असलेल्या दोन्ही दवाखान्याभोंवतीं, चार फूट उंचीचा एक तट बांधला. पण तो मातीचा होता, भुसभुशीत जमिनीवर होता. या जागेंत त्यानें इंग्रज लोकांना ठेवलें व त्यांच्यासाठीं पंचवीस दिवस पुरेल इतकी अन्नसामुग्री सांठविली. तेथून सहा मैलांवर इंग्रजांचा तोफखाना, खजिना व कैदखाना होता. त्यानें बाहेरून मदत मागविली आणि त्या मदतीच्या आशेवर तो दिवस न् दिवस मोजूं लागला. कानपूरजवळच नानासाहेबांचें निवासस्थान. ते इंग्रजांचे मोठे दोस्त— निदान तसें इंग्रजांना वाटे. कानपूरच्या कलेक्टरनें मित्रभावानें नानासाहेबांना विनंती केली, " येथील हवा तापत आहे, तरी आपण तीनशें सैनिक व तोफा घेऊन आमचे मदतीस यावें. " लगेच नानासाहेब कानपूरास गेले. त्यांच्याच घरीं राहिले. बरोबर तात्या टोपेहि होते. चार दिवस झाले, तेव्हां——

" नानासाहेब, आमचे पगारी शिपाई आमचा हुकूम मानीत नाहींत. अशा वेळीं आपण जातीनें येथें आलां आहां, आणि सैनिकांचें साहाय्यहि देत आहां, ही किती आनंदाची गोष्ट ! याबद्दल मी आपले आभार मानतों. " कलेक्टर नम्रतेनें म्हणाला.

" यांत आभार कसले ? हें तर मित्र-कर्तव्यच आहे. पण एक गोष्ट आपणांजवळ बोलावी कीं नाहीं याचा विचार मी करीत आहें. " नानासाहेब घुटमळत बोलले.

" बोला, बोला, खुशाल बोला. मित्राजवळ संकोच कसला ? " कलेक्टर उत्साहानें बोलला.

" गोष्ट अशी आहे कीं, आमचा तनखा बंद झालेला आहे. तेव्हां कंपनी-सरकारच्या मदतीसाठीं जे शिपाई आम्ही देणार, त्यांचा खर्च आम्हाला कसा झेपेल ? " नानासाहेबांनीं सूचक उद्गार काढले.

" बरोबर आहे ! तो खर्च आम्हीच सोसावयास हवा. आग्रा येथील लेफ्टनंट गव्हर्नरला मी आतांच लिहून कळवितों. " कलेक्टरनें तत्परता दाखविली.

" मग आपल्या रक्षणाचा सारा भार मजवर. आपण निश्चिंत असा. " असें म्हणून नानासाहेबांनीं मुक्त हास्य केलें.

तथापि, कानपूर शहरांत रोजरोज क्रांतीच्या पुढीलप्रमाणें नव्या नव्या अफवा येत होत्या—

" इंग्रजांचें राज्य फक्त १०० वर्षेंच टिकणार, १७५७ सालच्या प्लासीच्या लढाईनें ज्या राज्याचा पाया येथें घातला, त्या राज्याचा अंत १८५७ सालीं होणार, असें ठाम भविष्य आहे. "

" इंग्रज लोक सर्व हिंदुस्थान बाटवून खिस्ती करणार. त्यासाठीं, विहिरींत व तळ्यांत गायींचें व डुकराचें मांस ते टाकीत असतात— गव्हाच्या कणिकेंतहि ते मिसळीत असतात. तोड्याच्या बंदुक्यांच्या काड-तुसांनाहि त्यांच्या मांसाची चरबी चोपडलेली असते ती यामुळेंच. "

अशा गरमगरम अफवा कानपूरला एकसारख्या येत होत्या, आणि तेथील सैनिकांचीं मनें तापवीत होत्या.

अखेर ता. ४ जूनचा दिवस उजाडला. ऐन मध्यरात्रींच्या वेळेस बंडाचा बिगुल वाजला. हिंदी घोडदळानें खजिन्यावर हल्ला चढविला. खजिना लुटल्यावर बंडखोरांनीं तुरुंग फोडला, सरकारी कचेऱ्या जाळल्या आणि मिळाला तेवढा पैसा हत्ती-घोड्यावर लादून ते बंडखोर दिल्लीकडे निघाले. त्यांना नानासाहेबांनीं कानपूरास परत आणलें. कशासाठीं ?

दिल्ली हें जसें क्रांतीचें एक केन्द्र, तसेंच कानपूर हें दुसरें केन्द्र करण्याचें नानासाहेबांचें धोरण ! " दुसरी आघाडी " त्यांनीं उघडली.

बंडवाल्यांनीं त्यांना दोन लाखांचा खजिना दिला आणि 'राजा' म्हणून मानाचा मुजरा केला. ता. ६ जून रोजीं संध्याकाळीं बंडखोरांच्या

तोफांचे गोळे इंग्रजांच्या घरावर पडूं लागले. त्या चार फूट उंचीच्या तटाआंत, इंग्रज बायका-मुलें, मृत्यूच्या छायेखालीं, दबून राहिली. ता. ८ जूनला, गंगेच्या कांठावर बंडखोरांनीं मुसलमानांचा हिरवा झेंडा फडकाविला. एक नव्हे, दोन नव्हे, तीन आठवडे बंडवाल्यांचे हल्ले, त्या कोंडींत सांपडलेल्या इंग्रजांवर, सुरू होते. लखनौहून–अलाहाबादेहून आपल्याला मदत मिळेल या आशेवर व्हीलर पळ न् पळ मोजीत होता.

आणि एके दिवशीं तोफेचा एक गोळा नेमका त्या दवाखान्यावर पडला. आणि सारें बेचिराख झालें! जवळ बसून इंग्रजांना आपल्या बायका-मुलांचे मृत्यु पाहावे लागले. त्यांचीं प्रेतें रात्रीच्या वेळीं, तटाबाहेरील एका विहिरींत, गुपचूप फेंकून दिलीं गेलीं. प्रेतांनीं ती विहीर बुजून गेली. २५० इंग्रजांची प्रेतें त्या विहिरींत कोंबलीं गेलीं. कानपूरची कुप्रसिद्ध विहीर ती हीच! पाण्याऐवजीं रक्तानें व चिखलाऐवजीं मांसानें ती भरलेली होती.

इंग्रजांची रसद संपली. तेव्हां इंग्रज लोक घोडे व बैल मारून खाऊं लागले. पाणी प्यावें म्हटलें तरी विहिरीवर गोळ्यांचा वर्षाव होई. इंग्रजांच्या हालअपेष्टांना सीमा राहिली नाहीं. तें स्वत: मरेपर्यंत झुंजले असते, पण त्यांच्याजवळ त्यांचीं बायकामुलें होतीं ना? त्यांच्या जीवनाचा इंचाइंचनें होणारा नाश त्यांना पाहवेना. यामुळें ते शूर इंग्रज दीन झाले. अशा स्थितींत नानासाहेबांचा निरोप आला, "हत्यारें खालीं ठेवून तुम्ही येथून बाहेर जाण्यास तयार असाल, तर आम्ही आमचा हल्ला थांबवितों."

'होय' म्हणण्याशिवाय इंग्रज दुसरें उत्तर काय देणार? त्यांनीं शरण जाण्याचें ठरविलें. ता. २५ रोजीं बंडवाल्यांचा हल्ला थांबला. संध्याकाळीं इंग्रजांनीं आपल्या तोफा बंडवाल्यांच्या हवालीं केल्या. त्यांच्या प्रयाणासाठीं नानासाहेबांनीं गंगा नदींत ४० नावा तयार ठेवल्या. त्या नावांवर छत उभारलेलें होतें आणि त्यांत खाण्यापिण्याची चांगली व्यवस्था केली होती. ती पाहून त्या शरणागत इंग्रजांना धीर आला व संतोष वाटला.

ता. २७ जूनचा दिवस ! सूर्याचे किरण सृष्टीवर पसरूं लागले. जीवनाच्या आशेचे किरण इंग्रजांच्या मुखावर पसरूं लागले. अलाहाबादेस जाण्याची तयारी ते करूं लागले. ४५० इंग्रज त्या चार-फुटी तटांतून बाहेर पडले — कृतान्ताच्या जबडयांतूनच बाहेर पडल्यासारखें त्यांना वाटलें.

कोणी आपल्याबरोबर बायबल घेतलें, तर कोणी पिस्तुलें घेतलीं. कोणी दागिन्यांच्या लपविलेल्या पेट्या बाहेर काढल्या, तर कोणी आपले उंची कपडे बांधून घेतले. पण बहुतेकांचे कपडे फाटलेले होते, पोटें भकाळीला गेलेलीं होतीं आणि चेहरे म्लान झालेले होते.त्या शरणागतांना अभयदान देणाऱ्या नानासाहेबांनीं त्यांच्यासाठीं हत्ती व पालख्या ठेवल्या होत्या. त्यांत बसून इंग्रज बायकामुलें निघालीं. पण तो ७३ वर्षांचा सेनापति व्हीलर पायींच गंगेकडे निघाला-- त्याच्या पाठोपाठ त्याची पत्नी व कन्याहि पायींच निघाली.

तें मानहानीचें, लाजिरवाणें दृश्य पाहण्यासाठीं कानपूर शहरांतील शेकडों नागरिक रस्त्यावर दुतर्फा उभे राहिले. गंगेचा घाट एक मैलावर होता. ही वाटचाल त्या इंग्रजांनीं मान खालीं घालून केली. पण त्यांना केवढी आशा वाटत होती कीं, आपण आतां जगणार !– जिवंत राहणार !– संसार करणार ! या आशेच्या बळावरच त्यांच्या निस्त्राण पायांनीं लाकडी पूल ओलांडला. नंतर ते ‘ सती चोर ’ नांवाच्या घाटावर गेले. उन्हाळ्यामुळें गंगेला पाणी फार नव्हतें. म्हणून नावा कांठावर येत नव्हत्या. तेव्हां इंग्रज पुरुष गुडघ्याइतक्या पाण्यांत उभे राहिले आणि आपल्या बायकामुलांना व आजारी माणसांना नावांवर चढवूं लागले. सकाळचे ९ वाजले आणि सारे इंग्रज नावांत बसले. त्यांच्या जीवनाची नौका आतां आशेच्या प्रवाहावर डोलूं लागली. इतक्यांत —

बिगुलाचा आवाज झाला. तो कानावर पडतो न पडतो, तोंच त्या नावांतील इंग्रजांचे अंगावर बंदुकीच्या गोळ्या पडूं लागल्या. नावाडी उडया मारून कांठावर गेले नावांच्या छतावर निखारे ठेवलेले होते; त्यांनीं पेट घेतला ! गंगेच्या कांठावर तोफांचे मोर्चे बांधून ठेवले होते, त्या तोफा नावांवर गोळे फेकूं लागल्या. बंडखोरांचें पायदळ, घोडेस्वार व

गोलदांजहि गंगातीरावर हल्ल्यासाठीं सज्ज होते. अजिमुल्लाखान, तात्याटोपे व टीकासिंग—हे नानासाहेबांचे तिघे हस्तक घाटावरील मंदिराजवळ उभे होते.

कोणाच्या प्रेरणेनें? कोण जाणे, पण त्या दीन, निःशस्त्र व शरणागत इंग्रज बायकामुलांचा अमानुष संहार बंडवाल्यांनीं अकस्मात केला. आजारी माणसें आगींत जळून मेलीं. मुलांना पोटाशीं धरून बायकांनीं नदींत उड्या टाकल्या. पण बंडखोरांनीं आपले घोडे गंगेंत घातले आणि तेथें जगण्यासाठीं धडपडणाऱ्या बायकामुलांना बिनदिक्कत कापून काढलें! त्या गोऱ्यांच्या रक्तानें शुभ्र गंगानदीचें पाणी लाल झालें. पुण्यवती गंगा पापमयी बनली! स्वर्गांतून आलेली ती भागीरथी नदी पृथ्वीतलावरील मानवांची अमानुषता पाहून लज्जित झाली! सेनापति व्हीलर यालाहि बंडखोरांनीं कंठस्नान घातलें. १२५ इंग्रजांना बंडखोरांनीं कैद करून नेलें.

बंडखोरापेक्षांहि निसर्ग इंग्रजावर अधिक क्रुद्ध झाला होता—क्रूर बनला होता. ४० पैकीं एक नाव बचावली होती. ती गंगेच्या धारेंत सांपडली. तिच्यावर गोळ्यांची वृष्टि बंडखोरांनीं चालू ठेवली. तींत कॅप्टन मूर मेला. आणखीहि सैनिक मेले. त्यांचीं प्रेतें गंगेच्या पाण्यावर तरंगूं लागलीं. दुसरे दिवशीं ही नाव अजफगडला पाण्याच्या प्रवाहाबरोबर गेली. तेथें ती रेताडांत रुतली. तेथेंहि बंडखोरांच्या बंदुका आग ओकूं लागल्या. शिवाय कानपुराहून कांहीं बंडखोर एका नावेंत बसून तेथें गेले, त्यांनींहि इंग्रजांवर हल्ला केला. पण इंग्रजांनीं उलट हल्ला करून ती नावच आपल्या ताब्यांत घेतली.

भुकलेले व थकलेले इंग्रज नावेंतच झोपीं गेले. रात्रीं जोराचा वारा सुटला. त्यामुळें ती नाव भलत्याच गांवीं वाहत गेली. तेथील गांवकऱ्यांनीं त्यांच्यावर हल्ला केला पाठीमागून दुसऱ्या नावेंतून येऊन बंडखोरांनींहि हल्ला चढविला. अशा कात्रींत इंग्रज सांपडले, तरी ते झुंजत राहिले. त्याच्यांपैकीं चौदा जण कांठावरील लोकाशीं लढण्यासाठीं गेले. गांवकऱ्यांना पिटाळून ते परत नदीजवळ येतात न येतात, तों आपल्या नावेचा पत्ता नाहीं! पाण्याच्या धारेबरोबर ती अकस्मात वाहत गेलेली. आकाश फाटलें!

धरणी दुभंगली ! असेंच इंग्रजांना वाटलें. निर्वाणीचें बळ अंगीं आणून ते पळूं लागले.

तीन मैल गेल्यावर त्यांना एक मंदिर आढळलें. त्यांत त्यांना थंडगार पाणी मिळालें, पण इतक्यांत बंडखोरांनीं मंदिराला वेढा दिला व आगहि लावली. तेव्हां ते १४ इंग्रज त्वेषानें बाहेर पडले व बंडखोरांचा व्यूह फोडून नदीकडे निघाले. पण नदीवर पोचले सातजणच. त्यांतील तिघे नदीवर मारले गेले. उरले चौघे. त्यांनीं आपलीं हत्यारें नदींत फेकलीं—आणि तशींच आपलीं शरीरेंहि ! शेवटीं त्यांचें रक्षण एका तालुकदारानें केलें. त्याचें नांव दिग्विजयसिंह. त्यानें आपला हत्ती पाठवून त्यावरून, प्राण-संकटांतून वाचलेल्या त्या चौघा इंग्रजांना, आपल्या घरीं नेऊन आरामांत ठेवलें.

यापेक्षां अधिक हाल, अधिक संकटें, अधिक यातना कोणाच्या कपाळीं कधीं आल्या असतील काय ?

होय. याहून क्रूर कहाणी इतिहासाच्या काळजाला घरें पाडीत आहे. सारी संस्कृति कोळून पिणारी व सारी मानवता छिन्नविछिन्न करणारी ती करुण घटना घडली ब्रिबीघरामध्यें !

बिबीघर हें कानपुरांतील लहानसें घर ! त्यांत फक्त दोन खोल्या ! प्रत्येक खोली २० फूट लांब व १० फूट रुंद ! अशा या लहानशा घरांत शेकडों इंग्रज स्त्री-पुरुषांना बंडवाल्यांनीं डांबून ठेवलें होतें. शिवाय फत्तेगड येथून बंडवाल्यांच्या तावडींतून सुटून जे इंग्रज आश्रयासाठीं व संरक्षणासाठीं, ऐशीं मैल धडपडत एका नावेंतून कानपूरला आले, त्या सर्वांना बंडवाल्यांनीं पकडलें आणि नानासाहेबांसमोर उभे केलें. त्यांत १९ पुरुष, २३ स्त्रिया व २६ मुलें होतीं. त्या करड्या सेनापतीनें हुकूम दिला, " सर्व पुरुषांना ठार करा आणि बायका-मुलांना बिब्बीघरांत कोंडून ठेवा. "

बिब्बीघरांतील कांहीं इंग्रज स्त्रिया, भंगिणीच्या हस्तें अलाहाबादच्या इंग्रज अधिकाऱ्याशीं चोरून पत्र-व्यवहार करीत आहेत आणि कानपुरावर चाल करून येण्यास सुचवीत आहेत, असें नानासाहेबांच्या नजरेस पुराव्यानिशीं आलें. सर्वजण बिब्बीघरांतील त्या कारस्थानी इंग्रज स्त्रियांवर

जळफळूं लागले. बंडवाले तर त्यांना खाऊं का गिळूं करूं लागले. फत्तेपूर येथें इंग्रज सैनिकांनीं हिंदी बायका-मुलांची होळीच केली होती! इंग्रजांचीं बायका-मुलें बिब्बीघराच्या बंदिखान्यांत अडकून पडलीं आहेत, हें कळतांच, अलाहाबादेहून हॅवलॉक हा सेनापति प्रचंड सेना घेऊन कानपूरकडे निघाला. नव्या लांब पल्लयाच्या बंदुकांनीं बंडवाल्यांची वाटेंत दाणादाण उडवून तो पुढें येऊं लागला. तेव्हां बंडवाल्यांचा एक म्होरक्या अजमुल्लाखान यानें असा राक्षसी सल्ला नानासाहेबांना दिला कीं, "हॅवलॉक येथें येऊन पोहोंचण्यापूर्वीं बिब्बीघरांतील फितुरी करणाऱ्या इंग्रज बायकांची कत्तल आपण उडवूं या." नानासाहेबांना हा निर्दय विचार मानवला नाहीं. त्यांच्या घरच्या स्त्रियांनीं तर अजमुल्लाखानाला स्वच्छ बजावलें, "तुझें हें धोरण उलट्या काळजाचें आहे. असलें राक्षसी कृत्य तूं जर करशील, तर आम्ही जीव देऊं."

पण त्या वेळीं अजमुल्लाखानाचें प्रस्थ वाढलेलें होतें. तो तसाच तडक बिब्बीघराकडे गेला. तेथें चारपांच आजारी इंग्रज पुरुष होते, त्यांचीं मुंडकीं छाटण्याचा हुकूम त्यानें आपल्या शिपायांना प्रथम दिला. लगेच तसें घडलें. नंतर त्यानें दुसरा हुकूम सोडला, "या बायका-मुलांची कत्तल करा." पण कोणीच शिपाई तें आसुरी कृत्य करण्यास पुढें येईनात.

तेव्हां त्यानें तुरुंगाच्या पहारेकऱ्यांना तोच हुकूम दिला. त्यांनीं बंदुका उचलल्या, आणि इंग्रज स्त्रियांवर गोळ्या झाडल्या! त्यामुळें त्या गोऱ्या स्त्रिया तडफडूं लागल्या–किंचाळूं लागल्या. तेव्हां त्या पाषाणहृदयीं पहारेकऱ्यांचेंहि हृदय द्रवलें आणि ते अजमुल्लाखानाला म्हणाले, "साहेब, हें खाटीक–काम आमच्या हातून होणार नाहीं."

"होणार नाहीं? मग तुम्हांला मी तोफेच्या तोंडीं देईन."

"द्या, खुशाल द्या. पण हें पापकर्म करून नरकाची जोड आम्ही करून घेणार नाहीं."

कोणताहि गुन्हा नसलेल्या, त्या गोऱ्या निःशस्त्र अबलांवर, हत्यार चालविण्यास कोणता माणूस तयार होईल? माणुसकीची राखरांगोळी करून आपलें पोट जाळणारे कसाईच या कामाला योग्य. गरीब गाईंची

हत्या करण्यांचा त्यांचा स्वभावच ! पांच कसाई बिब्बीघरांत आले आणि त्यांनीं आपल्या सुरीनें एकेका इंग्रज स्त्रीचें मुंडकें छाटलें. २१० स्त्रिया व मुलें यांचा निर्दय निःपात झाला ! भूत-पिशाच्च-वेताळांनाहि शरम वाटावी असें हें नीच कृत्य !

दुसरे दिवशीं सकाळीं त्या सर्व इंग्रजांचीं प्रेतें जवळच्या विहिरींत टाकण्यांत आलीं ! नानासाहेबांनीं या सैतानी कृत्याबद्दल नापसंती व्यक्त केली.

●

बंडवाल्यांची सद्दी जोराची होती. त्यांची विजयाची कमान चढत होती. ठिकाठिकाणीं त्यांची सरशी होत होती. नानासाहेबांच्या हातीं सर्वांचीं सूत्रें होतीं. त्यांनीं बंडवाल्यामध्यें नवा जोम, नवा उत्साह निर्माण व्हावा म्हणून एक घटना योजली. ती म्हणजे राज्याभिषेक ! राज्य नाहीं, पेन्शन नाहीं, मग राज्याभिषेक कोठला ? तें सौख्य, तो मान मिळविणारे शेवटचे पेशवे म्हणजे दुसरे बाजीराव. त्यानंतर नानासाहेबांची ती आशा धुळीसच मिळाली होती. पण या बंडामुळें त्या आशेला नवी पालवी फुटली. विजयाचा निम्मा टप्पा गांठल्यानंतर, जनतेची सहानुभूति मिळविण्यासाठीं, नानासाहेबांनीं आपल्या राज्याभिषेकाचा घाट घातला.

ता. २८ जूनला एक टोलेजंग दरबार भरविण्यांत आला. आतां त्यांच्या वैभवाला काय उणें ? शत्रु तर जवळपास फिरकत नव्हता. सायंकाळीं ५ वाजतां दरबाराला प्रारंभ झाला. १०१ तोफांच्या सलामीनें दिल्लीच्या बादशहाला प्रथम हा सन्मान दिला. पुनः २१ तोफा उडाल्या. कारण नानासाहेब पेशवे सैनिकतळावर येऊन दाखल झाले. नाना गांवांहून व शहरांहून आलेलीं बंडवाल्यांचीं पायदळें व घोडदळें तेथें खडीं होतीं. वाघांच्या टोळीसारखा दिसणारा विजयी तोफखानाहि तेथें होता.

आणि ता. १ जुलै रोजीं ब्रह्मावर्त येथें धर्मशास्त्रास अनुसरून, नानासाहेबांना पेशव्यांच्या पुरातन सिंहासनावर, राज्याभिषेक झाला. होमहवन, मंत्र-पुष्प इत्यादि सर्व विधि झाले. सलामीच्या तोफा सोडण्यांत आल्या. रात्रीं कानपूर येथें दारूकाम झालें. तें हजारों लोकांनीं पाहिलें. हिंदवी स्वराज्याची प्रभा सर्वत्र पसरली. ता. ८ रोजीं मैदानावर शिपायांची कवायत झाली. त्यांना नानासाहेबांनीं बक्षीस म्हणून एक

लाख रुपये देण्याचें जाहीर केलें. कानपूरच्या कारभारासाठीं नानासाहेबांनीं एक मुसलमान अधिकारी नेमला. त्यामुळें तेथील मुसलमान लोकहि या हिंदु राजावर खूष झाले. सारे सैनिक व सारे नागरिक उत्सवांत भाग घेऊं लागले–नानासाहेबांचा जयजयकार करूं लागले–उंचीउंची नजराणे अर्पण करूं लागले !

पण राज्याभिषेकाचें हें सुख, भर उन्हांत नागाच्या फणीखालीं विसावलेल्या बेडकाइतकेंच ! नऊ दिवसांतच नानासाहेबांचे सेनापति हॅवलॉकला सामना देण्यासाठीं बाहेर पडले. कानपूरपासून चाळीस मैलांवर फत्तेपूर येथें या दोन्ही सैन्यांची गांठ पडली आणि इंग्रजांची सरशी झाली. फत्तेपूर बंडखोरांच्या हातीं पांच आठवडे राहिलें. इंग्रजांनीं बंडखोरांची ससेहोलपट केली! त्यांनीं गांवेंच्या गांवें जाळलीं! जेथें सुंदर इमारती होत्या, तेथें राखेचे ढीग दिसूं लागले ! जेथें बागेंतील सुगंध यावयाचा तेथें प्रेतांची घाण सुटूं लागली !

आपल्या सैन्याची ही दुर्दशा कानीं पडतांच, नानासाहेब स्वतः हॅवलॉकचें पारिपत्य करण्यास निघाले. पायदळ, घोडदळ व गोलंदाज मिळून ५००० सैनिक बरोबर घेऊन ता. १६ जुलै रोजीं, या नव्या पेशव्यानें कूच केलें. दोन्ही सैन्यें समोरासमोर आलीं. रणवाद्यें वाजूं लागलीं. गोळ्यांचा वर्षाव उभयपक्षीं सुरू झाला. नंतर हातघाईचें युद्ध झालें. तोफांच्या माऱ्यांतहि ब्रिटिश सैनिक मरत मरत पुढें घुसले आणि त्यांनीं तोफा जिंकल्या. बंडखोर पळूं लागले. इंग्रज त्यांचा पाठलाग करूं लागले. इंग्रजामध्यें एकी होती, शिस्त होती, नव्या धर्तीचीं शस्त्रें होतीं व ताज्या दमाचे सेनापति होते. त्यामुळें नानासाहेबांचें सारें रण–चातुर्य निकामी ठरलें. त्यांना रणांगणांतून पळ काढावा लागला. ते ब्रह्मावर्ताला गेले. इंग्रजांची फत्ते झाली.

दुसऱ्या दिवशीं हॅवलॉक कानपूरला जाऊन थडकला. त्यानें तेथें इंग्रजांचें ‘ युनियन जॅक ’ फडकविलें. पण त्याच्या अंतःकरणांत विजयाचा आनंद नव्हता. त्याला गंगेच्या घाटावर पडलेले इंग्रज सैनिकांच्या रक्ताचे डाग दिसले. तसाच दिसला त्याला बिब्बीघरांतील इंग्रज बायका-मुलांचा मांसाचा चिखल ! तेथें बायकांच्या केसांचे पुंजके पडले होते. त्यांच्या

टोप्या व बूट इकडे-तिकडे विखुरलेले होते. लहान मुलांचीं खेळणींहि मधूनमधून दिसत होतीं--आणि एका कोपऱ्यांत ख्रिस्ती लोकांचा धर्मग्रंथ आक्रोश करीत होता.


दया व शांति यांचा मंत्र सांगणारीं बायबलचीं पानें फडफडत होतीं. दया व शांति यांची राखरांगोळी करणारीं कृत्यें तेथें घडल्याची कहाणी तीं पवित्र पानें घसा फोडून निवेदन करीत होतीं.

बंडखोरांच्या सवाई क्रूरपणा हॅवलॉकच्या सैनिकांनीं केला. साऱ्या कानपूर शहरांत त्यांनीं नंगा नाच घातला. चेंगीजखान--नादीरशहा--तैमूरलंग इत्यादि नर-राक्षसांनीं मिळून जेवढे अत्याचार केले असतील, ते सारे इंग्रज सैनिकांनीं मनसोक्त केले! दहा हजारांहून अधिक लोकांना त्यांनीं सपासप् कापून काढलें. दिसेल त्याला ठार करावें व मिळेल तें लांबवावें--हेंच त्यांचें धोरण! लुटालूट, जाळपोळ व कापाकापी यांचेंच थैमान कानपुरांत रात्रंदिवस चालू होतें. साऱ्या शहराला स्मशानाची कळा आली. हिंदु-मुसलमान नागरिकांचा सूड घेण्यासाठीं इंग्रजांनीं त्यांना बिब्बीघरांतील गोऱ्या रक्ताचे डाग जिभेनें चाटावयाला लावलें. कोणी कांकूं करूं लागला कीं, त्याच्या पाठीवर फटके बसत आणि शेवटीं फाशी!

पण नानासाहेबांचा सूड घेण्याचें राहिलें होतें; त्यासाठीं हॅवलॉकनें आपली एक पलटण ब्रह्मावर्ताकडे रवाना केली. पण तेथें नानासाहेब कोठें होते? त्यांचा दिवाण रामचंद्रराव तेवढा होता. तो इंग्रजांचा साथीदार झाला. त्या फितुरीबद्दल त्याला इंग्रजांकडून जहागीर मिळाली. त्यानें सताड उघडून दिलेल्या राजवाड्यांत इंग्रज सैनिकांनीं हैदोस घातला. नानासाहेबांची अफाट संपत्ति त्यांनीं लुटली. विहिरींत ठेवलेलीं सोन्याचांदीचीं भांडीं रात्रंदिवस उपसा करकरून त्यांनीं बळकावलीं. हिऱ्या-मोत्यांनीं जडलेली नानासाहेबांची तीन लाख रुपये किंमतीची तलवार त्यांनीं हस्तगत केली. विशेष म्हणजे नानासाहेबांचा वाडा मोडून, पाडून, जाळून उध्वस्त करण्यांत आला आणि त्याच्या पायाचे मोठमोठे संगमरवरी दगड कानपूरच्या ख्रिस्ती प्रार्थना-मंदिरासाठीं नेण्यांत आले. वाड्यांतील स्त्रियांनीं, रजपूत रमणीप्रमाणें, जोहार केला! ज्या जळून मेल्या; त्यांत नानासाहेबांची लाडकी मुलगीहि दग्ध झाली!

★

६ पीत कडाडली



वेलीचीं फुलें खुडतांनाहि जिचें मन कंपित व्हावें, ती युवती, लष्करी वेष लेऊन, रणांगणावर उभी ठाकून, हातीं समशेर घेऊन,

शत्रूच्या शूर सैनिकांचीं मस्तकें सटासट् छाटीत सुटते, हें केवढें नवल ! सर्व जगाच्या इतिहासांत असा अद्भुत् चमत्कार क्वचितच् ! १५ व्या शतकांत फ्रान्स देशामध्यें १९ वर्षांच्या ' जोन ऑफ आर्क ' या खेडूत मुलीनें असा पराक्रम करून दाखविला; पण रणांगण व राज्य-शासन या दोन्ही क्षेत्रांमध्यें, आपल्या शौर्यानें व चातुर्यानें, बिजलीप्रमाणें चमकणारी, २३ वर्षांची झांशीची राणी लक्ष्मीबाई ही, भारताच्याच नव्हे तर सर्व जगाच्या इतिहासांत, अद्वितीय आहे, अतुलनीय आहे.

लक्ष्मीबाईचें जीवन दैवाच्या लाटेबरोबर खालींवर होत होतें. ती मूळची महाराष्ट्रांतील, पण काशीक्षेत्रीं जन्मलेली--म्हणून तिचें नांव ठेवलेलें 'मणि-कर्णिका'. मूळची एका सामान्य भिक्षुकाची मुलगी;परंतु दैवानें तिला राणी-पदावर चढविलें. थोडयाच काळानंतर तिचें दुर्दैव इंग्रजांच्या रूपानें उभें राहिलें आणि त्यानें तिला पेन्शनर बनविलें. पुनः सुदैवाची लाट आली. स्वातंत्र्य-युद्धाच्या आंदोलनानें तिला पुनः राज्ञीपदावर बसाविलें. सुमारें दहा महिने तिनें राणीचा अधिकार गाजविला— अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत पण अत्यंत नेटानें, धैर्यानें व चातुर्यानें ! केवळ तिचे प्रजाजनच नव्हे तर तिचे शत्रु बनलेले इंग्रज अधिकारीहि तिचे लोकोत्तर गुण पाहून आश्चर्यानें तोंडांत बोट घालीत !

राणीचा वकील जॉन लँग तिचें वर्णन असें करतो :--

" राणी मध्यम उंचीची होती. ती शरिरानें सुदृढ होती—पण फार सुदृढ नव्हे. तिचा चेहरा वाटोळा होता पण तो मोठा आकर्षक होता. तिच्या मुद्रेवर बुद्धिमत्तेचें तेज झळकत असे. विशेषतः तिचे डोळे फारच सुंदर होते आणि नाकाचा आकार अत्यंत नाजूक होता. तिच्या अंगाचा वर्ण काळा मुळींच नव्हता—-पण ती अगदीं गोरीपानहि नव्हती. तिच्या अंगावर दागिना असा एकहि नसे. कानांत सोन्याच्या बुगडया असतील तेवढ्याच. अंगावर पांढरें स्वच्छ वस्त्र पेहरलेलें असे. तें इतकें तलम असे व इतकें घट्ट नेसलेलें असे कीं, तिच्या शरिराची ठेवण स्पष्ट दिसावी. खरोखर तिची आकृति मोठी अलौकिक होती--अत्यंत सुंदर होती. तिचा स्वर मात्र खराब होता. "

लक्ष्मीबाईंचा दिनक्रम अगदीं नमुनेदार होता. दुःख, चिंता, संकटें, विघ्नें यांचीं काळींकुट्ट अभ्रें चोहोंबाजूंनीं कितीहि दाटून आलीं, तरी त्या आपला दिनक्रम शिस्तीनें, दक्षतेनें व भक्तिभावानें पार पाडीत. त्यामुळें सर्व लोकांमध्यें त्यांच्याविषयीं गाढ आदर व प्रेमभाव निर्माण झाला. "महालक्ष्मीच आहे ही दुसरी!" असे गौरवाचे उद्गार घरा-घरांतून निघत. पहांटे उठून कसरत-शाळेंत जाऊन जोर, जोडी, मलखांब करावा. नंतर घोडयावर बसून फिरावयास जावें व घोडा मंडळावर धरावा, कुंपणावरून उडवावा, खंदकाच्या पार घालवावा, एकदम खालीं बसवावा इत्यादि नाना प्रकारच्या घोडयाच्या कसरती कराव्या, असा त्यांचा नित्य क्रम. कधीं कधीं त्या हत्तीवरहि बसत असत.

त्यानंतर स्नान आटोपून, स्वच्छ पांढरें पातळ नेसून त्या धर्मविधि करीत. तुळशीची व पार्थिव लिंगाची पूजा त्या करीत. रोज दीडशें आश्रित लोक मुजरे करावयास येत. राणीची नजर इतकी बारीक कीं, एखाद्या दिवशीं एखादा मुजरा कमी पडला, तर दुसऱ्या दिवशीं त्या नेमकी चौकशी करीत. दुपारीं तीन वाजतां त्या कचेरीस जात--पुरुष-वेष धारण करून--पायांत पायजमा, अंगांत जांभळ्या आंबव्याची बंडी, डोकीस टोपी घालून वर पागोट्यासारखी बांधलेली बत्ती, कमरेस काच्या किंवा जरीचा दुपेटा व त्यास लटकविलेली तलवार अशा पोषाखानें--ती गौरवर्ण उंच मूर्ति गौरीप्रमाणें दिसत असे.

कधीं कचेरींतहि त्या स्त्रीवेषानें जात. त्या वेळीं त्यांचा पोषाख अगदीं साधा असे. पांढरा शालू व पांढरी चोळी. वैधव्यामुळें अंगावर फारसे दागिने नसत. फक्त राणीचा रुबाब राखण्यासाठीं हातांत सोन्याच्या बांगडया व गोट, गळ्यांत मोत्यांचे पेंडे व बोटांत हिऱ्याची आंगठी! कचेरींत पडदपोशीची एक खोली असे. तींत गादीवर लोडाशीं टेकून त्या बसत. दिवाणजी कामाच्या कागदांचें पुडकें घेऊन उभे असत. दिवाणी, फौजदारी व मुलकी या साऱ्या कामांचा फडशा राणीसाहेब सपासप् पाडीत.

दर शुक्रवारीं व मंगळवारीं त्या महालक्ष्मीचे दर्शनास जात--कधीं घोड्यावरून तर कधीं मेण्यांतून! मेण्यावर जरीनें बांधलेले चिकाचे पडदे

असत. सोन्याच्या दांड्याच्या चवऱ्या घेऊन चार सुंदर दासी त्या मेण्या-बरोबर धावत. मेण्याच्या पुढें शिंगे-कर्णे वाजत. मागें-पुढें घोडेस्वार असत. बंदुकीचे आवाज निघत. किल्ल्यावरील चौघडा घोष करी. परत येतांना रात्र झाल्यास शेकडों मशाली पेटवीत-राणीचें हें वैभव पाहून प्रजाजनांच्या डोळ्यांचें पारणें फिटे.

अनुष्ठानें व सहस्र-भोजनें चालू असत. जप व दानें, यज्ञ व आवर्तनें—इत्यादि धार्मिक विधि-समारंभ सदैव चालत. राणीसाहेब जितक्या भक्तिशील, तितक्याच दान-शीलहि ! कोणी भटजी आला व मुलीच्या लग्नासाठीं ५०० रुपये मागूं लागला, तर चटकन् त्या तांब्याचे ताम्हणांतून रुपयांची रास भटजीच्या पदरांत ओतीत आणि वर विनोदानें म्हणत, " भटजीमहाराज, लग्नाची कुंकुम-पत्रिका आम्हांस पाठवावयास विसरूं नका हो ! " त्यांच्या औदार्याच्या अशा किती गोष्टी सांगाव्यात ?

दिवस थंडीचे ! झांशी प्रांतीं गारठा कडाक्याचा. एकादां हजारों भणंग-भिकारी महालक्ष्मीच्या देवळापुढें गर्दी करून उभे होते. लक्ष्मीनें त्यांची प्रार्थना ऐकली—आणि राणी लक्ष्मीबाईंच्या मुखानें ती बोलली, " तुम्हांपैकीं प्रत्येकास एकेक घोंगडी, बंडी व टोपी मिळेल." चार दिवसांत चार हजार टोप्या वाटल्या गेल्या.

जसें हें औदार्य, तसेंच शौर्यहि ! एका शहरांत चोरट्यांचा फार उपद्रव झाला. लगेच राणीसाहेब स्वतः तेथें गेल्या व पंधरा दिवस राहून त्यांनीं त्या चोरट्यांचा पुरा बंदोबस्त केला. राणीसाहेबांचें चातुर्य, औदार्य व शौर्य अलौकिक होतें. पण पारतंत्र्यामुळें या साऱ्या सोन्या-सारख्या गुणांची माती होत होती. पारतंत्र्य हें हिऱ्याचे कोळसे करतें व माणसांना पशु बनवितें. कपटानें व क्रौर्यानें इंग्रजांनीं झांशीच्या राज्यावर पारतंत्र्याचा वरवंटा फिरविला आणि पुकार केला—

" खुल्क खुदाका, मुल्क बादशाहका, अंमल कंपनीका "

पण दैवाचा उलटा वारा आला—बंडाचा झंझावात सुटला, आणि झांशी संस्थानांत द्वाही फिरली—

" खुल्क खुदाका, मुल्क बादशाहका, अंमल लक्ष्मीबाईका "

चैत्र महिना सरत आला-शुक्रवारचा दिवस उजाडला-किल्ल्यांतील राजवाड्यांत हळदी-कुंकवाचा मोठा समारंभ झाला. शहरांतील सर्व वर्णांच्या तमाम स्त्रिया उंचीउंची वस्त्रें नेसून व सोन्यामोत्यांचे अलंकार लेऊन, कोणी मेण्यांत, तर कोणी पालख्यांत बसून किल्ल्यांत आल्या. चार खंडी हरबरे हौदांत भिजत घातले होते. खिरापत, फुलें, अत्तर, गुलाब इत्यादींचा थाटमाट झाला. शंभर सुवासिनी हळदकुंकू देत होत्या. दुपारीं दोन वाजल्यापासून रात्रीं नऊ वाजेपर्यंत हा समारंभ चालला. दिवाणखान्यांत एका मजल्याइतकी उंच गौर मांडून सजविलेली होती. तिच्या आजूबाजूस किनखापाचे पडदे व वर जरीचें छत. हंड्या-झुंबरांतील दिव्यांनीं सर्वत्र लखलखाट करून सोडला होता.

महालक्ष्मीचा हा उत्सव होतो न होतो, तोंच रण-लक्ष्मीचा जल्लोश सुरू झाला. एके दिवशीं सकाळीं शहराचे दक्षिण अंगास तंबूच तंबू दिसूं लागले. जशा कांहीं पांढऱ्या सोंगट्याच ! मधूनमधून आगट्या पेटलेल्या होत्या व त्यांतून धुराचीं वर्तुळें आकाशांत जात होतीं. बंदुकीच्या व तोफांच्या गोळ्यांच्या त्या दूतिकाच होत्या काय ?

तो इंग्रजी फौजेचा तळ होता. तेथून राणीसाहेबांना खलिता आला—" दोन दिवसांत आमचे भेटीस निःशस्त्र होऊन या."

खलित्याला उत्तर गेलें, " भेटीस कशाला बोलविलें आहे व दगा होईल का नाहीं याचा पत्रांत खुलासा कांहींच नाहीं. संस्थानचे चाली-प्रमाणें हत्यारबंद लोक बरोबर घ्यावयाचे, ते घेऊन दिवाणजी भेटीस येतील. मी बायको मनुष्य, माझें येणें होणार नाहीं. यावर आपली मर्जी."

या लेखणीच्या चकमकींतूनच शस्त्रांची चकमक सुरू झाली. इंग्रजांनीं राणीला अत्यंत तुच्छतेनें वागविलें होतें. तिचें संस्थान तर घशांत घातलेंच, पण तिचें पांच हजार रुपयांचें तोटकें पेन्शनसुद्धां बंद केलें. कां ? तर संस्थानचें कर्ज फेडण्यासाठीं ! मुलाच्या मुंजीसाठीं, इंग्रजांच्या तिजोरींतील आपले स्वतःचे पैसे, तिनें मागितले, तर त्याला इंग्रजांचा नकार. महालक्ष्मीच्या खर्चासाठीं दोन गांव इनाम दिलेले होते, तेहि इंग्रजांनीं जप्त केले.

इंग्रजांचे गोरे पाय संस्थानाला लागल्यापासून तेथें गोहत्त्या होऊं लागली. ही गोष्ट धर्मशील हिंदु राणीच्या जिव्हारीं सहजच लागली. तिनें

इंग्रजांना विनवणी केली, " गोमातेची ही हत्या थांबवा." पण इंग्रज सरकारचा कणा म्हणजे त्यांचे गोरे सैनिक, आणि त्यांची जीभ तर गो-मांसाला चटावलेली ! त्यांनीं राणीची हीहि विनंती फेटाळून लावली ! आपल्याला गो-हत्येचें पाप लागूं नये, म्हणून राणीसाहेबांनीं अखेरची दीनवाणी विनवणी केली, " मला या झांशीस राहावत नाहीं—काशीस जाण्याची परवानगी द्या." तीहि धुडकावण्यांत आली. राणीसाहेबांच्या कोमल हृदयावर हे एकामागून एक तापल्या सांडसाचे डाग इंग्रज लोक बेगुमानपणें देत होते.

ता. ७ जून रोजीं झांशीच्या फौजेनें बंड पुकारलें. किल्ल्यांतील ७५ पुरुष, १९ स्त्रिया व २३ मुलें—असे ११७ इंग्रज कापले गेले. या कत्तलींत राणीचें मुळींच अंग नव्हतें. पण आपल्या प्रजाजनांना उपद्रव होऊं नये, म्हणून राणीनें बंडवाल्यांना तीन लाख रुपये दिले. तेव्हां बंडवाले दिल्लीकडे गेले. प्रजाजनांची दुर्दशा होऊं नये म्हणून राणीनें, ता. ९ जून रोजीं, झांशीच्या राज्यांचीं सूत्रें, आपल्या हातीं घेतलीं. किल्ल्यावर पेशव्यांचा भगवा झेंडा व इंग्रजांचें युनियन जॅक हीं दोन्ही निशाणें फडकूं लागलीं. अशा पेचाच्या काळांत राणीनें तब्बल दहा महिने अत्यंत कौशल्यानें राज्य-कारभार केला. इंग्रजांच्या वतीनेंच आपण राज्य करीत आहों, असें त्यांनीं इंग्रज अधिकाऱ्यांना लिहून कळविलें. पण त्यानें इंग्रजांचें समाधान कसें होणार ?

शहरोशहरीं पेटलेल्या बंडाच्या आगी इंग्रज हिमतीनें व चिकाटीनें विझवीत चालले होते. दिल्ली जिंकण्यासाठीं त्यांनीं सतत तीन महिने एकसारख्या ३०।४० चकमकी केल्या, आणि ता. २० सप्टेंबर रोजीं ती राजधानी पुनः सर केली. सुमारें ४००० इंग्रज ठार झाले; पण अखेर जय त्यांनाच मिळाला. म्हातारा बादशहा भीतीनें लपून बसला, आणि आमची फितुरी इंग्रजांच्या साहाय्यास धावली—बादशहाच्या प्रत्यक्ष व्याह्यानेंच त्याला पकडून दिलें. त्याला इंग्रजांनीं ब्रह्मदेशांत सहकुटुंब हद्दपार केलें. आणि त्याचे तीन राजपुत्र तर, भर रस्त्यांत गाडींतून ओढून, कांहींहि चौकशी न करतां, बेवारशी कुत्र्याप्रमाणें, गोळ्या घालून ठार केले !

जशी दिल्ली, तसेंच कानपूरहि इंग्रजांनीं बंडखोरांच्या हातून, ता. ६ डिसेंबर रोजीं हिसकावून घेतलें. बंडाचें तिसरें केन्द्र म्हणजे लखनौ. तेंहि ता. १७ मार्च १८५८ रोजीं, इंग्रजांनीं परत सर केलें. ठिकठिकाणच्या बंडखोरांचा बीमोड झाला. तो करतांना दया–माया, संस्कृति–शिष्टाचार, फार काय, साधी माणुसकीहि त्यांनीं पाळली नाहीं.

रावी नदीच्या कांठीं, बालघा नांवाच्या गांवीं, बंडखोर जमले होते. त्यांच्यावर इंग्रज अधिकाऱ्यानें, रात्रीच्या वेळीं, अचानक हल्ला केला आणि त्यांची लांडगे-तोड केली. २८२ बंडवाल्यांचीं प्रेतें त्यानें विहिरींत फेकून दिलीं. कानपूरच्या विहिरीचा हा सवाई सूड ! ५०० बंडवाल्यांची सररहा कत्तल झाली.

प्राणावर उदार होऊन इंग्रज लढत. नील, लॉरेन्स, हॅवलॉक असे एकामागून एक शूर सेनापति बंडवाल्यांनीं ठार केले, तरी इंग्रज लोक डरत नव्हते–नवे नवे सेनापति ताज्या उत्साहानें पुढें येत होते.

दिल्ली, कानपूर, लखनौ–येथून मोकळे झालेले सारे इंग्रज सेनापति आपलें प्रचंड सैन्य व विपुल शस्त्र-संभार घेऊन, राणीच्या झांशीवर, कृतांत-काळाप्रमाणें, मरण-लोंढ्याप्रमाणें, वेगानें व एकजुटीनें लोटले. ता. १९ मार्च रोजीं, सर ह्यू रोझ यानें झांशीवर तोफा डागल्या. त्याचें सैन्य सुमारें ७००० व राणीचें सैन्य ११०००. पण इंग्रजी सैन्य कवायतींत मुरलेलें व विजयानें तरारलेलें ! त्यांच्या तोफा प्रचंड व पल्लेदार ! तशाच दुर्बिणीहि दूर पल्ल्याच्या ! उलट राणी एकटी —तरुण स्त्री ! बंडवाले सर्वत्र हरलेले ! काल्पी येथें रावसाहेब पेशवे व तात्या टोपे एकवटले होते. तेथें त्यांनीं दारूगोळ्याचा मोठा कारखानाहि काढला होता. पेशव्याकडे राणीनें आपले घोडेस्वार दौडविले व साहाय्य मागितलें. त्यांनीं स्वतःहि मोठ्या हिमतीनें प्रतिकाराची तयारी केली.

राणीसाहेबांनीं झांशीमध्यें दारूगोळ्याचा कारखाना उघडला, किल्ल्याची डागडुजी केली व जुन्या तोफा कामीं आणल्या; अन्नसामुग्री भरून ठेवली. राजवाड्यांतील हंडे-घागरी वगैरे चांदीचीं भांडीं टांकसाळींत टाकून नवे हजारों रुपये पाडले. सैन्यांत जोरानें भरती केली. किल्ल्याच्या

तटावर फुटाफुटावर सैनिक उभा केला आणि बुरुजाबुरुजावर तोफा लावून ठेवल्या. सारा किल्ला सजीव झाला ! सचेतन बनला !

किल्ला फार जुनाट व अति बळकट-आंत चार हजार माणूस राहील इतका मोठा ! त्यांतील पांच-मजली, आठ-चौकी, सरकारी वाडा मजबूत ! एक बंगला तर सात-मजली. खालीं विस्तीर्ण तळघरें व पाण्याचे प्रचंड साठे. जवळच रमणीय बागाहि ! तटाचें बांधकाम अशा चुन्यानें केलेलें कीं, इंग्रजांच्या तोफांचे गोळे आले, तर त्यांच्या आकाराचेंच भोंक पडावें, बाकी तट शाबूत ! किल्ला जणु अजिंक्य होता !

पण अजिंक्यालाहि जिंकून देणारी विषवल्ली तेथें होती. ती म्हणजे फितुरी ! तिसरे दिवशीं रात्रीं, दुलाजी ठाकुरानें दाखविलेल्या जागीं, इंग्रजांच्या तोफांचे गोळे पडूं लागले. आणि एके दिवशीं तर किल्ल्यांतील दारूच्या कारखान्यांवरच तोफ-गोळा आदळला ! जिकडे तिकडे धुराचे लोट पसरले. तीस पुरुष व आठ बायका मरण पावल्या. आणि पुढें एके दिवशीं किल्ल्यांतील आरसे-महालच फुटला.

आठव्या दिवशीं फार कहर झाला व युद्ध फार तुंबळ झालें. 'मारो फिरंगी को,' 'मारो फिरंगी को' अशा आरोळ्या वीर देत होते. बंदुकांचे व तोफांचे आवाज दुमदुमत होते. शिंगें, कर्णे, बिगुल जिकडे तिकडे वाजत होते. धुळीनें, धुरानें व नाना प्रकारच्या ध्वनीनें सर्व दिशा भरून राहिल्या होत्या. इंग्रज फौजेनें फार शिकस्त केली. रात्रीं आकाशांतून तोफांच्या लाल गोळ्यांची शहरावर एकसारखी वृष्टि चालली होती. शहरांत हजारों माणसें मरण पावलीं.

तरी राणीसाहेबांची हिंमत दांडगी ! त्यांच्या अंगीं महिषासुर-मर्दिनीचा आवेश चढलेला ! रात्रन्‌दिवस त्या युद्धभागीं तळपत होत्या. शौर्य गाजविलेल्या गोलंदाजास त्या चांदीचे तोडे बक्षिस देत होत्या, तर जखमी झालेल्या सैनिकांची सेवा-शुश्रूषा स्वतः करीत होत्या. त्यांचें अनुकरण करून कैक तरुण स्त्रिया रणकार्यासाठीं उभ्या ठाकल्या—हातांत शस्त्र घेऊन त्या शहरांत गस्त घालूं लागल्या.

काल्पीहून तात्या टोपे १५००० सैन्य घेऊन झांशीजवळ येऊन पोहोंचले. आंतून राणीचा व बाहेरून तात्यांचा—असे दुहेरी हल्ले

इंग्रजांवर होऊं लागले. मोठ्या निकराचें, हातघाईचें युद्ध माजलें. पायदळाशीं पायदळ व स्वाराशीं स्वार लढूं लागले. पण इंग्रज चिवट! त्यांचें शस्त्र तीक्ष्ण! त्यांच्या १५०० सैनिकांनीं तात्यांच्या १५००० शिपायांना दमविलें. त्यांत गोरे सैनिक ५०० च होते! तात्यांच्या फौजेनें पळ काढला. खुद्द तात्याहि तोफा टाकून पळून गेले.

अकरा दिवस असें शर्थीचें युद्ध झालें. बारावा दिवस उजाडला. सकाळच्या सूर्याचे सोनेरी किरण किल्ल्यावर पसरूं लागले. हजारों मजूर डोक्यावर गवताचे भारे घेऊन शहराच्या तटाकडे येऊं लागले--आणि त्यांच्यापाठोपाठ येत होते, खांद्यावर बंदुक घेतलेले, गोरे सैनिक! मजुरांनीं तटापाशीं येतांच डोक्यावरचे गवताचे भारे एकावर एक टाकले, आणि तटावर चढून जाण्यास सुंदर वाट करून दिली. त्यावरून इंग्रज सैनिक, आनंदानें माकडाप्रमाणें उड्या मारून, किल्ल्यांत शिरले. हां हां म्हणतां शहराच्या तटावर हजारों इंग्रज उभे राहिलेले दिसूं लागले. पांढऱ्या मुंग्या हत्तिणीचा प्राण घेण्यासाठीं जमल्या.

हें भयंकर दृश्य राणीसाहेबांना किल्ल्यांतील आपल्या बंगल्याच्या सहाव्या मजल्यावरून दिसलें. त्यानें त्या भ्याल्या काय? स्वस्थ बसल्या काय? सुस्कारे टाकूं लागल्या काय?

छे! तो पहा त्यांचा तजेल घोडा तडफेनें निघाला. बरोबर दीड-हजार हत्यारबंद अरब होते. इंग्रजांची व झांशीवाल्यांची गांठ पडली. तरवारींची खणाखणी सुरु झाली. राणीसाहेब स्वतः समशेर घेऊन मध्यभागीं उभ्या राहिल्या व लढूं लागल्या. गोऱ्यांच्या लाल रक्तानें झांशीची भूमि न्हाऊन निघाली. स्वतः राणीसाहेबांनींहि भूमातेला रुधिर-स्नान घातलें. दिसला गोरा कीं कापून टाक, असा सपाटा त्यांनीं लावला. गोऱ्यांना टिकाव धरवेना. त्यांनीं पळ काढला. झाडांच्या व घरांच्या आडून ते बंदुकीच्या गोळ्या सोडूं लागले, तेव्हां राणीसाहेब किल्ल्यांत परत आल्या.

सतत सतरा दिवस निकराचें युद्ध झालें. तरुण राणी एकाकी लढत राहिली. तिचें सारें शौर्य इंग्रजांच्या भारी फौजेपुढें दुबळें ठरलें. तिचें बहुतक सैन्य कापलें गेलें. झांशी शहर इंग्रजांच्या ताब्यांत गेलें. "अशा अवस्थेंत किल्ल्यांत आपण किती दिवस राहणार? आणि

राहून तरी काय करणार ? " असे विचार राणीच्या मनांत कोलाहल करूं लागले. किल्ल्यांतील धान्याचा सांठा संपला होता—पाण्याचा सांठा तोफेच्या गोळ्यांनीं उध्वस्त केला होता. मग तेथें राहावयाचें कसें व कशासाठीं ?

" बाबा, महालक्ष्मी पाठमोरी झाली–यशाची आशा संपली–नामुष्कीची वेळ आली. आतां मी रजपूत रमणींचा मार्ग अनुसरणार. " राणीसाहेब आपल्या वडिलांना दीन स्वरांत म्हणाल्या.

" म्हणजे काय करणार तूं ? " मोरोपंतांच्या काळजाचा थरकांप उडाला. त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले.

" जोहार !–मी जोहार करणार. हें दुर्दैवी शरीर अग्निनारायणाला समर्पण करणार. मी विधवा–अर्धाशेर तांदुळाची धनीण. पण या युद्धांत पडलें. कां ? तर हिंदुधर्माचा अभिमान म्हणून. त्यासाठीं वित्ताची–जीविताची आशा सोडली. पण आमच्या पदरीं पातकच फार. म्हणून ईश्वर आम्हांस यश देत नाहीं. मग जगून काय करावयाचें ? " राणीसाहेब निश्चयी स्वरांत म्हणाल्या.

त्या निश्चयापासून त्यांना परावृत्त कसें करावयाचें ? मोरोपंत विचार करूं लागले. अखेर त्यांना एक मार्ग सांपडला व ते म्हणाले, " बाळे, एवींतेवीं मरण चुकतच नाहीं ना ? मग चिलटा-पांखरासारखें कां मरून जावें ? त्यापेक्षां मारतां मारतां मरावें हें बरें नव्हे काय ? इंग्रजांची फळी फोडून आपण येथून रातोरात काल्पीस जाऊं या आणि तेथें पेशव्यांचा सल्ला घेऊं या. युद्धांत यश आलें तर राज्य मिळेल आणि मरण आलें तर स्वर्ग मिळेल. पण युद्ध टाळून आपणच आपली आहुति कां द्या ? "

वडिलांचा विचार राणीसाहेबांना मानवला आणि—

मोत्यासारखा पांढराशुभ्र तेजस्वी घोडा–अडीच हजार रुपये किंमतीचा ! त्यावर राणीसाहेब स्वार झाल्या. त्यांच्या पायांत बूट व पायजमा. अंगावर पुरुषाचा लष्करी वेष. छातीवर तारेचें चिलखत, कंबरेस जंबिया व खाकेंत तलवार, आणि पाठीशीं ?—

बारा वर्षांचा दत्तक मुलगा दामोदर! रेशीमकाठीं धोतरानें राणीसाहेबांनीं त्याला आपल्या पाठीशीं बांधलें होतें. संध्याकाळींच आपल्या आश्रित मंडळींना त्यांनीं निरोप दिला होता. देवीचें दर्शन घेऊन, रात्रीच्या वेळेस, घनदाट अंधारांत, हृदयांत कालवाकालव होत असतांना, राणीसाहेबांनीं "मेरी झांशी"ला रामराम ठोकला! ती त्यांची आवडती राजधानी! तिच्यासाठीं त्यांनीं किती रक्त सांडलें! तिच्या वियोगानें आतां त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. तथापि कालपीची आशा धरून, मनाचा हिय्या करून, रात्रीं बारा घटकांचे सुमारास, त्यांनीं आपला श्वेतवर्ण अश्व किल्ल्याबाहेर काढला. त्यांच्या-बरोबर जीवास जीव देणारे थोडे निवडक स्वार होते.

मोरोपंत तांबेहि आपल्या कन्येमागोमाग निघाले. त्यांचें हृदय मनूच्या बालपणांत वात्सल्यानें भरून आलें होतें, तिच्या लग्न-प्रसंगीं आनंदानें ओथंबलें होतें आणि युद्ध-कालीं अभिमानानें उचंबळत होतें; तेंच हृदय आतां शोकानें, दुःखानें, चिंतेनें काळवंडत होतें. उत्कंठेनें व भयानें कांपत होतें. त्यांनीं किल्ल्यावरील सर्व संपत्ती हत्तीवर ठेवली आणि त्यासह ते 'जय शंकर' म्हणून निघाले. त्यांच्याबरोबर हजार-बाराशें सैनिक होते.

राणीसाहेबांनीं तटावरून घोडा फेकला आणि शत्रूच्या वेढ्यांतून निधडेपणानें आपला मार्ग काढला. इंग्रज सैनिकांच्या ध्यानींमनीं नसतांना, आकाशांतील विजेप्रमाणें, ती तेजस्विनी हां हां म्हणतां निघून गेली. तिचें धाडस पाहून त्यांचे डोळे दिपले. तरी त्यांनीं बंदुका चालू केल्या—तोफाहि डागल्या. पण राणीसाहेबांची चपळाई विलक्षण! २१ मैल अंधारांत त्यांचा पाठलाग इंग्रज सेनेनें केला. पण कंसाच्या हातून सुटलेल्या देवकीच्या कन्येप्रमाणें, राणीसाहेब अदृश्य झाल्या!

दुसऱ्या दिवशीं, ता. ५ एप्रिल रोजीं, सकाळच्या वेळीं, झांशीच्या किल्ल्यावर इंग्रजांचें निशाण फडकूं लागलें. आपल्या स्वातंत्र्याचा अपहार करणारें, आपलें शौर्य नामोहरम करणारें, आपल्या शूर राणीस पळावयास लावणारें तें निशाण पाहतांच झांशींतील नागरिकांच्या तोंडचें पाणीच पळालें. तें त्यांना कृतान्त--काळाचेंच निशाण वाटूं लागलें आणि पुढें

तीन दिवस घडलेंहि अगदीं तसेंच ! साऱ्या शहरांत इंग्रज सैनिकांनीं नुसता नरक निर्माण केला. ५ वर्षांवरील व ८० वर्षांखालील सर्व पुरुषांची कत्तल करण्यांत आली. मेंढरांच्या कळपांत लांडग्यांनीं उडी घातली ! घराघरांना आगी लावल्या. मृत्यूचें साम्राज्य पसरलें. कुलीन स्त्रिया आपली अब्रू वांचविण्यासाठीं विहिरींत जीव देऊं लागल्या.

'भिड्यांच्या बागेंत' वीस हजार बायका-पोरें जमलीं. त्यांनीं इंग्रजांची करुणा भाकली. तेवढेच जीव काय ते वांचले. निदान वीस हजार निष्पाप नागरिक बळी पडले. तीन दिवस बीजन झालें !—कापाकापी, लुटालूट, जाळपोळ यांमुळें शहराचें स्मशान झालें. चौकाचौकांत प्रेतांच्या खाई दिसूं लागल्या. बैल, उंट, हत्ती, घोडे इत्यादि पशूंच्या प्रेतांचीं सर्वत्र दुर्गंधी पसरूं लागली. पण त्याहिपेक्षां अधिक दुर्गंधी स्वार्थी मानवाच्या हावऱ्या स्वभावाची तेथें सुटली होती. इंग्रजांनीं लुटलेल्या वस्तूंचा लिलांव शहराबाहेर सुरू केला. त्यांतील हत्ती, उंट, घोडे विकत घेण्यास शिंदे-सरकार सिद्ध होते. झांशीच्या राजघराण्यांतील एक नक्षीदार पितळी पाळणाहि लिलावांत लुबाडण्यास शिंदे सरकारचे दूत कचरले नाहींत. प्रेतपिशाच्चापेक्षांहि मानव हीन बनला !

मोरोपंतांचे हाल वर्णन करण्यापलीकडे झाले. त्यांच्याबरोबरच्या सैनिकांनीं इंग्रज शिपायांशीं सामना दिला. त्या चकमकींत त्यांच्या मांडीवर जखम झाली. त्यांचें शरीर रक्तानें न्हाऊन निघालें. ते अगतिक बनले. त्यांनीं दतिया संस्थानचा आश्रय घेतला. पण तो आश्रय कसला ? सापाच्या वारुळासारखाच ! फितुरीचे साप तेथेंहि वळवळतच होते. तेथील कारभारी मंडळींनीं त्यांच्या बरोबरची हत्तीवरील सारी संपत्ति लुटून घेतली आणि मोरोपंतांना इंग्रजांच्या स्वाधीन केले. इंग्रजांनीं त्यांना डोलींत घालून झांशी येथें पाठविलें. झांशीस काय होणार ? फांशी ! त्यांच्याच वाड्यासमोर त्या वृद्ध-वत्सल वीरास दुपारीं फांशी देण्यांत आलें.

जेवण नाहीं, खाण नाहीं; विश्रांति नाहीं, निवारा नाहीं--अशा अवस्थेंत, दिवसभर एकसारखी भरधाव दौड ठोकीत, राणीसाहेब जीवाच्या करारावर, काल्पीस जाऊन पोहोचल्या. तेथें त्यांनीं आपली समशेर रावसाहेब पेशव्यांपुढें ठेवली आणि म्हटलें, "आतां हिची लाज

आपणच राखा. " रावसाहेबांनीं त्यांच्या शौर्याचा गौरव केला व त्यांना धीर दिला. रावसाहेब व तात्या टोपे यांनीं इंग्रजांची हड्डी नरम करण्याचा चंग बांधला—अखेरचा सामना देण्याचा निर्धार केला. प्रांतांत जिकडे-तिकडे पुन: भगवे झेंडे फडकूं लागले.

पण इंग्रज थोडेच स्वस्थ बसले होते ? त्यांचें सैन्य सर ह्यू रोझ याचे नेतृत्वानें काल्पीवर चालून येत होतें. कुंच येथें तात्या टोपे यांनीं त्याला प्रतिकार केला, पण तो व्यर्थ गेला. तात्यांना माघार घ्यावी लागली.

काल्पीपासून सहा मैलांवर ते तक्षक आले. गलौली येथें निकराचा सामना झाला. त्यांत राणीसाहेबांनीं आपल्या पराक्रमाची शर्थ केली. निराशेचें, निर्वाणीचें, मरणकाळचें धैर्य त्यांच्या अंगीं संचरलें. इंग्रजांच्या तोफांवरील गोलंदाज त्या सपासप् कापूं लागल्या. आतां त्यांना आपल्या प्राणाची पर्वाच नव्हती. पण दुर्दैव ! इंग्रज यशस्वी झाले आणि काल्पी शहर त्यांच्या हातीं पडलें.

आतां पुढें ?

" ग्वाल्हेर गांठावें. " राणीनें सुचविलें. तें सर्वांना मानवलें. कारण तेथील किल्ला फार मजबूत व सैन्यबळ दांडगें आणि त्याचे अधिकारी शिंदे—पेशव्यांचे खास खिदमतगार. या प्राण—संकटाचे वेळीं हात देण्याइतकी कृतज्ञता ते दाखविणार नाहींत काय ?

नाहीं ! नाहीं ! नाहीं ! एका स्वार्थापुढें कृतज्ञता नाहीं, न्याय नाहीं, दया नाहीं ! शिंद्यांची माणुसकी मेली ! ग्वाल्हेरजवळ त्यांनीं आपल्या धन्याशीं--महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांशीं–क्रांति-युद्धांतील नेत्याशीं–खुद्द पेशव्यांची लढाई दिली.

पेशवे विरुद्ध शिंदे ! स्वामी विरुद्ध सेवक ! राष्ट्रप्रेम विरुद्ध स्वार्थ-प्रेम ! किती विलक्षण सामना होता तो ! महाराज माणुसकी विसरले, पण त्यांचे सैनिक शुद्धीवर राहिले. ग्वाल्हेरच्या शेकडों सैनिकांनीं पेशव्याविरुद्ध लढण्याचें नाकारलें. परंतु हुजरातीच्या पथकानें मात्र त्या कृतघ्न राजाशीं इमान राखलें. त्यांचे गोलंदाज मारून राणीसाहेबांनीं त्यांच्या तोफा आपल्या ताब्यांत घेतल्या. शिंद्यांच्या फौजेची धूळधाण उडाली. शिंदेसरकार आपल्या दिवाणासह इंग्रजांकडे आग्रा येथें पळाले.

मराठ्याविरुद्ध मराठे लढले आणि पराभूत मराठे परक्यांच्या पायावर लोळण घेऊं लागले ! किती लांछनास्पद दृश्य आहे हें !

पेशवे विजयी झाले. ता. ३१ मे १८५७ रोजीं, ग्वाल्हेर शहर त्यांच्या ताब्यांत आलें. पण तेथेंच ते स्थिरावले, सुखावले. त्यांनीं तेथें आपल्याला राज्याभिषेक करून घेतला. नानासाहेबांनीं ब्रह्मावर्तास असाच राज्याभिषेक करून घेतला नव्हता काय ? त्याचेपाठोपाठ सहस्र भोजनें आलीं, जप-अनुष्ठानें आलीं, जलसे-नृत्यें रंगू लागलीं. त्यांच्या या गाफील-पणाचा व ऐदीपणाचा फायदा इंग्रजांनीं बरोबर घेतला. इंग्रजी सैन्याला सांगतीं घेऊन जयाजीराव शिंदे ग्वाल्हेरास परत आले. आतां पुनः लढा, मालक विरुद्ध सेवक, असा झाला. शिंदे हे ग्वाल्हेरचे मालक. त्यांच्याशीं तेथील सैनिक कसे लढणार ? तरी राणीसाहेबांनीं शर्थ केली. ता. १८ जूनची ही लढाई त्यांची अखेरची ठरली !

राणीसाहेब घोडयावर स्वार होऊन, पुरुष-वेष धारण करून, एक-सारख्या लढत होत्या. त्यांच्या तोंडावर शत्रूच्या तलवारीनें जखम केली. त्यांच्या छातींतून फिरंग्यांच्या संगिनीनें रक्त काढलें. घोडयावरून खालीं पडेपर्यंत त्या सारख्या झुंज झुंज झुंजल्या.

—आणि अखेर तो श्रांत देह धरणीवर पडला ! गंगादासबाबाच्या पर्णकुटींत तो घायाळ देह निष्प्राण झाला. त्याला एका गवताच्या गंजींत अग्नि-संस्कार केला गेला !

एका स्त्रीनें, तेवीस वर्षांच्या उमरींत, जें अचाट धाडस व अलौकिक शौर्य दाखविलें, त्याची प्रशंसा रोझसारख्या प्रतिस्पर्धी इंग्रजांनींहि पुढील शब्दांनीं केली, "She was the ablest military leader on the enemy side" ('शत्रुपक्षाकडील सर्वांत निष्णात सेनानायक ती होती.')

अशी हिरकणीसारखी राणी— पण तीहि आमच्या फितुरीमुळें मातीमोल झाली. तसेच तात्या टोपेसारखे हिरेहि पेशव्याजवळ होते, पण फितुरीमुळें त्यांचे कोळसे केले. तात्यांचें रण-शौर्य व व्यूह-रचना-चातुर्य अलौकिक होतें. म्हणून त्यांनीं ता. १८ जुलै १८५७ पासून ता. ७ एप्रिल १८५९ पर्यंत, सुमारें दोन वर्षें, इंग्रजांशीं अनेक सामने

दिले. पण त्यांचा एक मित्र राजा मानसिंग यानें फितुरी केली व तात्यांना इंग्रजांच्या हातीं दिलें. रात्रींच्या वेळीं शांतपणें झोपलेल्या त्या शूर सेनापतीला इंग्रजांच्या हवाली केल्याबद्दल मानसिंगाला गेलेली जहागिर परत मिळाली; एवढेंच नव्हे तर त्याच्या वंशजांनाहि दरमहा एक हजार रुपये पेन्शन मिळत राहिलें–१९४७ सालीं भारत स्वतंत्र झाल्यानंतरहि !

तात्या टोपे यांना शिप्री येथें नेण्यांत आलें. लष्करी कोर्टापुढें त्यांचा खटला चालला. त्यांच्यावर आरोप इंग्रजांशीं युद्ध खेळल्याचा—बंड केल्याचा. पण त्याला तात्यांनीं आपल्या जबानींत चोख उत्तर दिलें. त्यांनीं असे बाणेदार उद्गार काढले, "मी इंग्रजांचा नोकर कधींच नव्हतों, त्यामुळें मी बंडखोर ठरत नाहीं. मी इंग्रजी राज्यांत जन्मलों नाहीं, व इंग्रजांशीं राजनिष्ठ राहण्याची मीं कधीं शपथहि घेतली नाहीं. मी पेशव्यांचा नोकर व मी त्यांचेंच अन्न खाल्लें. त्यांच्याशीं राजनिष्ठ राहणें हेंच माझें कर्तव्य होतें व तें मीं पूर्णपणें बजावलें. मी कोणाचा घातपात केला नाहीं, किंवा कधीं इंग्रजांच्या बायका-मुलांची हत्या केली नाहीं. युद्धांत माझा पराभव झाला व मी तुमच्या हातीं लागलों, म्हणून मी दोषी ठरूं शकत नाहीं."

पण पालथ्या घड्यावर पाणी ! त्या स्वामिभक्त वीर-शिरोमणीला १८ एप्रिल रोजीं फांशी देण्यांत आलें.

रावसाहेबांनाहि एका फितूर मराठ्यानें इंग्रजांच्या हातीं सोंपविलें. त्यांना १८६२ सालीं कानपूर येथें फांशी देण्यांत आलें.

नानासाहेबांची गत काय झाली याचा नक्की पत्ता अद्याप नाहीं. ब्रह्मावर्त येथें नानासाहेबांजवळ चंदनाच्या पेटींत श्रीसमर्थ रामदासस्वामींची छाटी होती. ती घेऊन व शेल्यांत शेलकीं रत्नें बांधून, विप्रवृंदांना वंदन करून, नानासाहेबांनीं गंगेंतील नावेवर रात्रीं पाऊल ठेवलें. नावेंतील मेणबत्त्या थोड्या वेळानें विझविल्या—अंधारांत शेल्यांतील रत्नें गंगार्पण झालीं ! नर-रत्नेंहि काल-सागरांत बुडालीं. पराभव पावल्यावर ते नेपाळांत ३००० लोकांसह पळून गेले. १८५९ सालीं तेथेंच निधन पावले असा नेपाळ सरकारचा समज आहे. त्यांची उत्तरक्रिया आपण पाहिल्याचा ग्वाही त्यांची बहीण बयाबाई यांनीं १९१३ सालीं दिलेली आहे.

नेपाळहून ता. २० एप्रिल १८५९ रोजीं, नानासाहेबांनीं इंग्लंडच्या राणीला एक खलिता पाठविला. त्यांत त्यांनीं आपला असा निर्धार जाहीर केला कीं, " मी एकहि खून केलेला नाहीं. उलट, कानपूरच्या इंग्रजांना अलाहाबादेस पोहोंचविण्यासाठीं, मी नावांची व्यवस्था केली, पण त्यावर तुमच्या सैनिकांनीं हल्ला केला. तरी मी २०० इंग्रज बायका-मुलांचे प्राण वांचविले. पण माझे सैनिक निघून जातांच त्या बायका-मुलांची कत्तल तुमच्या बंडखोर सैनिकांनीं केली. मी कोणत्याहि दृष्टीनें गुन्हेगार नाहीं. तरीसुद्धां आपल्या जाहीरनाम्यानें माझे गुन्हे माफ केलेले नाहींत. उलट, मीच एकटा आपला शत्रु असें आपण मानतां: ठीक आहे. मी जिवंत आहें तोंवर लढतच राहीन."

ता. २६ एप्रिल १८५९ रोजीं नानासाहेबांनीं दुसरा खलिता पाठविला. त्यांत ते म्हणतात, " मेजर रिचर्डसनचें उत्तर मिळालें, पण तेवढ्यावरून मी प्रगट होऊ इच्छित नाहीं इंग्लंडच्या राणीनें स्वत: पत्र लिहून व त्यावर आपला शिक्का उठवून तें जर फ्रेंच सैन्याधिकाऱ्याबरोबर मजकडे पाठविलें तर मी तहाच्या अटी मान्य करीन. नाहीं तर हिंदुस्थानांत तुम्ही किती 'दगाबाजी' केलीत हें मला पूर्ण माहीत आहे कांहीं वर्षांपूर्वी इंग्लंडच्या राणीनें स्वत:च्या हातानें लिहिलेलें व स्वत:च्या सही–शिक्क्याचें पत्र माझ्या वकिलामार्फत पाठविलें होतें. तें अद्याप मजजवळ आहे. तसेंच पत्र आतांहि राणीनें पाठविलें तर मी त्याचा विचार करीन. नाहीं तर माझ्या जीवांत जीव असेपर्यंत मी तुमच्याशीं लढतच राहणार."

नानासाहेबांना पकडून देणाऱ्यासाठीं इंग्रजांनीं एक लाख रुपयांचें इनाम लावलें होतें. " बंडवाल्यांपैकीं कोणी एकानें त्यास धरलें तर त्या धरणाऱ्याच्या शिक्षेची माफी केली जाईल." असेंहि आमिष त्यांनीं लावलें होतें. त्यानंतर नानासाहेबांचे नाना तोतये धरले गेले—छळले जाते. तेथें एक सिंहासन असून दर वर्षी उत्सव केला जातो. नेपाळहून येऊन, योगी म्हणून राहून, नानासाहेबांनीं तेथें १९०३ सालीं देह ठेवला अशी आख्यायिका तेथें प्रचलित आहे. सौराष्ट्रांतील सिहोर येथें " नानासाहेबांची समाधि " दाखविली

★

१० महाराष्ट्रांतील उठावणी



उत्तरेकडे उसळलेल्या या क्रांतीच्या ठिणग्या महाराष्ट्रावरहि थोड्या-फार उडाल्या. पेशवाई गेली, छत्रपतींची राजवट बुडाली,

२१००० इनामें जप्त झालीं. यामुळें सारा महाराष्ट्र म्हणजे असंतोषाच्या दारूचें कोठार बनला होता. त्यावर या क्रांतीच्या ठिणग्या येऊन पडतांच कोल्हापूर, सातारा, नरगुंद, जमखिंडी, बेळगांव, सावंतवाडी, मुंबई इत्यादि ठिकाणीं स्फोट झाले. त्यामुळें सैनिक हल्ले व नागरिकहि हादरूं लागले. उत्तरेकडील क्रांतीचे प्रमुख सूत्रधार नानासाहेब, विद्युद्वेगी सेनापति तात्या टोपे व संग्राम-देवता झांशीची राणी— या तीनहि व्यक्तींचे धागेदोरे महाराष्ट्राच्या हृदयाशीं जोडलेले! त्यांच्या यशापयशाचे धक्के महाराष्ट्राला जाणवल्याशिवाय कसे राहतील?

महाराष्ट्र हा सृष्टि-सौंदर्यानें सजलेला नसला, तरी अंतःसौंदर्यानें नटलेला आहे. तो द्रव्यानें दरिद्री असला, तरी मनानें श्रीमंत आहे. तो शूर आहे, चतुर आहे, स्वाभिमानी आहे. त्याच्या सह्याद्रीच्या रांगा-रांगांवरून स्वातंत्र्याचें वारें संचरत असतें. त्याच्या कृष्णा-नदीच्या पाण्यांत मानीपणाचें तेज मिसळलेलें असतें. येथील माणसें बुटगी, तट्टें छोटीं व शेती कोती असली, तरी परक्यापुढें मान न तुकविण्याचा त्याचा निर्धार वज्रासारखा कठोर आहे. अन्यायाचा प्रतिकार प्रथमदर्शनींच करण्याची बुद्धि व शक्ति त्याच्या नसानसांत खेळत आहे. आणि तेजस्वी ध्येयवाद पत्करून त्यासाठीं सर्वस्वाची आहुति देण्याची त्याची तयारी आहे. त्याग व कष्ट हे त्याचे गुण गगनचुंबी आहेत, तर स्वतंत्र प्रज्ञा व स्वाभिमान हे त्याचे गुण समुद्राइतके खोल आहेत.

पण एखाद्या वृक्षाला आंतून कीड लागावी, त्याप्रमाणें महाराष्ट्राच्या या अलौकिक गुणवत्तेला दुहीं भोंवली. फितुरी हा आमच्या सर्व राष्ट्रा-लाच शाप आहे—त्यांतहि महाराष्ट्राला विशेष! एका सरदारानें दुसऱ्या सरदाराविरुद्ध आणि एका संस्थानिकानें दुसऱ्या संस्थानिकाविरुद्ध मत्सरानें जळावें, घरभेदे बनावें आणि परक्याला फितूर व्हावें—हें आत्म-घातकी धोरण महाराष्ट्राच्या पांचवीस पुजलेलें! फार काय, पेशव्याविरुद्ध छत्रपति असेहि कट झाले! राजाच फितूर, तेथें प्रजा कशी असणार? या फितुरीच्या असंख्य भोंकांमुळें, हरिश्चंद्राच्या घागरीप्रमाणें, महाराष्ट्राच्या अंगांतील शौर्य, चातुर्य, चिकाटी, स्वार्थत्याग इत्यादि गुणांचें पाणी पार

गळून गेलें. घरांत बारीक छिद्र दिसलें तरी त्यांत जसा साप शिरतो, तसे इंग्रज या फितुरीचा फायदा घेण्यास टपलेले होते !

राखेचे कितीहि थर बसले, तरी अग्नीच्या ठिणग्या मधूनमधून उडतातच. त्याप्रमाणें फितुरीचें जाळें पसरलें गेलें, तरी महाराष्ट्रानें आपली स्वातंत्र्य-लालसा प्रज्वलित स्वरूपांत प्रगट केलीच.

पेशवाई बुडाल्यावर तीनच वर्षांनीं १८२१ मध्यें, पुरंदर किल्ल्यावर रूपसिंगानें बंड केलें. त्यानंतर 'शिवाजी होण्याची महत्त्वाकांक्षा धारण करणाऱ्या' उमाजी नायकानें १८३२ मध्यें धामधूम उडवून दिली. आणि १८३६ मध्यें सांगलीच्या राजेसाहेबांनीं गोवें व हैद्राबाद यांच्याशीं संधान बांधून बंडाचा बार उडविण्याचा घाट घातला.

छत्रपति प्रतापसिंहाचा हिंमतबहादर वकील रंगो बापूजी हा हिंदुस्थानांत १८५४ सालीं परत आला. येतांच त्यानें उत्तर हिंदुस्थानांत दौरा काढला. ब्रह्मावर्त येथें जाऊन नानासाहेब पेशव्यांची गांठ त्यानें घेतली. खालसा झालेलीं सारीं संस्थानें क्रोधानें खदखदत आहेत आणि हिंदी सैनिकहि धर्मान्तराच्या भीतीमुळें, काळ्या-गोऱ्यांच्या विषम वागणुकी-मुळें व आर्थिक भेद-भावामुळें इंग्रजांवर नाराज झालेले आहेत, ही परिस्थिति दोघांनाहि पटलेली होती. प्रश्न होता कृतीचा.

ती केव्हां, कोठें, कशी करावी याचा खल झाला. अखेरीस, "तुम्ही महाराष्ट्रांत काय करणार?" असा सवाल नानासाहेबांनीं टाकला. तेव्हां रंगो बापूजीनें ताडकन् उत्तर दिलें,

"उत्तरेला पंचारतीचा गजर झालेला ऐकूं येतांच
दक्षिणेंत मी नौबदीवर टिपरी हाणतों."

नानासाहेबांनीं दक्षिणेंत बंडाचा वणवा पेटविण्याची पूर्वतयारी फार आधींपासून, पुष्कळ ठिकाणीं, अनेक व्यक्तींकरवीं चालविलेली होती. या कामीं त्यांचा एक हात उत्तरेंत होता, तो म्हणजे अजमुल्लाखान, तसा दुसरा हात दक्षिणेंत फिरत होता, तो म्हणजे रंगो बापूजी. हे दोघेहि वकील इंग्लंडांत राहून आलेले, तुर्कस्तान–रशियाशीं संगनमत केलेले आणि अत्यंत धोरणी, स्वामिनिष्ठ व चिकाटीचे.

रंगो बापूजी भोरपासून बेळगांवपर्यंत १८५६ च्या डिसेंबरपासूनच मांग–रामोशी–कोळी इत्यादि लोक बंडासाठीं जमवीत होता. कराड, वाठार, फलटण, पंढरपूर, बेळगांव, कोल्हापूर इत्यादि गांवें म्हणजे सैनिक-भरतीचीं केंद्रेंच. रंगो बापूजीचा मुलगा सीताराम व मेहुणा केशव नीळकंठ उर्फ अण्णासाहेब चित्रे आणि कराडचा दौलतराव पवार, भोरचे शेटे-बंधु–इत्यादि त्याचे हस्तक गांवोगांव मनुष्यबळ व द्रव्यबळ गोळा करीत होते. अप्पा ऐतवडेकर यानें तर आपल्या कल्पक मेंदूतून बंदुकीच्या गोळ्याहि तयार केल्या.

दक्षिणेंतील संस्थानिकांना चेतविण्याचें कामहि रंगो बापूजीमार्फत नानासाहेब पेशवे करीत होते. भोरच्या पंतसचिवांनीं रंगो बापूजीस पाठविलेलीं तीन मोडींतील सांकेतिक पत्रें मुंबई सरकाराच्या " स्वातंत्र्य-इतिहासा "च्या पुरवणींत दिलीं आहेत. त्यांपैकीं एक पुढें दिल्याप्रमाणें आहे—

श्री रामचंद्र

राजश्री रंगो बापुजी विशेष. आपण तारीख पंधरा जूनच्या सर्व कामांबद्दल तजवीज ठेविली म्हणोन लिहिलें हें समजलें. त्याप्रमाणें आपण करून इकडून सर्व संकेताप्रमाणें आम्ही करूं. आणि आम्ही तुमचे बाहेर नाहीं. याप्रमाणें महाराज यांसी सांगावें. अनमान करूं नये. ता. १० जून १८५७ ई०

चिमणाजी रघुनाथ सचीव

नागरिक व संस्थानिक यांच्याप्रमाणेंच सैनिकांनाहि इंग्रजांवर उठविण्यांत रंगो बापूजी गर्क होता. कोल्हापूर, बेळगांव, धारवाड व सातारा येथील ब्रिटिशांच्या हिंदी लष्करांत राष्ट्रीय स्वातंत्र्याचें वारें संचरविण्यासाठीं रंगो बापूजी सहा महिने भिंगरीसारखा फिरत होता. त्या स्वामिनिष्ठ मुत्सद्दी वीरानें आपल्या डोळ्यापुढें चार उद्देश ठेवले होते, ते म्हणजे— (१) सातारा व महाबळेश्वर येथील सर्व युरोपियनांना पकडणें. (२) तुरुंगांतील कैद्यांना मुक्त करणें. (३) सरकारी खजिना लुटणें व (४) प्रतापसिंहाच्या पुत्राला साताऱ्याचे गादीवर बसविणें.

पदच्युत प्रतापसिंहाला काशीस नेतांना जंगलांत हा पुत्र जन्माला आला, म्हणून त्याला ‘ जंगली महाराज ’ म्हणत. तो काशीस वाढला, म्हणून ‘ काशीराजा ’ असेंहि संबोधन त्याला प्राप्त झालें. त्याचें नांव शाहू. त्याची समाधि पुणें येथें भवानी पेठेंत आहे.

छत्रपतींच्या गादीविषयीं सर्व महाराष्ट्रांत गाढ आदर असल्यामुळें, संस्थानिक, नागरिक व सैनिक हे उठावणी करण्याच्या तयारींत होते. नरगुंद-जमखिंडी-भोर यांनीं वचनें दिलीं होतीं. तात्या टोपे ता. २७ डिसेंबर १८५८ रोजीं नर्मदा नदी उतरून छोटा उदेपूर येथें आला होता व बडोदे सर करणार होता. तो दक्षिणेंत येता, तर त्यानें दक्षिणेंत “ दुसरें स्वातंत्र्य-युद्ध ” गाजविलें असतें व ब्रिटिशांना सळो कां पळो केलें असतें; पण —फितुरी ! मानसिंगानें केलेला विश्वासघात हा राष्ट्र-घातच ठरला ! !

छत्रपति प्रतापसिंह १८३९ सालीं पदच्युत झाल्यापासून सुमारें चार वर्षें धाररावांच्या बंडांनीं महाराष्ट्रांत धुमाकूळ घातला. कराडचे धारराव पवार हे त्यांचे प्रवर्तक. रामचंद्र खंडेराव सातवे यानें १८४० सालीं पुण्यांतील सैन्यांत फितुरी करण्याचा प्रयत्न केला. कोल्हापुरांतील गडकऱ्याचें बंड तर इतकें बळकट होतें कीं, तें मोडण्यासाठीं १०००० ब्रिटिश सैनिकांना ९ महिने लढा द्यावा लागला.

●

या साऱ्या बंडखोरांत अजब शहामत एका आंधळ्याची. नरसिंग दत्तात्रेय पेटकर हें त्याचें नांव. इस्लामपूरच्या दिवाणाचा हा मुलगा. देवीच्या सांथींत हा एका डोळ्यानें आंधळा झाला; पण त्याच्या उरलेल्या एका डोळ्यांत स्वातंत्र्याची दिव्य दृष्टि चमकत होती.

प्रतापसिंहाला काशीच्या वाटेवर लिंब येथील गोठ्यांत निर्दय इंग्रजांनीं निर्लज्जपणें कोंडलें होतें, तेव्हां तेथें जाऊन हा आंधळा नरसिंगराव छत्रपतींना भेटला होता. तेथें क्रांतीची प्रेरणा घेऊन व योजना आंखून, तो दौऱ्यावर निघाला. या अंध देशभक्तानें नगर, नाशिक वगैरे भागांत दौरे काढले. त्याच्याजवळ प्रतापसिंहानें दिलेले हिरे होते. ते

विकून त्यांच्या पैशांतून त्यानें रायचूरजवळ सुमारें १००० अरब आपल्या नोकरीस ठेवलें आणि—

१८४१ च्या ऑगस्ट महिन्यांत त्यानें ' हर हर महादेव ' केला— त्या एकाक्ष स्वातंत्र्यभक्तानें बदामी किल्ल्यावर हल्ला केला, तो किल्ला जिंकून त्यानें त्यावर छत्रपतींचें भगवें निशाण फडकविलें ! खुद्द छत्रपति काशीस बंदिवासांत होते— पण त्यांचें निशाण स्वातंत्र्यानें डुलत होतें— एका अंध सेवकाच्या करामतीमुळें ! आणि द्वाहीहि फिरली छत्रपतींचें राज्य सुरू झाल्याची !

आणि चारच दिवसांनीं दुसरी द्वाही फिरली, तें राज्य समाप्त झाल्याची ! धारवाड–बेळगांवच्या इंग्रज फौजांनीं बदामी किल्ल्यावर निकराचा मारा सुरू केला. बंडखोराजवळील दारुगोळा संपला. किल्ला पडला. आंधळा देशभक्त पकडला गेला. त्याला शिक्षा झाली फांशीची ! पण अंधत्वामुळें जन्मठेप मिळाली. अहमदाबादच्या तुरुंगांत डोळस देशभक्तीचा हा आंधळा सेवक १८६२ सालीं निधन पावला.

●

पन्हाळ्याच्या किल्लेदारानेंहि बंड केलें. छत्रपतींना विश्वामित्राप्रमाणें छळणारा साताऱ्याचा रेसिडेंट कर्नल ओव्हॅन्स ता. १२ नोव्हेंबर १८४४ रोजीं कोल्हापूरास निघाला होता. तो दाणेखिंडींत येतांच, झाडाझुडपांत लपून बसलेल्या सुमारें एक हजार मांग-रामोशांनीं त्याच्यावर हल्ला केला व त्याला पकडलें.त्याला पन्हाळगडावर ठेवण्यांत आले.कांहीं आठवडे राजेश्रीला हा पाहुणचार खावा लागला. त्याची सुटका करण्यासाठीं नंतर ब्रिटिशांच्या तोफा आल्या. सुटका झाली तरी ओव्हॅन्स इतका भेदरला कीं, लगेच राजीनामा देऊन स्वारी निज-धामास गेली !

●

सामनगडानेंहि सतरा दिवस शिकस्तीचा सामना दिला. हा गड कोल्हापूरहून १८ कोसांवर, बेळगांवच्या वाटेवर आहे. कोल्हापूरच्या बंडवाल्यांनीं तेथील कारभारी दाजीबा पंडित याला कैद केलें व पोष्टाच्या तारा तोडीत ते सामनगडावर चालून गेले. त्यांनीं तो गड ता. १३

ऑक्टोबर १८४४ रोजीं काबीज केला. कोल्हापूरच्या दोघां राजपुत्रांना कैद करण्याचा डाव इंग्रजांनीं केला. त्यामुळें ते राजपुत्र खवळले व त्यांनीं १०।१२ हजार सैनिक गोळा केले. सांगली, इचलकरंजी, बावडा, विशाळगड, कुरुंदवाड इत्यादि संस्थानांच्या अधिपतींना त्या राजपुत्रांनीं स्वातंत्र्याच्या निशाणाखालीं येण्यास पाचारलें, पण हा व्यूह रंगारूपास येण्याच्या आधींच ब्रिटिशांनीं धुळीस मिळविला!

कोल्हापूरच्या राजाचा धाकटा भाऊ चिमासाहेब याचें लक्ष या उठावणींत विशेष. त्याचा नानासाहेबांशीं पत्रव्यवहारहि चाले. या सर्व उद्रेकाच्या बुडाशीं नानासाहेबांची प्रेरणा होती.

●

खानदेशांतील भिल्ल हे अडाणी-रानटी; पण रगेल व स्वतंत्र. सातपुड्यांत राहणारे हे लोक तेथील खडकाप्रमाणें टणक व तेथील वाऱ्या-प्रमाणें स्वतंत्रपणें संचार करणारे. त्यांनाहि स्वातंत्र्य-समराकडे खेचण्याचे प्रयत्न नानासाहेबांनीं केले. भागोजी नाईक, भीमा नाईक, खाजासिंग वगैरे म्होरक्यांनीं १५०० भिल्ल जमविले. ता. १७ नोव्हेंबर १८५७ रोजीं सात लाख रुपयांचा इंग्रजांचा खजिना तीनशें भिल्लांनीं लुटला. पण जेथें मातबर शहाणेसुर्ते हरले, तेथें गरीब बिचाऱ्या भिल्लांचा काय पाड!

पण एक गोष्ट स्पष्ट दिसते. ती ही कीं, मीरत येथें ता. १० १८५७ रोजीं, काडतुसाच्या धार्मिक कारणानें, सैनिकांनीं भडका उडविण्यापूर्वी, नानासाहेबांनीं आपल्या हस्तकामार्फत, उत्तरेकडे व दक्षिणेकडे, संस्थानिकांना व सैनिकांना, नागरिकांना व भिल्लांना, स्वातंत्र्यासाठीं इंग्रजांशीं लढा देण्याची प्रेरणा व प्रयत्न वर्ष-सहा महिने तरी जारीनें व तांतडीनें चालविले होते.

नरगुंद संस्थानच्या दप्तरांत नानासाहेब पेशव्यांचा एक अप्रकाशित जाहीरनामा सांपडलेला आहे. 'दिल्लीच्या बादशहाचे हुकुमावरून त्यांचे पंतप्रधान पेशवे' यांनीं हा जाहीरनामा प्रसिद्ध केला, असें त्याच्या शेवटीं म्हटलें आहे. या जाहीरनाम्यांत 'सरंजामदार, जहागीरदार, देशमुख, देशपांडे आणि जमीनदार पाटील-कुलकर्णी व दक्षिणेंतील आणि कर्ना-

टकांतील समस्त प्रजाजन ' यांना उद्देशून इंग्रजांच्या कुटिल धोरणाचें वर्णन केलें आहे व त्या सर्वांना अशी हाक दिली आहे :—

" वीर हो ! परमेश्वरानें मला या काफिर इंग्रजांचा नाश करण्याची आज्ञा दिली आहे. दुष्ट, जुलमी व अन्यायी काफिर इंग्रजांना शासन करून, पूर्वींप्रमाणें येथें हिंदु-मुसलमानांचें राज्य स्थापन करण्याची व मायभूमीचें रक्षण करण्याची जबाबदारी ईश्वरानें मजवर टाकली आहे. त्याप्रमाणें नर्मदा नदीच्या उत्तरेकडील प्रदेश मीं जिंकून घेतला आहे. हा जाहीरनामा वाचतांच, वीर हो ! तुम्हीहि आपापल्या समशेरी उपसा व दयामाया न दाखवितां काफिरांची कत्तल उडवा. त्यायोगें तुम्हांला पुण्य लागेल आणि तुमचें धैर्य व पराक्रम दिसून येतील. तुमच्या वाडवडिलांवर व राजेमहाराजांवर इंग्रजांनीं जो अन्याय व दुष्टावा केला, त्याचा सूड घेण्याचा योग्य क्षण हाच आहे.

" सध्यां इंग्रज लोकांतच त्यांच्या धर्मासंबंधीं मतभेद झाले आहेत आणि त्यामुळें ते आपापसांत भांडून—लढून एकमेकांचे गळे कापण्यांत गुंतले आहेत. फ्रेंच व रशियन हे इंग्रजांचा द्वेष दीर्घकाल करीत आहेत. हिंदुस्थानांतून इंग्रजांना हाकलून लावण्यास हाच समय योग्य आहे, असें त्यांना वाटतें. म्हणून गेले तीन महिने ते जलमार्गानें आपलीं सैन्यें इकडे पाठवीत आहेत.

" चिनी लोकांनींहि काफिर इंग्रजांशीं युद्ध पुकारलें आहे. तिकडे पाठविण्यास इंग्रजांजवळ सैन्य नसल्यानें ते हवालदिल झाले आहेत. इराणी, अफगाण व बलुची हेहि आपापल्या लष्करानिशीं आपल्याला मदत करण्यास सिद्ध आहेत. याचा इत्यर्थ हा कीं, इंग्रजांचें या भूमींतून समूळ उच्चाटन करण्यास ही सुवर्ण-संधि आहे. "*

ता. १५ सप्टेंबर १८५७ च्या दुसऱ्या एका जाहीरनाम्यांत नानासाहेबांनीं असे आशेचे उद्गार काढले आहेत कीं:—

*(Source Material for a History of Freedom Movement in India, published by the Government of Bombay. Page 254.)

" सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, इंग्रजांशीं बडें जंग करून आम्ही पुष्कळ मुलुख त्यांचे ताब्यांतून परत मिळविला आहे व तेथें आमचा अंमल चालू झाला आहे.

सहा आठवड्यांचे आंतच पुणें येथें येऊन

सह्याद्रीखालचा प्रदेश आम्ही जिंकून घेऊं आणि गो-ब्राह्मणांचा प्रतिपाळ करूं. प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणें वागण्याचें स्वातंत्र्य राहील."

भीमाशंकरहून भाद्रपद शु॥ १३ शके १७७९ रोजीं होमदेव-शर्मानें काढलेल्या जाहीरनाम्यांत युरोपियन लोकांना ठार करण्याबद्दल पुढील बक्षिसें जाहीर केलीं आहेत—

एका युरोपियनाचे प्रेताबद्दल — ५०० रु.

कलेक्टर, जज्ज किंवा तत्सम — १०,००० रु.

कर्नल, मेजर, कॅप्टन किंवा तत्सम — १२,००० रु.

गव्हर्नर, सरन्यायाधीश किंवा तत्सम — ५०,००० रु.

●

सातारा येथें क्रांतीची बातमी एका पत्रांतून प्रथम आली. हें पत्र तेथील एका ब्राह्मणास आलें होतें. तें त्या ब्राह्मणानें प्रतापसिंहाच्या राणीस वाचून दाखविलें. बिचाऱ्या ब्राह्मणाला वाटलें, " आतां इंग्रजांची सद्दी संपली! स्वराज्याची पहांट फुटली." म्हणून त्यानें राणीस विनंती केली, " आपण सत्ताधारी झाल्यावर मज गरीबावर लक्ष असूं द्या."

उत्तरेकडून आलेलें हें क्रांतीचें पत्र तेथील वाचनालयांतहि गुप्तपणें वाचून दाखविण्यांत आलें. नंतर तें पत्र जाळण्यांत आलें. पत्र जळालें, पण वृत्त पसरलें--वणव्याप्रमाणें सर्व शहरभर पसरलें, सातारा शहरांत मोठी खळबळ उडाली. इंग्रजांचा कांटा काढण्यासाठीं, जो तो मनसुबे रचूं लागला. सातारा येथील तुरुंगावर हल्ला चढवावा, आंतील कैदी मोकळे करून क्रांति-कार्यास मिळवावे, त्यांच्या साहाय्यानें सरकारी खजिना लुटावा आणि मग इंग्रजांच्या लष्करावर हल्ला चढवावा, असा व्यूह रंगो बापूजीनें रचला. पण तो सिद्धीस जाण्यापूर्वींच सातारा येथील डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटास कळला. त्यानें लगेच युरोपियन सैन्य मागाविलें.

१८५७ च्या जून महिन्याच्या अखेरीस इंग्रजांनीं गोऱ्या सैनिकांची एक तुकडी साताऱ्यास पाठविली. लगेच लष्करी अंमलाचा जाच सुरू झाला. चार संशयित लोकांना तोफेच्या तोंडीं देण्यांत आलें. ता. २७ ऑगस्टला १७ बंडखोरांची चौकशी इंग्रज लोकांपुढें सुरू झाली. त्यांत रंगो बापूजीचा मुलगा व इतर नातेवाईक होते. खुद्द रंगो बापूजीला पकडून देणाऱ्यास 'कंपनी सरकार'नें पांचशें रुपयांचें बक्षिस लावलें. पण त्यानें जो गुंगारा दिला तो कायमचाच !

चौकशीचा निकाल काय होणार हें ठरलेलेंच ! त्या १७ स्वातंत्र्य-भक्तांना फांशीची शिक्षा देण्यांत आली. त्याप्रमाणें गेंड्याच्या माळावर, ता. ८ सप्टेंबर रोजीं, सतराजणांस फांशीं देण्यांत आलें !

त्या वेळीं पंढरपूर हें सातारा जिल्ह्यांत होतें. तेथील मामलेदार-कचेरीवर व खजिन्यावर ता. १३ जुलै रोजीं हल्ला करण्यांत आला. मामलेदाराला ठार करण्यांत आलें. पण ही उठावणी पोलिसांनीं लवकरच दाबून टाकली.

जसें सातारा तसेंच कोल्हापूर, मराठ्यांच्या राज्याचें केंद्र ! दोन्ही ठिकाणीं छत्रपतींची गादी ! ती गादी बुडाल्यामुळें दोन्ही शहरांतील लोक खवळलेले ! या प्रक्षोभाचें एक प्रत्यंतर कोल्हापूरनें १८४४ सालीं दाखविलें होतें. तो उठाव मोडण्यासाठीं इंग्रजाला जो खर्च आला, तो कोल्हापूर दरबाराकडून सव्याज वसूल केला जात होता. ती वसुली होईपर्यंत कोल्हापूरचा कारभार इंग्रज पोलिटिकट एजंटाच्या हातीं होता. त्यामुळें कोल्हापुरची जनता असंतोषानें एकसारखी धुमसत होती.

अशा स्थितींत, उत्तरेकडील क्रांतिकारकांच्या विजयाच्या वार्ता कोल्हापुरास येऊन पोचल्या. नानासाहेब व तात्या टोपे यांच्या पराक्रमाचें वृत्त कानीं पडतांच मराठी अंतःकरणें थरारलीं आणि मराठी भाले परक्या रक्तासाठीं तहानेले झाले. कोल्हापुरांतील सैनिकांनीं क्रांतीसाठीं कंबर कसली. गुप्त मसलती शिजूं लागल्या—गुप्त जासुदांची जा—ये सुरू झाली--गुप्त कटांना पंख फुटूं लागले.

कोल्हापूर, बेळगांव व धारवाड या तिन्ही ठिकाणच्या हिंदी पलटणींनीं एकदम उठाव करण्याचा निश्चय केला. दिवस मुक्रर झाला. तयारी पूर्ण झाली. पण—या क्रांतीची कुणकुण इंग्रज सैन्यापर्यंत जाऊन पोचली. त्यामुळें ते आपलीं कुटुंबें सुरक्षिततेसाठीं परगांवीं पाठवूं लागले. आपला क्रांतीचा बेत फुटतो कीं काय, अशी धास्ती हिंदी सैनिकांना वाटूं लागली. म्हणून आगाऊ ठरलेल्या दिवसाआधींच, ता. २३ जुलै रोजीं रात्रीं, कोल्हापूर येथील हिंदी शिपायांनीं क्रांतीचा 'हरहर महादेव' केला.

युरोपियनांच्या बंगल्यावर हिंदी शिपायांनीं बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव केला. रात्रीच्या वेळीं, अकस्मात आलेला हा हल्ला पाहतांच, गोरे अधिकारी घाबरून गेले. तुलनेनें पाहतां इंग्रज सैनिक हा कांहीं हिंदी सैनिकापेक्षां अधिक धीट, शूर व पराक्रमी आहे असें नाहीं. पण इंग्रजांची शिस्त मोठी—आणि त्याहूनहि त्यांचीं शस्त्रें मोठीं ! पण या आकस्मिक हल्ल्यापुढें ती शिस्त राहणार कशी आणि तीं शस्त्रें चालणार कशी ? कांहीं इंग्रज अधिकारी भयभीत होऊन शेजारच्या जंगलांत दडून बसले. पण क्रांतिकारकांनीं त्यांचा पिच्छा पुरविला. त्यांना पकडून क्रांतिकारकांनीं गोळ्या घालून ठार केलें आणि त्यांचीं प्रेतें पंचगंगा नदींत फेंकून दिलीं.

क्रांतीच्या भावनेनें बेभान झालेले ते हिंदी शिपाई इंग्रजांच्या खजिन्यावर चालून गेले. त्यांतील आपलाच पैसा आपल्या हातीं घेऊन ते शहराकडे निघाले. क्रांतिकारकांचा मोर्चा शहरावर चालून येत आहे, हें कळतांच तेथील पोलिटिकल एजंट कर्नर मॉघान यानें साऱ्या वेशीचीं दारें बंद केलीं. त्यानें क्रांतिकारकांचा डाव हाणून पाडला. दोनशें क्रांतिकारक सैनिक कोल्हापूराबाहेर तळ देऊन राहिले. त्यांच्यावर कर्नल मॉघान याच्या सैनिकांनीं हल्ले चढविले. पण त्यांना क्रांतिकारकांनीं दाद दिली नाहीं. सारी रात्र अशा चकमकी झाल्या.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं क्रांतिकारकांनीं रत्नागिरीकडे कूच केलें. पण त्यांना वाटेंतच युरोपियन पलटणी अचानक भेटल्या. त्यामुळें क्रांतिकारकांना सावंतवाडीच्या जंगलाचा आश्रय घ्यावा लागला. त्यांतील

चाळीस शिपाई मात्र कोल्हापुरास परत आले. पण ता. १० ऑगस्ट रोजीं त्यांच्यावर साताऱ्याहून आलेल्या इंग्रज सैनिकांनीं हल्ला केला आणि त्यांचा फडशा पाडला. क्रांतीचा झेंडा घेऊन उठलेल्या या कोल्हापुरांतील पलटणींचें संधान बंगालमधील सैनिकाशीं असल्याचें उघडकीस आलें.

कोल्हापूरच्या सैनिकांनीं अशी उठावणी केली; पण तेथील राजा मात्र इंग्रजांचा दास बनून राहिला. त्याचा धाकटा भाऊ चिमासाहेब हा स्वातंत्र्याच्या भावनेनें थरारलेला होता. तो खराखुरा शिवाजी महाराजांचा वंशज शोभत होता. त्यांच्याकडे नानासाहेबांचे दूत येत असत. त्यानें महार, मांग, रामोशी यांचें मोठें सैन्य उभें केलें. आणि—

ता. ५ डिसेंबर पहांटे ५ वाजण्याची वेळ! अद्याप पुरतें उजाडलें नव्हतें. सर्वत्र अंधारच होता. सर्व शहर झोपलें होतें. कोल्हापुरचा पोलिटिकल एजंट कर्नल जेकब हाहि सुखानें निद्रिस्त होता. पण एकाएकीं त्याच्या कानावर घोड्यांच्या टापांचा खाड्खाड् आवाज ऐकूं येऊं लागला. तो दचकला–जागा झाला. मीरत, कानपूर, दिल्ली येथील दृश्यें त्याच्या डोळ्यापुढें नाचूं लागलीं. त्यानें आपल्या रिसालदाराला हुकूम सोडला, " शहराची पहाणी ताबडतोब करून ये. " स्वत: जेकब आपल्या लष्करांत गेला व त्यानें धोक्याचा बिगुल वाजविला.

चिमासाहेबानें कोल्हापूर शहरांत प्रवेश केला व आपले सैनिक मोक्याच्या जागीं ठेवले. त्याबरोबरच त्यानें एक विशेष काळजी घेतली, ती म्हणजे शहराच्या साऱ्या वेशी बंद करण्याची! हेतु असा कीं, शहराबाहेरील इंग्रजांचें सैन्य आंत येऊं नये. पण सूर्योदय होण्याच्या सुमारास इंग्रजांच्या तोफा कोल्हापूरच्या वेशीवर डागल्या गेल्या. सोमवार-वेशीचीं दारें धडाधड् कोसळलीं. सकाळीं ७ वाजतां इंग्रजांना वाट मोकळी झाली. राजवाडा व त्यांतील राजा जेकबच्या हातीं आला. राजवाड्यांत शेकडों सशस्त्र लोक क्रांतीचा ध्वज घेऊन नाचत होते; परंतु आयत्या वेळीं उभारलेल्या, शिस्तीचा गंध नसलेल्या, त्या बाजार-बुणग्यांचें भूस उडविण्याला कसलेल्या, सशस्त्र इंग्रज सैनिकांना काय वेळ? तत्काळ त्यांनीं त्यांचें पारिपत्य केलें–त्यांना नि:शस्त्र केलें, आठ-जणांना ठार केलें आणि त्यांच्या छत्तीस म्होरक्यांना पकडून, लष्करी

कोर्टापुढें फांशीची शिक्षा देऊन, लगोलग राजवाड्यासमोर त्यांचीं डोकीं उडविलीं. दोन सरदारांना गोळ्या घालून ठार केलें. क्रांतीचा अग्नि पेटला, पण तत्काळ विझला. चिमासाहेबाला अपराधी ठरवून, इंग्रजांनीं राजबंदी म्हणून, सिंधमध्यें १८५८ च्या मार्च महिन्यांत डांबून ठेवलें.

सावंतवाडी येथें क्रांतीचा नुसता तरंग उठला. तेथील बाबा देसाई यानें शस्त्र-बंदीविरुद्ध १८४४ सालीं जशी उठावणी केली होती, तशीच १८५८ च्या फेब्रुवारींतहि केली. नानासाहेब पेशव्यांच्या नांवानें त्यानें युद्ध पुकारलें, पण तें क्षणांत विझलें.

सावंत–बंधु गोव्यांत गुप्तपणें राहात होते. त्यांच्या कानीं १८५७ च्या क्रांतीचे स्फोट पडले. लगेच ते सावंतवाडी संस्थानांत शिरले. त्यांना शेकडों लोक मिळाले. दोनचार आठवड्यांत त्यांनीं आपली सत्ता स्थापन केली. सावंतवाडी ते कारवार या प्रदेशावर सावंतांचा अंमल चालू झाला. इंग्रजांचा नष्ट झाला. ब्रिटिश-कचेऱ्या व पोलीस-ठाणीं जाळण्यांत आलीं.

संस्थानचा असा तात्पुरता कबजा घेणें सोपें होतें, पण पुढें तो कायम टिकविणें महाकर्मकठीण ! इंग्रजांचें लष्कर त्यांच्यावर चालून आलें. पण चौदा महिने त्याचें कांहीं चालेना. कारण सारा मुलुख डोंगराळ व जंगली ! पण १८५९ च्या डिसेंबरमध्यें सावंतांच्या सैन्यानें हार खाल्ली. त्यांचे पुढारी फांशीं देण्यांत आले. इंग्रजांचा अंमल पक्का झाला.

•

नगर व खानदेश या दोन जिल्ह्यांतील शेकडों–हजारों भिल्ल लोक यांनींहि या संधीचा फायदा घेतला. नगर येथील पोलीसखात्यांत भागोजी नाईक नांवाचा भिल्ल नोकरीस होता. तो बडतर्फ झाला होता. त्यानें पाहिलें, इंग्रजांविरुद्ध सर्वत्र द्वेष पसरलेला आहे आणि त्यांचा अंमल खिळखिळा झालेला आहे. तेव्हां इंग्रजी सत्तेचें हें धूड जमिनीवर पाडण्यास आपणहि आपल्या परीनें दोन रट्टे द्यावे. त्यानें कांहीं भिल्ल गोळा केले. १८५७ च्या ऑक्टोबर महिन्यांत त्यानें पोलीस सुपरिंटेंडेंट ले. हेन्री यास एका चकमकींत ठार केलें. त्यामुळें साऱ्या भिल्ल जमातीस मोठा चेव चढला. तब्बल दोन वर्षें भागोजी नाईक यानें धुमाकूळ घातला.

अखेर ता. ११ नोव्हेंबर १८५९ रोजीं, त्याची इंग्रज सैन्याशीं हातघाईची लढाई झाली, त्यांत तो ठार झाला.

नगर जिल्ह्यांतील भागोजी नाईकाप्रमाणेंच, खानदेश जिल्ह्यांतील भीमा नाईकानें 'बंडाचा बावटा' उभारला. भिल्ल लोक मोठे काटक, शूर, दऱ्या-डोंगरावर पळणारे व लपणारे आणि जिवावर उदार होऊन लढणारे ! गनिमी काव्यानें लढून त्यांनीं इंग्रजांना बेजार केलें. ले. केनेडी यानें हल्ला केला असतांना, भीमा नाईकाच्या भिल्लांनीं त्याला धूळ चारली.

कल्लुबावा नांवाच्या भिल्ल–नायकानें तर, ब्रिटिशांचें राज्य खलास झालें असें मानून शेतसारा वसूल करण्यासहि आरंभ केला. तो जणुं राजाच बनला. त्याला मदत मिळाली खाजीसिंगाची ! त्याच्याजवळ भिल्लांचें दळ मोठें होतें. त्यांनीं विजेच्या तारा तोडल्या. मुंबई–आग्रा रस्त्यावरून प्रवास करणें धोक्याचें झालें. त्या रस्त्यावरून आठ लाख रुपयांचा इंग्रज सरकारचा खजिना जाणार आहे, अशी कुणकुण त्याच्या कानीं गेली. लगेच त्यानें आपले भिल्ल गोळा केले, आणि खजिन्यावर हल्ला चढविला. खजिन्याचें रक्षण करण्यासाठीं तीनशें सैनिक होते. पण त्या सर्वांची चटणी भिल्लांनीं उडविली आणि आठ लाखांची लूट एकदम मिळविली.

आठ लाख रुपये ! त्या वेळीं केवढी मोठी ही रक्कम ! खाजीसिंगानें त्या पैशांतून रोहिले व अरब यांच्या टोळ्या आपल्या नोकरीवर ठेवल्या. त्याचें एकूण सैन्य ५००० वर गेलें. त्याचा दरारा सर्वत्र पसरला. त्याचा धाक ब्रिटिशांनाहि वाटूं लागला. पण इंग्रजांचें लष्कर मोठें, शिस्त कडक व शस्त्रें आधुनिक ! त्यांनीं ता. १० एप्रिल रोजीं अंबापाणी येथें खाजीसिंगावर हल्ला केला. सात तास कडाक्याची लढाई झाली. इंग्रजांचे चार अधिकारी ठार झाले. पण अखेर भिल्लांचा पराभव झाला व खाजीसिंग इंग्रजांना शरण गेला.

नाशिकजवळील त्र्यंबकेश्वर येथील ब्राह्मणांनींहि सरकारी खजिन्यावर हल्ला केला. पण तो फसला. त्यांच्या प्रमुख ब्राह्मणाला त्र्यंबक येथें फाशीं देण्यांत आलें. त्यावेळीं नाशिक शहर नगर जिल्ह्यांत मोडत होतें.

●

वास्तविक जसें सातारा, जसें कोल्हापूर, तसेंच पुणें हें मराठी राज्याचें केंद्रस्थान! परराज्याचें शल्य त्याला अधिक जाणवलें होतें. तेव्हां उत्तरेकडील क्रांतीच्या नौबती बरोबर पुण्यांताहि विद्रोहाचे नगारे वाजावयास हवे होते. पेशवाई बुडाल्याचें दु:ख तेथील लोकांनीं विरोधाच्या कृतीनें प्रकट करावयास हवें होतें. परंतु पुणें येथें कांहीं हालचाल झाल्याचें दिसत नाहीं. कांहीं देवळांत व कांहीं मशिदींत, इंग्रजांचा नाश व्हावा म्हणून देवाची प्रार्थना करण्यांत आली, इतकेंच. दिल्लीच्या बादशहाचे जाहीरनामे कांहीं ठिकाणीं लागले होते. पुण्यांतील एका शाळेच्या भिंतीवर, १८५७ च्या सप्टेंबरमध्यें, असा जाहीरनामा चिकटविलेला होता कीं, " नानासाहेब पेशवे लवकरच पुणें प्रांतीं येऊन दाखल होत आहेत आणि स्वराज्याची गादी स्थापन करीत आहेत. हें घडण्यापूर्वीं, पेशव्यांच्या बुधवारवाड्यांत युरोपियन तळ देऊन उभे आहेत, त्यांची कत्तल करणाऱ्यास इनाम दिलें जाईल. "

मुंबईमधील हिंदी लष्करांत खळबळ झाली, पण किती? समुद्रावर बुडबुडे यावेत तितकी! १८५७ च्या ऑक्टोबरमध्यें कांहीं हिंदी सैनिकांना स्फुरण चढलें व त्यांनीं बंडाचें निशाण उभारलें. पण त्या सर्वांना तत्काळ पकडून नि:शस्त्र करण्यांत आलें आणि त्यांच्या दोघा पुढाऱ्यांना तोफेच्या तोंडीं बांधून उडविण्यांत आलें.

●

नानासाहेबांचा विवाह सांगलीकर महाराजांच्या मामेबहिणीशीं झाला होता. या नातलगानें महाराष्ट्रांत क्रांति घडवून आणण्यासाठीं, पटवर्धनी संस्थानांतून सिद्धता करून ठेवली होती. त्यांत प्रमुख म्हणजे जमखिंडी व नरगुंद या संस्थानांचे राजे! त्यांच्याकडे उत्तरेहून नानासाहेबांचे दूत क्रांतीच्या बातम्या घेऊन येतात असें इंग्रजांना कळलें. इंग्रजांचे कान तिखट—आणि ते फुंकण्यांत आमचे फितूर तत्पर! लगेच इंग्रजांनीं १८५७ च्या जूनमध्यें जमखिंडीच्या राजेसाहेबांना त्यांच्याच राजधानींत ता. २२ मार्च १८५८ रोजीं अटक केली व रत्नागिरीच्या किल्ल्यांत डांबून ठेवलें. जमखिंडीचे राजे अप्पासाहेब पटवर्धन यांनीं बेळगांव येथील

लष्करांत बंडाचीं बीजें पेरलीं असा त्यांच्यावर आरोप होता. जमखिंडीच्या बक्षी-बंधूनाहि फांशीं देण्यांत आलें.

या कामीं छोटुसिंग हा संस्थानचा सेनाधिकारी सूत्रधार होता, असें इंग्रजाना चौकशीअंतीं आढळून आलें. मग इंग्रजांना दयामाया कोठली आणि देशाभिमान व स्वातंत्र्यभक्ति यांची कदर तरी कोठली? लगेच त्यांनीं छोटुसिंगावर राजद्रोहाचा आरोप ठेवला व फांशीची शिक्षा त्याला ठोठावली. शहरांत दवंडी पिटली. शेकडों लोक जमखिंडीजवळील उघडया माळावर जमले. त्यांच्यासमक्ष, त्यांच्या अधिकाऱ्याला, स्वातंत्र्य-भक्तीच्या गुन्ह्यासाठीं फांशी देण्यांत आलें ! छोटुसिंगाच्या स्वातंत्र्य-भक्तीचें चीज करण्यास आप्पासाहेब मात्र विसरले नाहींत. त्यांनीं आपल्या खासगी मिळकतींतून त्याला पेन्शन चालू ठेवली.

●

नरगुंदचे राजे भास्करराव उर्फ बाबासाहेब भावे मोठे विद्याव्यासंगी. त्यांना दत्तक घेण्यास इंग्रजांनीं नकार दिला होता. त्यामुळें असंतोष धुमसत होता. त्यांत बंडाची बातमी आली.

१८५८ च्या मे महिन्याचे अखेरीस त्यांनीं सुमारें आठशें सैनिक जमविलें, आणि रामदुर्ग संस्थानाकडे कूच केलें. कारण त्यांचे धाकटे बंधु तेथें राज्य करीत होते. त्यांचें सहकार्य मिळवावें हा बाबासाहेबांचा हेतु. या त्यांच्या कारस्थानाची कुणकुण पोलिटिकल एजंट चार्लस मॅन्सन याच्या कानीं गेली. लगेच तो नरगुंदच्या दिशेनें निघाला. बरोबर फक्त १२ सैनिक. माल्कमच्या इंग्रज सैन्याची कुमक आपल्याला मिळेल, अशी त्याची अटकळ, पण ती फसली. त्यानें सुरेबान नांवाच्या एका खेडयांत मुक्काम केला असतांना, ता. २९ मे १८५८ रोजीं, ऐन मध्यरात्रीं, बाबासाहेबांच्या प्रचंड सैन्यानें त्याला अकस्मात वेढा दिला. मारुतीच्या देवळाजवळ एका झाडाखालीं एका मेण्यांत मॅन्सन स्वस्थ निजला होता. १२विरुद्ध८००,मग काय? मॅन्सन आपल्या अनुयायांसह देवळांत शिरला. पण आढ्यावरून उडया घेऊन नरगुंदच्या सैनिकांनीं त्याला चुटकीसरशी खलास केला ! त्याचें मुंडकें कापून नरगुंदच्या सैन्यानें आपल्या राजधानी-कडे मिरवत नेलें आणि विजयचिन्ह म्हणून तें नरगुंदच्या किल्ल्याच्या

मुख्य दरवाज्यावर टांगून ठेवलें! हा पराभव व अपमान ब्रिटिशांच्या काळजास साहजिकच झोंबला.

धारवाडहून कर्नल माल्कम् यानें मोठ्या फौजेनिशीं व तोफखान्यानिशीं नरगुंदवर ता. १ जून रोजीं त्वेषाचा हल्ला चढविला. नरगुंदचें सैन्य चिलटा-पांखरासारखें मेलें, नागरिकांना बकऱ्यासारखें चरचरा इंग्रजांनीं चिरलें. बाबासाहेबांना रात्रींच्या वेळीं पंढरीच्या वारकऱ्याच्या वेषांत पळ काढावा लागला. पण दोनच दिवसांत त्यांना पकडण्यांत आलें आणि बेळगांवला नेण्यांत आलें. तेथें त्यांची चौकशी झाली. " कटांतील लोकांचीं नांवें सांगा म्हणजे तुम्हांला माफी देतों, तुमचें संस्थान देतों, दत्तक घेण्यास परवानगी देतों." अशीं आमिषें इंग्रजांनीं दाखविलीं, पण बाबासाहेब पक्के. त्यांनीं इंग्रजांना दाद दिली नाहीं. तेव्हां त्यांना ता. १२ जून १८५८ रोजीं, सकाळीं सात वाजतां, किल्ल्याबाहेरील मैदानांत, डोक्यावर काळी टोपी घालून, फांशी दिलें. फांशीची दोरी एकदां तुटली म्हणून पुन: फांशी दिलें. त्यांचें प्रेत मांगाकडून, वाजतगाजत मारुतीगल्लींतून लष्करहद्दींत, इंग्रजांनीं नेलें व मैदानांत त्याचें दहन केलें. लोकांवर दहशत बसविण्यासाठीं इंग्रजांनीं प्रेताचीहि विटंबना केली. पण लोकांनीं पुढें त्या दहनभूमीवर चौथरा बांधला. कोणी म्हणतात, राजाच्या एका स्वामिनिष्ठ सेवकानें राजाचा पोशाख पेहरून आपल्या प्राणाचें बलिदान केलें— स्वत: फांशी जाऊन राजाला वांचविलें!

राजेसाहेबांच्या मातोश्री यमुनाबाई व राणी सावित्रीबाई राजवाड्यां-तून बाहेर पडल्या व बारा मैलांवरील संगळ गांवीं गेल्या. तेथें या सासु-सुनांनीं, पुढील विटंबना टाळण्यासाठीं, एकमेकींना मिठी मारून, मलप्रभा नदींत एकदम जलसमाधि घेतली! याच नदींत, त्याच ठिकाणीं, कर्नाटकची 'लक्ष्मी' चन्नम्मा हिनेंहि जीव दिला होता.

कित्तूर संस्थानची राणी चन्नमा निपुत्रिक होती व तिची सवत राणी रुद्रमा हीहि निपुत्रिक होती. पति-निधनानंतर दत्तकाचा वाद उत्पन्न झाला. तेव्हां कर्नाटक भागचा रेसिडेंट थॅकरे यानें दत्तक–वाद आपल्याकडे सोपवावा व दरबारची जमाबंदी व रोकड हिशोब द्यावा,

असा निरोप आपल्या इंग्रज अधिकाऱ्यामार्फत पाठविला. तेव्हां राणी चन्नम्मानें त्या खलित्यास नकार दिला. कित्तूरला रणकंदन झालें. राणी चन्नम्मा स्वत: सैन्याच्या आघाडींत सामील होऊन शूरपणानें लढली. त्यांत दोनदां इंग्रजांच्या फौजांस माघार घ्यावी लागली. इंग्रज सेनाधिकारी इलियट ब्लॉक व स्टेव्हन्सन यासारखे सेनानायक धारातीर्थी पडले. पण तिसऱ्यांदा जो हल्ला झाला, तींत राणीचा पराभव झाला. शेवटीं संगोळी गांवाजवळ तिनें मलप्रभा नदींत पावित्र्य-रक्षणार्थ उडी घेऊन प्राण दिला. पुढें इंग्रजांनीं कित्तूर संस्थान खालसा केलें.

०

पारतंत्र्याच्या प्रतिकाराची ज्योत नागपूरप्रांतीं १८५७ मध्यें प्रखर ज्वाला बनली, यांत नवल काय? नागपूर शहरांतील जागृतेश्वराच्या मंदिराच्या भिंतीवर दोन पत्रकें लागलेलीं लोकांनीं पाहिलीं. १८५३ सालीं संस्थान-खाऊ लॉर्ड डलहौसी यानें नागपूर खालसा केलें. त्या कामीं ब्रिटिशांना दादोबा शिर्के यानें मदत केली. हा भोसल्यांचा नातेवाईक, पण फितुरीचा महारोग त्याला झाला. त्याच्याविरुद्ध लोकमत किती क्षुब्ध झालें होतें, याचें प्रतिबिंब एका पत्रकांत दिसून येतें. तें शंभर वर्षांपूर्वीचें पत्रक अजून उपलब्ध आहे; तें असें—

"श्री महाराज दादोबा सीरके आपन सरकारचे आप्त आसुन मऱ्हाठा मंडळीला डाग लावला. राजे बुडउन काये मीळनार आहे परन्तु तुम्हास लाज नाहीं. तुम्ही मुलकावर नांव मिळवता की मऱ्हाठे नीमकहराम जाले. परन्तु आपन बाकांबाई, बाहादराची आज्ञय मोडून राजे बुडविले. कांहीं गादीची आशा गरीबा दुबळ्यास ते तुम्ही बुडवीता. दादोबा, तुम्हाला आंन गुरूची, तुम्हाला आंन गउची, तुम्हाला आंन कुळस्वामीची, महालांत जाऊ नका. येथु हद जाली."

छत्रपति शिवाजीपासून भाई कोतवालापर्यंत महाराष्ट्रांतील स्वातंत्र्यसंग्रामाला फितुरीची जी कीड लागलेली दिसते, तिला दिलेलें हें ताकीदपत्रच नव्हे काय?

पण स्वार्थ हा दुरतिक्रम असून, अशा इषाऱ्यांना न जुमानतां, राष्ट्राची होळी करून, तीवर आपली पोळी भाजून घेणारा आहे. वरील पत्रकांत उल्लेखिलेली राणी बाकाबाई हिनें १८५७ च्या क्रांति–युद्धांत राष्ट्रद्रोही वृत्तीच प्रगट केली. अगदीं झांशीची राणी होणें नव्हे, पण तिनें किंचित् प्रोत्साहन, थोडीशी सहानुभूति दाखविली असती, तर मध्यप्रदेशांत १८५७ साल खूपच गाजलें असतें. लोक व लष्कर यांचें संगनमत झालेलें होतें. ता. १३ जून १८५७ रोजीं नागपूरमधील कटवाले मोतीबागेंतून एक 'आगीचें विमान' अंतराळांत सोडणार होते व ती खूण दृष्टीस पडतांच टकली येथील लष्कर रेसिडेन्सीवर हल्ला करणार होतें. पण—

फितुरी!—इंग्रजांना बातमी लागली आणि त्यांनीं कटाचा फुगा फोडला.

भोसले घराण्यांतील वयोवृद्ध राणी बाकाबाई हिनें सुमारें ५०० सरदारांना एकत्र केलें आणि बजावलें, 'ब्रिटिशांविरुद्ध कांहीं कट वा उठावणी कराल, तर तें मला मुळींच खपणार नाहीं. त्यामुळें लोकांचें नुकसान होईल–ईश्वराचा कोप होईल!' या राजनिष्ठेचें पारितोषिक राणीला काय मिळालें? ब्रिटिशांनीं तिचे हाल केले, अपमान केले, मनांत व जनांत तिची अप्रतिष्ठा झाली.

अशा काळ्या मेघमालेंतूनहि कडाडत जाणारी तेजस्वी विद्युल्लता मध्यप्रदेशांत चमकली नाहीं असें नाहीं. मंडला जिल्ह्यांतील रामगडचा राजा लछमनसिंग १८५० मध्यें वारला. त्याचा एकुलता एक मुलगा विक्रमजित हा वेडसर निघाला. तेवढें निमित्त घेऊन ब्रिटिशांनीं तें संस्थान गिळंकृत केलें; व तेथें आपला एक तहशीलदार नेमला. त्याला राणीनें उडवून लावून सारा कारभार आपल्या हातीं घेतला आणि आजबाजूचे ठाकूर व मालगुजार गोळा केले. राणीची ही उभारी पाहून जबलपूरच्या कमिशनरनें ता. २६ ऑगस्ट १८५७ रोजीं तिला फर्मान पाठविलें कीं, 'मंडला येथें जाऊन तीन दिवसांत डेप्युटी कमिशनरला भेटा.' राणीनें तें फर्मान अस्मानांत भिरकावलें! तिनें रामगडचा बंदोबस्त मात्र वाढविला.

ता. १ एप्रिल १८५८ रोजीं मंडल्याहून रामगडवर ब्रिटिश पलटणींनीं स्वारी केली. राणी स्वत: नखशिखान्त लष्करी पोषाख करून व कमरेला समशेर लावून आपल्या सैनिकांना रणभूमीवर नेत होती. पण शस्त्रें जुनीं, म्हणून राणीला रामगड सोडावें लागलें व जंगलांचा आश्रय घ्यावा लागला. तेथून तिनें ब्रिटिशांवर मधून मधून हल्ले चढविले. अखेर एकदां —

चोहों बाजूंनीं ब्रिटिश सैनिकांनीं राणीला वेढलें. आतां हे गोरे आपल्याला पकडणार, असें दिसतांच ती घोड्यावरून खालीं उतरली, एका नोकराजवळ गेली व त्याची तलवार हिसकून घेऊन तीं तिनें, डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच, आपल्या हृदयांत खुपसली ! ब्रिटिश सैनिक आले, तेव्हां त्यांना तिचें प्रेतच आढळलें.

अशा स्वातंत्र्य-लालसेच्या ठिणग्या मध्यप्रदेशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत एकसारख्या उडत होत्या. बनपूरच्या राजानें ललितपूरचा ताबा घेतला व सागर येथील लष्कर बंड करून उठलें. सागर–नर्मदा प्रदेश अवघ्या दोन महिन्यांत स्वातंत्र्य-सैन्याच्या ताब्यांत आला. जबलपूरचा राजा शंकरशहा याच्या दोन मुलांना ब्रिटिशांनीं तोफेच्या तोंडीं दिलें–आणि खुद्द त्यालाहि फाशीं दिलें ! पण त्यामुळें ते सारे अमर शहीद बनले !

'संघार का मार अंगरेज रेज कर देइ मात चंडी बचै नहीं बैरि'

अशी देवीला प्रार्थना करणारी कविता राजानें स्वत: रचली होती व ब्रिटिशांचा संहार करण्याची विनवणी केली होती.

चांदा येथील बापूराव व व्यंकटराव यांनीं ब्रिटिशांना उच्छाद दिला. पण एक जमीनदारीण लक्ष्मीबाई हिनें त्यांना पकडून दिलें. पुन: फितुरीचें विषच आड आलें ! लक्ष्मीबाईला सरकारनें गांवें इनाम दिलीं. क्रांतिनेत्यांना जाहीर ठिकाणीं फांशीं देणें, गांवेंच्या गांवें जाळून टाकणें अशा दंडनीतीपेक्षां ब्रिटिशांना भेदनीतीच अधिक साहाय्यक ठरली. १८५७ च्या क्रांतियुद्धांतील सेनानी तात्या टोपे हे रावसाहेबांसह व ४,००० सैनिकांसह १८५८च्या ऑक्टोबरांत नागपूर प्रांतांत आले

होते. तापी ओलांडून ते बडोद्यास गेले. त्यांचा एक सहकारी राजा मानसिंग हाच फितुर झाला व त्यानें तात्यांना निद्रितावस्थेंत पकडून दिलें.

औरंगाबाद येथील सैनिकांनीं १८५७च्या जूनमध्यें उठावणी केली, पण इंग्रजांनीं त्यांना पकडलें, निःशस्त्र केलें व बहुतेकांना तोफेच्या तोंडीं दिलें !

●

मुधोळ संस्थानांतील बेरड लोकांनीं इंग्रजांविरुद्ध हत्यार १८५७ च्या नोव्हेंबरमध्यें उचललें. त्यांच्या म्होरक्याला संस्थानच्या कारभाऱ्यानें पाचारण केलें, आणि समजावलें कीं, "आतां आपलें राज्य गेलें, इंग्रजांचें आलें. त्यांनीं असा हुकूम काढला आहे कीं, सर्व लोकांनीं आपल्याजवळील सर्व हत्यारें सरकारच्या हवालीं करावीं. पुढें सरकारला योग्य वाटतील, त्या माणसांना हत्यारें बाळगण्याचा परवाना येण्यांत येईल."

कृपाण हें जसें शीख लोकांचें एक धर्म-चिन्ह, तसेंच क्षत्रियांनाहि आपलें हत्यार हें एक मान-चिन्ह वाटतें. अंगावरील वस्त्र जावो पण हातांतील शस्त्र न जावो, अशी प्रखर भावना शूर मराठ्यांची !—आणि तशीच भिल्लांची आणि कोळ्यांची, रामोशांची आणि बेरडांचीहि ! रानावनांतून फिरणारे हे जीव हत्याराशिवाय जगणार कसे ? केवळ संरक्षणाचेंच साधन नव्हे, तर त्यांच्या जीवनाचेंहि साधन तेंच ! म्हणून कोणी शस्त्र काढून घेतलें तर आपले प्राणच काढून घेतल्याइतकें दुःख त्यांना होई.

आणि त्या अडाणी बेरडांना दूरवरचा विचार कोठला ? लायक पुढारीहि कोणी नाहीं. मनांत आलें कीं हत्यार उचललें, हा त्यांचा खाक्या ! हलगली येथें पांचशें बेरड जमले व त्यांनीं बंडाचें निशाण उभारलें. त्यांचा बिमोड करण्यासाठीं इंग्रजी पलटण आली. तिच्यावर बेरडांनीं हल्ला चढविला.


रात्रीं दीड वाजण्याचा सुमार ! सर्वत्र सामसूम ! बंदुकांचे बार उडवीत उडवीत इंग्रजी लष्कराच्या दोनशें घोडेस्वारांनीं खेड्याला वेढा घातला. वाटेंत येईल त्याला गोळी घालून ठार करण्याचा सपाटा त्यांनीं चालविला. हां हां म्हणतां १५० बेरड ठार झाले. कांहीं बेरड दारें

लावून घरांत लपून बसले ! तेव्हां इंग्रज सैनिकांनीं घरांना आगी लावल्या. मग काय ? बिळांतून उंदीर भराभर बाहेर यावेत, त्याप्रमाणें एकूणएक सारे बेरड घरांतून रस्त्यावर आले आणि इंग्रजांना आपलीं हत्यारें देऊन शरण गेले. त्यांच्या म्होरक्यांना गोळ्या घालून ठार करण्यांत आलें.

सातपुड्यांतील पेंढाऱ्यांनीं व ठगांनींहि थोडीफार उचल खाल्ली. तात्या टोपे फितुरीच्या भोवऱ्यांत न सापडता, आणि महाराष्ट्रांत येता, तर येथें 'दुसरें स्वातंत्र्ययुद्ध' माजलें असतें; अशी महाराष्ट्राची मनोभूमिका संतप्त होती.



११ स्फूर्तीची तेजोगंगा



"हिंदुस्थानच्या निरभ्र राजकारणांत तळहाताएवढा लहानसा काळा ढग मला दिसत आहे, तो जर यापुढें वाढतच गेला, तर सारें आकाश काळवंडून जाईल आणि पर्जन्यवृष्टि होईल. ती इतकी कीं, त्यामुळें आपलें

सारें राज्य वाहून जाईल.'' असें भविष्य लॉर्ड कॅनिंग यानें हिंदुस्थानांत गव्हर्नर जनरल म्हणून येण्यापूर्वी केले. या भविष्याचा शेवट खोटा ठरला असला, तरी बाकीचा भाग खराच होता. इंग्रजांच्या धार्मिक सक्तीमुळें व आर्थिक लुटीमुळें, हिंदुस्थानांत असंतोषाचा बारीक ठिपका १८५५ पासून दिसूं लागला होता. त्या वर्षी संताळांनीं स्वातंत्र्यासाठीं उठाव केला. भाले व धनुष्यबाण घेतलेल्या २०००० लोकांनीं कलकत्ता शहरावर हल्ला चढविला, पण सरकारनें १०००० संताळांना ठार करून त्यांच्या रक्ताच्या पुरांत ही स्वातंत्र्याची ठिणगी विझवून टाकली.

त्यानंतर लॉर्ड डलहौसीच्या संस्थान संहारक धोरणामुळें सर्व देशांत जागजागीं संतापाचे डोंब उठले. याशिवाय हिंदुमुसलमानांच्या धर्मभावनेवर आघात करणारें धोरणहि इंग्रजांनीं हट्टानें व जुलुमानें चालविलें. त्या सर्वांचा परिपाक म्हणजे १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध !

होय, तें स्वातंत्र्य-युद्धच होतें— निःसंशय होतें. शेकडो इंग्रज लेखक हजारों पानांमध्यें त्या आंदोलनावर बंडाचा काळा कुंचला फाशीत असले, तरी तो खोटा आहे– स्वार्थी आहे– लबाडीचा आहे. चरबी चोपडलेलें काडतूस हें जसें सैनिकांच्या प्रक्षोभाचें एक निमित्त, तसेंच सैनिकांची उठावणी हेंहि भारतीय स्वातंत्र्य-युद्धाचें केवळ निमित्तच ! काडतूस–प्रकरण पेटलें नसतें, तरी सैनिक भडकले असते, आणि सैनिक भडकले नसते, तरी स्वातंत्र्याची ज्वाला पेटली असती. कारण सर्व देशभर असंतोषाच्या दारूचीं कोठारें जागजागीं ठासून भरलेलीं होतीं.

निरनिराळ्या कारणांनीं, हिंदी प्रजेंतील अनेक वर्ग, शंभर वर्षांच्या ब्रिटिश राजवटीला विटून गेले होते. संस्थानिक असोत, जमीनदार असोत; व्यापारी असोत, कारागीर असोत; किंवा सरकारी नोकर असोत–ते सारेजण या ना त्या कारणानें इंग्रज सरकारवर जळफळत होते. मुख्य म्हणजे इंग्रजांच्या राजवटींत काळा-गोरा हा भेद वाढत चालला होता. राज्यकारभारांतील सर्व उच्च जागा गोऱ्यांच्या हातीं, काळ्या लोकांनीं फक्त त्यांचे बूट पुसावे व त्यांचे शब्द झेलावे. व्यापारांतील सर्व सवलती गोऱ्यांना. हिंदी व्यापारी भरडला जाऊं लागला. गोऱ्या कापडाला गिऱ्हाईक मिळावें म्हणून येथील पिंजारी, विणकर इत्यादि हजारोंहजार कारागीरांना

बेकार करण्यांत आलें. अशा द्रव्यशोषक व प्रजापीडक राजवटीवर राजी राहील कोण ?

सर्वांआधीं मुसलमान लोक १८५७ सालीं उठले, आणि पुढील उठावणींतहि बहुसंख्या त्यांचीच होती. दिल्लीचा बादशहा त्यांचा; रोहिल-खंडाचा नबाब त्यांचा. झिन्नत-महाल, अजमुल्लाखान, शमसुद्दीनखान, महंमदअल्ली इत्यादि किती तरी मुसलमान नेत्यांनीं या स्वातंत्र्य-युद्धाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. मुसलमानांचा हा संताप आपल्याला असह्य झाला, हें ओळखूनच इंग्रजांनीं पुढें त्यांना आंजारण्या-गोंजारण्याचें धोरण ठेवलें, आणि हिंदु-मुसलमानांत भेदभावाचें विषारी बीज असें रोवलें कीं, त्याला अखेर फळ आलें, राष्ट्र-भंजक पाकिस्तानचें !

इंग्रजी राज्यसत्तेला येथून उखडून लावण्यासाठीं मुसलमानांच्या खांद्याला खांदा लावून हिंदु लढले. हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याचा कुतुबमिनार १८५७ सालीं आकाशाला भिडला होता. परस्परांना पोषक अशा दोन आघाड्यांवर हें स्वातंत्र्य-युद्ध चाललें होतें. दिल्ली येथें मीरतच्या धर्मा-भिमानी व स्वातंत्र्याभिमानी सैनिकांनीं ता. ११ मे रोजीं प्रवेश केला आणि बादशाही सत्तेची द्वाही फिरविली. त्याचप्रमाणें कानपूर व झांशी येथें नानासाहेब व रावसाहेब पेशवे आणि त्यांचे सेनापति तात्या टोपे व राणी लक्ष्मीबाई—या सर्व झुंझार नेत्यांनीं महाराष्ट्राचें पाणी इंग्रजांना चांगलेंच दाखविलें. दिल्ली व लखनौ हीं मोक्याचीं शहरें सुमारें तीन-तीन महिने क्रांतिकारकांनीं आपल्या हातीं ठेवलीं. तेथें लाख-लाख क्रांतिकारक सैनिक गोळा झालेले होते. एक लक्ष चौरस मैलांचा प्रदेश त्यांनीं जिंकला आणि ३ कोटि ८० लक्ष लोकसंख्येवर त्यांचें राज्य चालू झालें.

' १८५७ ' नांवाच्या आपल्या इंग्रजी ग्रंथांत, डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनीं, मध्यवर्ती सरकारचे सारे गुप्त कागद-पत्र पाहून-पारखून व सर-कारचें कोणतेंहि दडपण नसल्यानें स्वतंत्रपणें, असा निर्णय दिला आहे कीं, " अयोध्या व शहाबाद यांच्याबाहेर सर्वसामान्य लोकांची सहानु-भूति या उठावाला होती असें दिसत नाहीं. त्यामुळें त्याला " राष्ट्रीय युद्ध " असें गौरवाचें नांव देतां येत नाहीं. पण त्याबरोबरच हा केवळ

" शिपायांचा भडका " होता, असें म्हणणेंहि चूकच आहे. ज्या क्षणीं मीरतचे बंडवाले दिल्लीच्या बादशहाचे अंकित म्हणून वागूं लागले आणि कांहीं संस्थानिक व कांहीं जनता त्याच्याशीं निष्ठा दाखवूं लागली, तेव्हांच या ' बंडाला ' ' क्रांतीचें ' स्वरूप आलें व त्यानें राजकीय रूप धारण केलें. ' धर्मासाठीं युद्ध ' म्हणून जें सुरू झालें, तें ' स्वातंत्र्याचें युद्ध ' म्हणून समाप्त झालें. परक्या सरकारच्या मगरमिठींतून मुक्त व्हावें आणि जुनी स्वकीय राज्यव्यवस्था पुनः स्थापन करावी अशी बंडखोरांची इच्छा होती, यांत तिळमात्र संशय नाहीं." (पृ. ४११)

तसेंच, झाशीच्या राणीनें बानपूरचा राजा मर्दनसिंह याला युद्धांत साह्य देण्याविषयीं जें पत्र लिहिलें, त्यांत ' स्वराज्य ' शब्दाचा स्पष्ट उल्लेख आहे. १८५८ मध्यें इंग्रजांनीं सैनिकांच्या ज्या जबान्या घेतल्या, त्यावरून राणीसाहेब स्वराज्याकरितांच लढल्या असें निःसंदिग्धपणें दिसून येतें.

मग प्रश्न असा कीं, या स्वातंत्र्य-युद्धास यश कां आलें नाहीं ?

नाना-तात्यासारखे अलौकिक नेते व लक्ष्मीबाईसारखी अद्वितीय वीर-रमणी यांचा योग जमून आला असतांहि अपयश कां यावें ? लाखों सशस्त्र सैनिक सर्व भेदभाव विसरून एका निशाणाखालीं गोळा झालेले असतांनाहि पराभव कां व्हावा ? गांवोगांवच्या जनतेची सहानुभूति व पाठिंबा प्रचंड प्रमाणावर मिळत असतांनाहि अखेर पराजय कां व्हावा ? पैसे होते, माणसें होतीं, शस्त्रें होतीं, तरी यशाचें शिखर गांठतां कां आलें नाहीं ?

हें युद्ध पेटण्याला जशीं नानाविध निमित्तें, तशींच तें हरण्यालाहि वेगवेगळीं अनेक कारणें ! त्यांतील आमचे तीन दोष तेव्हांपासून आत्तां-पर्यंत, कमीअधिक प्रमाणांत, आमच्या सर्व स्वातंत्र्य-यज्ञांत दिसून आलेले आहेत. हे आमचे राष्ट्रीय त्रिदोषच होत. त्यांतील पहिला दोष म्हणजे शक्तिशाली केंद्रसंस्थेचा अभाव. एक मध्यवर्ति सत्ता सुदृढ व सामर्थ्य-संपन्न असणें, हें कोणत्याहि युद्धाचें काय किंवा राज्यकारभाराचें काय, प्राणभूत तत्त्व आहे. सर्व हालचालींवर एकच नजर व सर्व कृतींचें एकच धोरण--अशी सुव्यवस्था आमच्या राष्ट्राच्या अंगीं त्या वेळीं तरी बाणलेली नव्हती. उलट, इंग्रजांचा सारा कारभार यंत्रासारखा सुव्यवस्थित ! चक्रांत

चक्रें कितीहि अडकविलेलीं असलीं, तरी त्या सर्वांना गति देणारी एकच किल्ली ! एक सेनापति कामीं आला किंवा कुचकामीं ठरला, तर लगेच दुसरा पाठविणें किंवा दोनचार सेनापतींचें सामर्थ्य एकाच शत्रूवर लोटणें --हें सारें धोरण कलकत्त्याचा एकटा गव्हर्नर जनरल राखीत असे. त्याचा दंडक सर्वत्र प्रमाण ! लॉर्ड कॅनिंगवर इंग्रजांनीं थोडी का टीका केली ? पण त्याचा अधिकार सर्वांनीं निमूटपणें मानला. असा एकसूत्री, एकमुखी व एकजुटी कारभार आमच्या स्वातंत्र्य-सैनिकांचा नव्हता. त्यामुळें बांध फुटलेल्या पाण्याप्रमाणें किंवा दोरी सुटलेल्या गवताप्रमाणें, आमचे सारे प्रयत्न बारा वाटा पळत गेले—आणि विफल ठरले.

दुसराहि दोष आमच्या राष्ट्राच्या हाडींमांसीं, जुनाट ज्वराप्रमाणें, खिळलेला आहे. एखादें कार्य ऐन रंगांत यावें, तों हा दोष त्या रंगाचा बेरंग करून टाकतो. यशाचा पेला ओठाशीं यावा, तर हा दोष तो पालथा पाडतो. कर्तृत्वाचें केवढेंहि मंदिर आम्ही उभारलें, तरी या दोषांमुळें तें क्षणार्धांत जमीनदोस्त होतें. आमच्या राष्ट्र-वृक्षाला कीड लावणारा हा दोष म्हणजे फितुरी ! हें प्रत्यक्ष विष आहे !— असंख्य कार्यांचा सत्यानाश करणारा आहे. बहादुरशहाला त्याचा व्याही पकडून देतो, तर तात्या टोपेला त्याचा मित्र मानसिंग इंग्रजांच्या जबड्यांत लोटतो. झांशीचा अजिंक्य किल्ला कोसळला तोहि फितुरीमुळेंच व रावसाहेबांचाहि शेवट फितुरीमुळेंच ! १८५७ पासून १९४७ पर्यंत स्वातंत्र्य-संपादनाचे जे जे प्रयत्न झाले, त्या त्या प्रत्येक प्रसंगीं फितुरीच्या सापानें डोकें वर काढलेंच आहे राष्ट्रीय भावनेच्या अभावाचेंच हें गमक.

एकसूत्री सत्तेचा अभाव व फितुरीच्या विषाचा प्रभाव— हे दोन्ही दोष असतांनाहि आमच्या पदरांत यशाचीं फळें टपाटप् पडत होतीं. पण तीं वेचण्याचे, सांठविण्याचे, टिकविण्याचे उपाय आम्हांला कोठें माहीत होते ? युद्धांत विजय मिळविणें अवघड खरेंच, पण त्याहिपेक्षां तो विजय पुढें टिकविणें, हें त्याहूनाहि अवघड ! नाहीं तर विजय हा पराजयच ठरतो. आपण यशस्वी झाल्यानंतर कोणती योजना आंखणार, याचें ज्ञान दूरदर्शीपणानें ज्याला असतें तोच खरा नेता ! युद्धाच्या समाप्ती-नंतरची व्यवस्था, युद्धाच्या प्रारंभापूर्वींच जो मनानें आंखतो, तोच खरा

धुरीण ! पण असें दूरदर्शी धोरण या स्वातंत्र्यसमरांत कोणी ठेवलेलें नव्हतें. त्यामुळें वाऱ्यानें बुद्धिबळाचा पट उडावा व त्यावरील राजे, वजीर, उंट, घोडे, हत्ती इत्यादि उधळले जावे, तशी धूळधाण यशस्वी झालेल्या क्रांतिकारकांचीहि झाली.

इंग्रज पिटाळला, विजय संपादिला, पण पुढें काय ? नानासाहेब विजयी होऊन ब्रह्मावर्तास आले आणि राज्याभिषेकाच्या समारंभांत गुंग झाले. तसेच रावसाहेब ग्वाल्हेर सर करून यशानें धुंद झाले व स्वतःला त्यांनीं राज्याभिषेक करवून घेतला, आणि राज्याभिषेकाचा समारंभ आला कीं, त्याच्या पाठोपाठ नाच-रंग, सहस्रभोजनें, अनुष्ठानें, दानें इत्यादि सारे सोहळे आलेच. त्यामुळें युद्धाचें तापलेलें वातावरण थंडावतें, आवेश चढलेले सैनिक सुस्तावतात, धनुष्याची दोरी ढिली होते. त्याच्या उलट, इंग्रजांनीं एखादें ठाणें जिंकलें कीं, तें पूर्ण निर्धास्तपणें आपल्या मुठींत येईपर्यंत ते दक्ष रहात.

कमजोर केंद्र-सत्ता, शिरजोर फितुरी व भविष्याबद्दल बेफिकीरी—हे त्रिदोष तर १८५७ मधील आमच्या अपयशाला कारण आहेतच, पण त्याहिपेक्षां एक दुर्लंघ्य खंदक आड आला, तो म्हणजे दोन संस्कृतींतील फरक. भारतांतील संस्कृति कितीहि पुरातन व उच्चतम असली, तरी ती जीर्ण झालेली होती, खिळखिळी झालेली होती, नव्या काळाच्या मागें पडली होती. याउलट, तिच्याशीं सामना देण्यासाठीं जी संस्कृति उभी ठाकली, ती नवी होती, सुधारलेली होती व सामर्थ्यशाली होती.

नवें विज्ञान, नवें राज्यशास्त्र व नवें कलावैभव यांनीं नटलेली इंग्रजांची संस्कृति जितकी शक्तिमान होती तितकीच मायावीहि होती. ऐहिक यश मिळविण्यासाठीं जे जे गुण लागतात, ते ते तिच्या अंगीं होते. ज्ञानाच्या पुनरुज्जीवनाची लाट तेथें येऊन गेलेली होती. धर्म-सुधारणेसाठीं संग्राम तेथें घडलेले होते. यंत्र-युगानें औद्योगिक क्रांतीची पहांट तेथें फटफटलेली होती आणि लोकशाहीच्या कल्पना तेथील जनतेच्या सामर्थ्याला आवाहन करीत होत्या. Renaissance, Reformation, Industrial Revolution and Democracy या चतुरंग बलानें तेजस्वी व सामर्थ्यवान् बनलेली पाश्चात्य संस्कृति

हिंदुस्थानांतील मोडकळीस आलेल्या संस्कृतीवर मात करूं शकली यांत नवल काय? या चारहि अवस्थांतून शुद्ध होऊन आमची संस्कृति सतेज बनलेली नव्हती—आतां कोठें शंभर वर्षांनीं, ती तशी बनत आहे. लांब पल्ल्याच्या नव्या नव्या तोफा–बंदुका तर आमच्याजवळ नव्हत्याच, पण वक्तशीर वागणें, वेळेला पगार देणें, कार्यांत तत्पर असणें, इत्यादि साध्या-साध्या संवयींहि आमच्या अंगवळणीं पडलेल्या नव्हत्या.

नाविन्यानें नटलेल्या या नवसंस्कृतीचें ज्ञानहि कोणास नव्हतें, मग त्याचें स्वागत कोठलें आणि अंगीकार कोठला? नानासाहेबांसारख्या बुद्धिमान् व कर्तृत्ववान् नेत्यानें अधिक चिकाटी धरली असती व हिंमत दाखविली असती, तर त्यानें हें स्वातंत्र्य-समर यशस्वी करून दाखविलें असतें. पण यशानंतर काय? पुनः तेच राजे-महाराजे! त्यांचीं तींच वैरें नि वैमनस्यें! आणि प्रजेच्या सुखाविषयीं तीच बेफिकिरी! हा अनर्थ टाळण्यासाठीं, पाश्चात्य संस्कृतीचें अचूक ज्ञान असणारा, तिच्या अंगचे गुण तेवढे घेणारा, आणि ते आपल्या राष्ट्रीय जीवनांत मुरविणारा, चतुर, कल्पक, धाडसी व दूरदर्शी महापुरुष, जर नानासाहेबांच्या जागीं असता, तर १८५७ चें स्वातंत्र्य-समर फत्तें झालें असतें, इंग्रजांचें राज्य येथून पिटाळलें गेलें असतें आणि सुसंस्कृत व निर्भय लोकशाहीचें बीजारोपण तेव्हांपासूनच झालें असतें.

झालें असतें–पण झालें नाहीं! जगाच्या इतिहासांत असे 'जर-तर' किती तरी आहेत. आम्हांला आमच्या रक्ताची किंमत देऊनच गेलेलें स्वातंत्र्य मिळवावें लागलें आणि स्वातंत्र्याची किंमत देऊन पाश्चात्य संस्कृतीचें धन संपादन करतां आलें. १८५७ च्या क्रांतीचा एवढा जबरदस्त तडाखा इंग्रजी सत्तेला बसला, तरी तो वृक्ष कायम राहिला–नव्हे, दृढमूल झाला. युद्धांत अमानुष क्रौर्याच्या लाटा दोन्ही बाजूंनीं सारख्याच उसळल्या, पण आपल्या क्रौर्यामुळें प्रजेंतील असंतोष वाढूं नये, अशी दक्षता घेण्याइतके इंग्रज लोक चतुर होते. पुनः असा तडाखा आपणांला बसूं नये, म्हणून त्यांनीं राज्यकारभारांत कांहीं युक्त्या केल्या आणि त्याचबरोबर प्रजेमध्यें संतोष निर्माण व्हावा म्हणून गुळचट आश्वासनेंहि दिलीं.

१८५७ चें क्रांति-युद्ध इंग्रजांनीं जिंकलें खरें, पण त्यानें त्यांच्या पोटांत भीतीचा गोळा उठविला हें कांहीं खोटें नाहीं. निजाम, शीख व शिंदे हे तिघे क्रांतीच्या लाटेंत मिसळले असते, तर आपल्या राज्याचें जहाज बुडालेंच असतें, अशी बालंबाल खात्री ब्रिटिशांची झाली. असा जिवावर बेतणारा प्रसंग पुन: येऊं नये, म्हणून ते डोळ्यांत तेल घालून जपूं लागले.

या क्रांति-युद्धाचा कणा म्हणजे लष्कर! तें आपल्याविरुद्ध पुन: उठूं नये म्हणून काय तजवीज करावी, याचा विचार ब्रिटिश राज्यकर्ते बारकाईनें करूं लागलें. त्यासाठीं त्यांनीं ता. १५ जुलै १८५८ रोजीं एक समिति नेमली. तिनें ४७ युरोपियनांच्या साक्षी घेतल्या व त्यांना सात हजार प्रश्न विचारले. या 'पील कमिटीनें' ता. ७ मार्च १८५९ रोजीं आपला अहवाल सदर केला. त्यांत कमिटीनें अशा सूचना केल्या आहेत कीं, युरोपियन लष्कर ८०००० ठेवावें व त्यांतील ५०००० बंगाल-मध्यें असावें. हिंदी सैनिकांना कमी दर्जाचें शिक्षण द्यावें. तोफखान्यावर फक्त युरोपियनच नेमावे. तसेच रसायनशाळेंतहि युरोपियनाशिवाय इतरांना प्रवेश नसावा.

मुंबईचा गव्हर्नर लॉर्ड एल्फिन्स्टन यानें तर एक पाऊल पुढें टाकून अशी सूचना केली कीं, "ब्राह्मण लोकांना लष्करांत घेऊं नये. कारण अन्य वर्णांवर त्यांचें वर्चस्व चालतें."

'हत्याराचा कायदा' करून इंग्रजांनीं सारें राष्ट्र पौरुषहीन करण्याचें जें अघोर कर्म केलें, त्याला जगाच्या इतिहासांत तोड नाहीं. या कायद्यामुळें एकट्या अयोध्या प्रांतांतून ६८० तोफा, २ लाख बंदुका, ६ लाख तलवारी, ५० हजार भाले व ७ लाख इतर हत्यारें यांचे ढीग लोकांनीं रचले—त्यांचा विध्वंस सरकारानें केला. साऱ्या हिंदुस्थानांत शस्त्रांचा केवढा संहार झाला असेल! १५०० लहानमोठे किल्ले जमीन-दोस्त करण्यांत आले.

हिंदी राष्ट्र खच्ची करून, दुबळें ठेवून, दैन्यावस्थेस पोचवून त्यावर राज्य करण्याचा हा मनसुबा इंग्रज राज्यकर्त्यांनें आपल्या पोटांत ठेवला, पण सर्वत्र आबादी-आबाद व आनंदी-आनंद निर्माण करण्या-

साठीं प्रेमाचे व औदार्याचे नगारे वाजविले. हिंदुस्थानच्या संतापाचें लक्ष्य बनलेल्या 'ईस्ट इंडिया कंपनीचे' सारे अधिकार इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिनें आपल्या हातीं घेतले. जणुं कांहीं कंपनीचे इंग्रज अधिकारी हे रौरवाचे रहिवासी आणि राणीचे दूत म्हणजे देवदूत ! पण जुन्याचा विसर पडावा व नव्याची आशा सुटावी, म्हणून कंपनीच्या कारभारावर पडदा टाकण्यांत आला आणि राणीचा अंमल, समतेचे व ममतेचे चौघडे वाजवून, चालू करण्यांत आला.

ता. १ नोव्हेंबर १८५८ रोजीं, महाराणीनें एक जाहीरनामा प्रसिद्ध केला आणि त्यांत असे उदात्त विचार प्रगट केले कीं, "प्रजेचें वैभव हीच आमची शक्ति, प्रजेची तृप्ति हीच आमची शाश्वती व प्रजेची कृतज्ञता हेंच आमचें उत्तम बक्षिस असें आम्ही समजूं. लोकांच्या कल्याणाकरितां या वर निर्दिष्ट केलेल्या इच्छा अमलांत आणण्याचें सामर्थ्य तो सर्व शक्तिमान प्रभू आम्हांला व आमच्या हाताखालील अधिकाऱ्यांना देवो."

या जाहीरनाम्यांत अशींहि भरघोस आश्वासनें देण्यांत आलीं कीं, "आम्ही संस्थानिकांचे सर्व करार चोखपणें पाळूं, सर्व धर्मांच्या अनुयायांना समानतेनें वागवूं. कोणाच्याहि धर्मांत आम्ही हात घालणार नाहीं व मुख्य म्हणजे देशाचा राज्यकारभार हा तेथील प्रजेच्या हितासाठींच आम्ही चालवूं."

चार महिने उन्हानें तापलेल्या भूमीवर पावसाची एक बारीकशी सर आली, तरी हवेंत चोहोंकडे गारवा येतो, तसे क्रांतीच्या धामधुमीनंतर निघालेल्या या जाहीरनाम्यानें हिंदी लोक गारेगार झाले. पण थोडयाच वर्षांनीं, वाघ म्हटलें तरी खातो नि वाघोबा म्हटलें तरी खातो, हा अनुभव त्यांना आला. कंपनीचें नांव गेलें व राणीचें नांव आलें, तरी हिंदी लोकांच्या कपाळीं दैन्य व दारिद्र्य, छळ व अपमान, दुष्काळ व जुलूम हे त्या पारतंत्र्याचे सर्व अनर्थ ठेवलेलेच होते. पुनः वचनभंग, विश्वासघात, वर्ण-वैषम्य यांची काळी रात्र सुरू झाली.

पारतंत्र्याचा हा काळोख दूर करून स्वातंत्र्याचा सूर्योदय करण्यासाठीं, हिंदुस्थानांतील जागते व जाणते पुढारी, आपल्या ज्ञानाची

व कर्तृत्वाची मशाल पेटवूं लागले. त्या मशाली त्यांनीं कोणत्या ज्योतीवर पेटविल्या ?

१८५७ च्या स्वातंत्र्य-ज्योतीवर ! त्या वेळची उठावणी म्हणजे पुढील शंभर वर्षांतील स्वातंत्र्य-यत्नांच्या स्फूर्तीची तेजोगंगाच ! सत्तावनच्या स्वातंत्र्य-समरांत जें अलोट शौर्य, असीम देशप्रेम, अपार धाडस व अतुल स्वार्थत्याग प्रगट झाला, त्यांच्या स्मृतीनें, त्यांच्या प्रेरणेनें असंख्य लोक जागे झाले—धीट बनले—स्वातंत्र्यासाठीं वेडे झाले.

सरणावरतीं आज आमुचीं पेटवितांच प्रेतें ।
उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते ॥

असे नेते किती सांगावें ? वासुदेव बळवंत--चाफेकरापासून सावरकर—सुभाषचंद्रापर्यंत सशस्त्र क्रांतीचा प्रवाह एकीकडे वाहत राहिला; आणि दुसऱ्या बाजूला दादाभाई—रानडे--टिळक--गांधीजी यांच्या लोकशाही मार्गाचा प्रवाह वाढत गेला. त्या दोन्ही प्रवाहांच्या सुंदर संगमावर स्वातंत्र्य-देवीचें मंगल मंदिर उभारलें गेलें १९४७ च्या १५ ऑगस्ट दिनीं !

आणि ता. २६ जानेवारी १९५० रोजीं तर, भारताचें सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक राज्य निर्माण झालें. आणि त्याची सत्ता भारतीय जनतेनें स्वतःलाच अर्पण केली. न्याय, स्वतंत्रता, समानता व बंधुता या चार तत्त्वांवर आधारलेलें भारताचें स्वातंत्र्य हें आज जागतिक शांततेचें एक बलस्थान बनलेलें आहे— अखिल मानव जातीचें आशा-स्थान होऊन राहिलेलें आहे. या यशाचा व वैभवाचा पाया घालणाऱ्या सत्तावनी क्रांति-वीरांना व क्रांति-नेत्यांना कोटिकोटि स्वातंत्र्य-संपन्न भारतीयांचे कृतज्ञ प्रणाम ! !